अ/3/3

# इंदिरा-माधव

अथवा

## सद्यस्थिति नाटक.

VERNACULAR TRANS

किंमत १ रुपया.

# इंदिरा–माधव

अथवा

# सद्यस्थिति नाटक.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA. 1894.
डेक्कन व्हर्नेक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें. १८९४.

## रामचंद्र गोपाळ मिटबावकर

यांनीं रचिलें

तें

**मुंबईमध्यें**

"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.

---

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिलें आहे.

---

सन १८९९.

---

(या पुस्तकासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.)

---

**किंमत १ रुपया.**

मालकाचे परवानगीशिवाय कोणीही
रंगभूमीवर प्रयोग करूं नये.

# सूचना.

या नाटकांत कित्येक ठिकाणीं जीं वाक्यें आहेत तीं वाचकांना अतिशयोक्तीचीं वाटतील; परंतु त्यांना खालीं लिहिल्याप्रमाणें आधार आहेत.

पृष्ठ ९ यांतील शेवटील तीन चार वाक्यें हीं पुण्यास व मुंबईस जीं संमतिवयाच्या कायद्याविरुद्ध शास्त्री लोकांचीं व्याख्यानें झालीं होतीं त्यांत त्यांणीं धन्वंतरीचीं वगैरे जीं प्रमाणें दाखल केलीं आहेत, ज्यांचा सारांश केसरीच्या २४–२–९१ च्या अंकांत आला होता, त्यांतील वाक्याच्या अर्थाचीं आहेत.

पृष्ठ ११ यांतील पहिलें वाक्य सुचण्यासही वर सांगितलेला केसरीचा अंक कारण होय.

पृष्ठ ९७, ९८, ९९, ६० यांतील अजमांस पिंड, ग्रामकुक्कुट, विड्वराह, या शब्दांचे अनुक्रमें साळीच्या पिठाचे मोदक, कोबीचा कांदा, गोराडू इत्यादि अर्थ, अहिंसाधर्म प्रकाश वगैरे आर्यसमाजाच्या पुस्तकांत प्रतिपादन केले आहेत व सरळ अर्थ खोटे ठरविण्याचा यत्न केला आहे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

हें नाटक लिहून झाल्यावर कांहीं अडचणीमुळें आज दोन अडीच वर्षें छापून प्रसिद्ध करण्याचें राहिलें होतें. तें आतां वाचकवर्गास सादर करण्यांत येत आहे. या नाटकांत कोणता विषय असणार याची कल्पना त्याच्या नांवावरूनच थोडीशी होण्यासारखी आहे. यांत आमची आजकालची स्थिति वर्णिली आहे. ग्रंथ रचणारांचें कर्तव्य एवढेंच असतें कीं, जी स्थिति दिसत असते ती जशीच्या तशी वर्णन करावी आणि आपणांस तींत जीं कांहीं व्यंगें दिसतील तीं स्पष्टपणें दाखवून द्यावीं. या कर्तव्यास अनुसरून ही पुढील ग्रंथरचना करण्याचा मी प्रयत्न केला आहे. तो कितपत सफळ झाला आहे तें पाहाण्याचें काम मार्मिक वाचकांवरच सोंपवितों. आह्मी रूढिबद्ध होऊन नीति, अनीति, धर्म, अधर्म यांचा कसा गोंधळ करून सोडला आहे; आणि यामुळें आम्हीं कसे उत्तरोत्तर अधोगतीस जात चाललों आहों, व आम्हांवर कसकसे भयंकर प्रसंग गुदरत आहेत; भोंदू लोक, कधीं धार्मिक, कधीं सुधारक, कधीं जुन्या मताचे अभिमानी, कधीं नव्या मताचे कैवारी बनून कसे लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपले हेतु साधीत असतात; मतलबी लोकांच्या लपंडावांमुळें व धरसोडीच्या आचरणांमुळें सज्जनांस कशीं दुःखें भोगावीं लागत असतात, वगैरे गोष्टी यांत दाखविल्या आहेत. त्या वाचून माझ्या देशबांधवांच्या मनावर इष्ट परिणाम होवो आणि वेडगळपणाच्या रूढि झुगारून देऊन आपला उत्कर्ष करून घेण्याची त्यांस बुद्धि होवो इतकीच ईश्वरापाशीं माझी प्रार्थना आहे.

आतां पुस्तक लिहिण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न असल्याकारणानें यांत पुष्कळ दोष मार्मिक वाचकांस आढळतील, हें मी जाणून आहें. तरी यांतील आशयाकडेच विशेष लक्ष देऊन एकंदर दोषांबद्दल मला क्षमा करितील अशी उमेद आहे.

ग्रंथकर्ता.

# नाटकांतील पात्रें.

बाबासाहेब—एक सुधारक.

वसंत—बाबासाहेबांचा मुलगा.

विष्णुशास्त्री—एक म्हातारा शास्त्री.

माधव—विष्णुशास्त्र्यांचा पहिल्या बायकोचा मुलगा.

कृष्णाजीपंत—एक गृहस्थ.

गोविंदराव—कृष्णाजीपंताचा मित्र.

केशवराव—गोविंदरावाचा मित्र.

नारायणवर्मा—एक भोळवट मनुष्य.

भाऊशास्त्री—एक तरणा शास्त्री.

दादासाहेब—सुधारकांचा पुढारी.

रावसाहेब—एक विद्वान् वकील.

नानासाहेब—एक श्रीमंत गृहस्थ.

मोरोपंत—माधवाचा शाळेंतील जुना मित्र.

हनुमान—एक बैरागी.

खंडू—न्हावी.

इंदिरा—बाबासाहेबांची कन्या.

वेणू—विष्णुशास्त्र्याची पहिल्या बायकोची मुलगी.

गंगाबाई—विष्णुशास्त्र्याची तिसऱ्या संबंधाची स्त्री.

बनी—केशवरावाची विधवा बहीण (सकेशा).

रमा—इंदिरेची मैत्रीण.

एक सांवळी विधवा, नोकर, शिपाई, वगैरे.

# इंदिरा–माधव
## अथवा
# सद्यस्थिति नाटक.

## अंक १.

### प्रवेश १ ला.

**स्थल**—बाबा साहेबांच्या घरांतील दिवाणखाना.

( माधवराव, वसंतराव, व गोविंदराव–इंदिरा एकीकडे कशिदा काढीत बसली आहे. )

**वसंतराव**—कायदा पाहिजे असें ह्मणणाऱ्यांमध्येंच वयाच्या इयत्तेविषयीं मतभेद झाला. बारांच्या ऐवजीं चवदा वर्षे ह्मणते तर किती योग्य झालें असतें ?

**गोविंदराव**—अहो बारा वर्षेच तर रडूं द्या अगोदर; हे आपले चौदा वर्षेच अझून घेऊन बसले आहेत. संमतिवयाचा कायदा नको ह्मणणाऱ्यांची संख्या पहा, शिवाय कायदा होऊं नये ह्मणून त्यांचे केवढे प्रयत्न; कशा रोज सभा चालल्या आहेत; आज एक आणखी सभा आहेच. मला तर खास वाटतें बुवा, सुधारकांना कांहीं यांत यश येणार नाहीं.

**माधवराव**—तर काय कुधारकांना येईल ? कालच्याच सभेची गम्मत पहाना, काय ह्मणे, व्याख्यानें देऊन लोकांचीं मनें वळवून कायदा होऊं नये ह्मणून सह्या घ्यावयाच्या ! व्याख्यानकार बरळूं लागले कीं, आमचा सनातन धर्म

बुडतो; आमच्या रीतिरिवाजामध्यें हे म्लेंच्छ व हे बाटे सुधारक हात घाळणारे कोण! तेव्हां एक शास्त्री मध्येंच कांहीं शास्त्रांतील प्रमाणें सांगूं लागले. इतक्यांत दुसरे पंडित उठून ह्मणूं लागले कीं, हीं प्रमाणें चुकीचीं आहेत. तुह्माला शास्त्रार्थ समजत नाहीं, मी सांगतों. एवढ्यावरूनच त्यांचीं आपापसांत भांडणें जुंपलीं. शिव्यांची लाखोली जी सुधारकांच्या डोक्यावर पडणार होती ती शास्त्रीलोक आपसांतच वांटून घेऊं लागले, शेवटीं आले हातघाईवर. कित्येक मंडळीस धरधरून घरीं पोचवावें लागलें; याप्रमाणें तर सभा! सभा करण्यास योग्यता लागते. गोविंदराव, (वसंतराव व इंदिरा गालांत हंसतात.) असल्या काकसभेपासून कधीं कांहीं निष्पन्न झालें आहे? स्वतःच्यानें कांहीं होत नाहीं; दुसरे कांहीं देशहित करूं लागले तर त्यांच्यावर तुटून पडावयाचें; जसे गवताच्या गंजीवरील ग्रामसिंह! (वसंतराव व इंदिरा हसूं लागतात.)

**गोविंद०**—माधवराव तुह्मी या लोकांना कुत्रे ह्मणतां खरे, पण त्यांत तुमचे वडील विष्णुशास्त्री सुद्धां येतातना? ते सुद्धां कुत्र्यांच्या पंक्तींत का?

**माधव०**—छे, छे, आमचे बाबा कांहीं असल्या भानगडींत पडत नसतात, हें तुह्मालाही ठाऊक आहे. ते लांबून काय होतें तें पहाणारे आहेत. दूर कशाला, कालच्या तुमच्या सभेस ते कोठें आले होते?

**वसंत०**—पण हा वाद कां गोविंदराव? त्यानें एक उपमा दिली तीच कां घेऊन बसलेत? आणखीं खरें सांगायला 'नरोवा कुंजरोवा' पाहिजे कशाला? वडिलांच्या किंवा बापाच्या मर्जीस्तव आपल्या विवेकास कोणी फांटा द्यावा कीं काय?

**गोविंद**०—पण तुह्मीं कां मजशी झगडतां? मी कुठें सुधारणा नको ह्मणतों; ती होईल आपोआप. मी एवढेंच ह्मटलें कीं, त्या लोकांची कायदा हाणून पाडण्याची कडेकोट तयारी आहे. तेवढ्यावरच मला त्या पक्षाचा समजून लागलेत मजशीं वाद करायला! जाऊं द्या कीं, मला काय करायचें; कायदा होवो कीं न होवो.—( थांबून ) बरें पण, बराच वेळ बसलों. येतों आतां, वसंतराव. ( उठतो, पडदा पडतो.)

## प्रवेश २ रा.

**स्थल**—रस्ता. ( गोविंदराव प्रवेश करतो.)

**गोविंद**०—काय करूं, प्रत्येक वेळीं हा माधवराव असें करतो. पहावें तेव्हां माझ्या शब्दावर याचा कोटिक्रम. कसें तरी त्या इंदिरेसमोर मला हाणून पाडण्याचा व आपली थोरवी आणि वाक्चापल्य मिरविण्याचा त्याचा यत्न. ती सुद्धां तो बोलूं लागला ह्मणजे त्याजकडे एकसारखी कशी पहात राहते. माझ्या शब्दांवर त्यानें टीका केली ह्मणजे कशी हंसते. तो वसंतराव तरी बहिणीसारखाच त्याचा पक्ष घेऊन बोलतो. कां न बोलेल? या चांडाळानेंच तर माझ्या दुधांत विष कालवलें. बापाच्या मनांत मला द्यावी असें होतें, शिवाय पांच हजारांचा हुंडा आयता येणार होता. पण हल्लीं या दुष्टानें तो बेत हाणून पाडून या वाचाळाला तीस देवविण्याचा घाट आणला आहे. काय यानें माझें उणें पाहिलें आणि त्याचा तरी स्वभाव यांनीं काय पाहिला आहे? सर्व गोष्टींनीं मी त्याच्यापेक्षां कांकणभर अधिक आहें. पैशाच्या नांवानें पहावें तर तो भिक्षुकाचा पोर; सौंदर्य तेंही तेवढेंच. दोन तीन परीक्षा झाल्या

ह्मणून काय झालें? ह्या पोपटपंची करून शिकलेल्या लोकांस व्यवहारज्ञान असतें कोठें? तर काय, हा सुधारणापक्षाचा ह्मणून याच्यावर हे भाळले! पण मी तरी कोठें मला सुधारणा प्रिय नाहीं ह्मणून दाखविलें! त्यांच्या मंडळींत गेलों म्हणजे त्यांच्या इच्छेप्रमाणेंच बोलणें चालणें ठेविलें; आणि हें तरी सर्व तिच्यासाठींचना? (थांबून) इंदिरे, मजवर तुझें प्रेम नसेल काय? माझा तिट्कारा येण्यासारखें गैरवर्तन मजकडून झालेलें त्यांच्या नजरेस आलें असें मला तरी वाटत नाहीं. मग हें असें कां! (दांत ओंठ चावून) अरे चांडाळा, माझ्या पुढें वाढलेलें ताट तूं हिसकावून घेणार काय? पहातों तर मग, माझ्याशीं गांठ आहे. (जाऊं लागतो इतक्यांत समोरून केशवराव येतो.)

**केशवराव**—गोविंदराव, आज अगदीं विचारांत गर्क झाल्यासारखे दिसतां, कोणीकडे चालली स्वारी?

**गोविंद०**—घरींच जायचें आतां, तुह्मी कुणीकडे केशवराव?

**केशव०**—आतां सभा आहेना? तिकडे नाहीं कां चलायचें?

**गोविंद०**—खरेंच, मला आठवणच नाहीं. चलूं तर, पण आज सुद्धां शास्त्रीमंडळी येणार काय? मग कालचा धांगडधिंगा पुनः आहेच ह्मणायाचा!

**केशव०**—छे, छे, तसें आज नाहीं. आपल्या कृष्णाजीपंतांचें आज व्याख्यान आहे. खूब गम्मत होईल.

**गोविंद०**—हँ हँ त्यांचें? गृहस्थ खुबीदार खरा; बोलेल एक, करील दुसरेंच आणि प्रसिद्ध करील तिसरेंच;

कोणाला दाद ह्मणून देत नाहीं. हिंदुधर्माचा पक्ष घेऊन उठला ह्मणजे गम्मत करून सोडतो, विद्वान् खरा.

**केशव०**—चला, चला, व्याख्यानाला आरंभ सुद्धां झाला असेल. (पडद्याकडे पाहून,) हाच तो वाडा, व्याख्याना करतां नेमलेला. अरे! सभेला सुरवात होऊन बराच वेळ झालेला दिसतो. (पडदा उघडतो व सभेचा थाट दिसतो—बरीच मंडळी बसली आहे; कृष्णाजीपंत व्याख्यान देत आहेत.)

**गोविंद०**—ते पहा, कृष्णाजीपंत व्याख्यान देतच आहेत. चला तर, आपण चांगलीशी जागा पाहून बसूं. (जाऊन बसतात.)

**कृष्णाजी०**—सुधारकांनीं हा विचार केला नाहीं कीं, दहा अकरा वर्षांच्या मुलींना ऋतुप्राप्ति होते; वाग्भट्टाचें या विषयीं वचन आहे कीं, स्त्री ऋतुमति झाल्याबरोबर तिला पतिसुख मिळालेंच पाहिजे, नाहींतर तिच्या शरीर प्रकृतीचा विध्वंस होईल.

**'आहारशयनब्रह्मचर्यैर्युक्त्या प्रयोजितैः।**

**शरीरं धार्यते नित्यमगारमिव धारणैः ॥** (वाग्भट.)

सारांश, घराचें सुरक्षितपण जसें खांबांवर आहे, तद्वत् शरीराचा निरोगीपणा आहार, निद्रा व संभोग यांच्या नियमित सेवनावर अवलंबून आहे. जर दहाव्या वर्षी स्त्री ऋतुमति झाली व तिला त्यावेळीं पतिसुख मिळालें नाहीं तर तिच्या शरीराची धूळधाणी होईल, व अनेक व्याधि तिला जडतील. आणि अति भयंकर गोष्ट ही कीं, ती दहा वर्षांची युवति व ऋतुमति स्त्री पतिसुखाच्या चिंतनेंत राहून तें तिला न मिळालें तर धन्वंतरीनें सांगितल्याप्रमाणें तें

सुख स्वप्नांत तिला मिळून गर्भसंभव होईल. मग अर्थात्च, त्या बिचाऱ्या पतीनें कांहीं संबंध तिच्याशीं ठेवला नसला तरी त्याच्यावर आळ येणार व त्यास जन्मठेपीची शिक्षा होणार ! बरें, त्यानें नाकबूल केलें व त्या स्त्रीशीं मुळींच आपला संबंध नव्हता असें ह्मटलें तर त्या बिचारीनें व्यभिचार केला अशी कंडी पिकविण्यास हे सुधारक मार्गे पुढें पाहणार नाहींत. या धर्मावर व त्यांतील धन्वंतरीसारख्याच्या वचनावर यांचा थोडाच विश्वास किंवा श्रद्धा आहे. यांनीं शास्त्रें केव्हांच गुंडाळून ठेविलीं आहेत. तर हे हिंदुधर्माभिमानी लोक हो, जर तुह्मांला या वैदिक धर्माचा थोडा तरी अभिमान असेल; तो ह्या कायदारूपी राक्षसाच्या जबड्यांत पडत आहे त्याला सोडविणें असेल तर निश्चय करा; आतांच निश्चय करा कीं, कांहीं होवो, हा दुष्ट कायदा ह्मणून होऊं द्यावयाचा नाहीं. असा कायदा होऊं देऊन आमच्या कन्यांना पितृगृहींच ऋतुमति करून ठेवून घोर नरकवासाचें साधन तुह्मी करून ठेवणार काय? (लोक छे, छे, कधीं नाहीं.)

काय ह्मणे, बारा वर्षांच्या मुलींचे अवयवांची घटना पूर्ण झालेली नसते. आणि अशा वेळीं त्या गर्भवति झाल्या ह्मणजे त्यांची प्रकृति बिघडते, त्यांच्या शरीराची दुर्दशा होते व अनेक रोग होऊन त्या मृत्युमुखांत पडतात. परंतु यांना येवढें समजूं नये कीं ऋतुमति स्त्रीस पतिव्यतिरिक्त ठेविलें ह्मणजे सुद्धां तिची तीच दशा होणार! आणखी धर्महानि व म्लेंच्छांचा आमच्या धर्मबाबीमध्यें शिरकाव या गोष्टी होऊन आह्मी येथें धर्मभ्रष्ट होऊं ते होऊंच! शिवाय नरकवास आमच्या कपाळीं येईल.

हे वैदिक धर्माचा उच्छेद करूं पहाणारे बाटे सुधारक त्या म्लेंच्छांच्या रीतिभाती पाहून त्यांची नक्कल करूं जातात! काय हा अधर्मपणा! किती भयंकर! श्रीकृष्ण भगवानांनीं ह्मटलें आहे "स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावहः" तर हा आमचा हिंदुधर्म सोडून म्लेंच्छधर्माप्रमाणें आचरण करूं लागलों तर आमची किती भयंकर स्थिति होईल! (टाळ्या होतात; एक गृहस्थ दुसऱ्यास विचारतो—हें वाक्य कोठें आहे हो? दुसरा—अहो तें गीतेंत आहे—अर्जुन कौरवांशीं लढेना आणि हिंदुधर्म सोडून (मुसलमान) होतों असें ह्मणत होता तेव्हां कृष्णानें ह्मटलें आहे.)

अहो, हा संमतिवयाचा कायदा अति भयंकर आहे. आमच्या सुकुमार कन्यांना सधवा असून विधवांप्रमाणें आपल्या वयांचीं १२ वर्षे संपेपर्यंत विरहाग्नींत होरपळत पडून रहावें लागणार ना? केवढा हा जुलूम!

तसेंच कोठें कोठें लग्न झाल्याबरोबर अशा नवऱ्यांस व मुलींस एकत्र कोंडण्याचें आमच्या धर्मांत सांगितलें आहे. तें हा कायदा झाला ह्मणजे बंद होणार ना! शिव शिव, काय अनर्थ हा!!

ह्या सबगोलंकार करणाऱ्या सुधारकांनीं हें कायद्याचें घोंगडें आजच आमच्या गळ्यांत घालण्याचा प्रसंग आणला आहे इतकेंच समजूं नका. हे असे साठ वर्षांपासून धांगडधिंगा घालीत आले आहेत. सति जाण्याचा स्त्रियांस स्वर्गप्राप्ति करून देणारा धर्म कोणी बुडविला? या अधोगतीस जाणाऱ्या सुधारकांनींच बरें. (ऐका ऐका) अहो, हा सतीचा कायदा झाला नसता तर आज बिचाऱ्या किती स्त्रिया व युवति स्वर्गामध्यें पतिसुख भोगीत राहिल्या

असत्या बरें! पण या कायद्यानें त्या अबलांस पतिवियोगांत एथल्या एथेंच तळमळत ठेविलें आहे. आणि कित्येकांना तर वैधव्य दशा दुःसह झाल्याकारणानें दुराचारास प्रवृत्त होऊन अधोगतीस जावें लागत आहे. सभासदहो, तुह्मीच सांगा, हें घोर पातक कोणाच्या कपाळीं? धर्मभ्रष्ट सुधारकांच्याच कपाळीं ना? (होय होय.) त्यांनीं हे असले कायदे मागून घेऊन धर्माचें केवढें नुकसान केलें आहे बरें! हे दुष्ट हळू हळू वैदिक धर्माचे हातपाय तोडीत चालले आहेत हें खास समजा. सतीच्या कायद्यास कांहीं वर्षें गेलीं नाहींत तोंच हा संमतिवयाचा कायदा यांनीं पुढें आणिला आहे. तो झाला कीं, मग ह्मणतील कीं, खंडोबाला मुरळ्या वाहतात, तेणेंकरून फार अनाचार होतो, तो बंद करण्यासाठीं कायदा करा. यल्लमाच्या भक्तिणींना रजा देण्याचा कायदा करा, एवंच काय कीं, या हिंदुधर्माचें अगदीं मातेरें करून टाकून, आतांच आपल्याबरोबर आह्मांला सुद्धां बाटे बनवून, आमच्याकडून नाहीं नाहीं तीं कर्में हे करवितील. देवी, रुद्र, खंडोबा, हनुमान् वगैरे आमच्या हिंदुदेवांस उपटून फेंकून देतील; व शेवटीं हिंदुधर्म अनीति व दुराचार प्रवर्तक आहे असें सांगून तो बंद करण्यासाठीं एकएक कायदा काढतील. अहो, वैदिक धर्माचे अभिमानी लोक हो, पहाता काय! धर्माची हानि होत आहे, हे दुष्ट लोक त्याची फटफजिती करीत आहेत. बाबांनो, सावध व्हा, हा नामर्दपणा सोडा, आणि दंड ठोकून वैऱ्यांशीं सामना करा. हे सुधारक जसे तुह्मांला नाचवितील तसे नाचूं नका. छातीवर उड्या मारूं ह्मणतील तर 'मारा बाबांनो' असें ह्मणून भागुबाई-

सारखे गप्प राहूं नका. उलट त्यांच्या छातीवर पाय देण्याची तयारी करा. धर्माभिमान सोडूं नका. अहो, आमच्या हिंदुधर्मांत कशाची वाण आहे, ह्मणून आह्मी या बाध्यांचीं मतें स्वीकारावीं, आमच्या धर्मांत राहून आह्मांला मुक्ति मिळणार नाहीं, असें ह्मणण्यास या बाध्यांना लाज नाहीं वाटत ! अहो, वेश्यांचा सुद्धां दुर्वर्तन करतां करतां उद्धार झाला आहे अशा आपल्या पुराणांतरीं कथा आपण रोज वाचतों. असें असतां आमचा उद्धार होणार नाहीं असें सांगण्यास या बाध्यांना काय अधिकार आहे? हे ह्मणतात कीं, वेश्या महापातकी आहेत. पातकी असल्या तर ह्या मुरळ्या वगैरे आमच्या देवांस प्रिय झाल्या असत्या काय? देवांनीं त्यांना पावन करून घेतलें आहे. मग या यःकश्चित् मूर्ख मनुष्यांना त्यांला पातकी ह्मणण्याचा काय अधिकार! आमचे मार्गदर्शक देव आणि महाजन यांनीं ज्या गोष्टींचा स्वीकार केला त्या गोष्टींस पातक ह्मणणाऱ्यांचीं तोंडें कां देव बंद करीत नाहीं ? अहो, 'महाजनो येन गतः स पंथाः' या वाक्यास आजच हरताळ लावावयाची काय? तशांत रूढि सर्वांत बलिष्ठ आहे. आमच्या रूढीप्रमाणें आचरण करण्यास आह्मीं काय ह्मणून भ्यावें? पहाना, आमचे एखादे विद्वान् वैदिक धर्माभिमानी असले व त्यांचें यवन जातीचेंही अंगवस्त्र असलें तरी त्या संबंधानें त्यांच्या समोर कोणी ब्र काढूं शकेल काय? आज आपण त्या सर्वांस मान देतच आलों आहोंत. कारण जे महाजन आहेत त्यांची देवांपेक्षांही योग्यता अधिक; ते जसा आपणास मार्ग दाखवितील तसें आपणास चालणें भाग आहे, तरच आह्मांस ऐहिक व

पारमार्थिक सुख मिळेल. परंतु हे सुधारक ह्मणणार कीं, ही रूढि भ्रष्ट आहे, आणि ती मोडण्यासाठीं ते सरकाराकडे कायद्याकरितां धांव घेणार. असें झालें कीं, एक एक रूढि नाहींशी करून सर्व हिंदुधर्माच्या हक्कांचा नाश केल्याशिवाय हे लोक रहाणार नाहींत. दूर कशाला, आमचे कित्येक देवीउपासक शाक्त आहेत. आणि या शाक्तधर्माची केवढी मोठी योग्यता आहे! परंतु हे सुधारणादेवीचे भक्त शाक्तधर्माची कुचेष्टा करितात! केवढें आश्चर्य! देवाधिदेव महादेवांनीं याविषयीं किती बरें पुण्य सांगितलें आहे. प्रत्येक गोकुळाष्टमी, नरकचतुर्दशी, आमावास्या, पौर्णिमा व संक्रांत या पांच पुण्य दिवशीं रात्रौ जीं धर्मकर्मे करण्याची आज्ञा आहे व जे पदार्थ सेवन करण्यास सांगितले आहेत, त्या सर्व गोष्टींस हे वाटे अनाचार ह्मणणार व शाक्तधर्म बंद करण्यासाठीं सरकाराकडे कायदा मागणार. अहो, हे आमचे केवळ वैरी आहेत बरें. आह्माला धर्मभोळे समजून, धर्म सुधारणा करतों असें सांगून, हिंदुधर्म अजिबात बुडवून, तो या भूतलावर होता कीं नव्हता असें करण्याचा विचार या पातक्यांनीं केला आहे, हें तुह्मी खास समजा. इकडे तर मुलींची कळकळ दाखवावयाची आणि दुसरीकडे त्यांच्या नाशाची तयारी करावयाची हे यांचे उद्देश तुह्मी सिद्धीस जाऊं देणार काय? अहो, अझून तरी सावध व्हा. हा दुष्ट कायदा होऊं देऊं नका. हा झाला कीं, एक एक असे किती कायदे येतील याचा नियम नाहीं. हळू हळू देवाचें दर्शन घेणें सुद्धां अशा कायद्यानें बंद होईल. बिचाऱ्या विधवा (ऐका ऐका)

हनुमानाच्या दर्शनास जातात, प्रदक्षिणा घालतात. समजा कीं, त्या देवाच्या प्रसादानें धन्वंतरीनें ह्मटल्याप्रमाणें स्वप्नांत त्यांचा मृतपति येऊन त्यांच्याठायीं गर्भसंभव झाला तर हे कुटिल धर्मद्वेष्टे लोक त्यांच्यावर व्यभिचाराचा आरोप ठेवणार व अनाचार होतो यास्तव कायदा करून पुनर्विवाह सुरू करा असें सांगणार यांत कांहीं संशय नाहीं. तरी एवढें बरें आहे कीं, नियोगासारखे विधि हल्लीं यांच्या नजरेस येत नाहींत. ( एक जण—अहो नाहींत कां? कोणी कोणी तेही सुरू करूं पहात आहेत. ) परंतु ते यांच्या ऐकण्यांत व पहाण्यांत आले तर यांचीही अशीच दशा हे सुधारक करतील. त्या नियोगांसही ते अनीतीच्या वर्गांत ढकलतील. तो नियोगविधि वेदकालापासून चालत आला आहे, तरी कित्येक सुधारक तो शुद्ध व्यभिचार आहे असें ह्मणूं लागले आहेत! काय, आजपर्यंत आमच्या वैदिक धर्मांत मोडत असलेल्या सर्व गोष्टी अनाचार प्रवर्तक आहेत असें तुह्मी या बाष्प्या सुधारकांस ह्मणूं देणार? आजपर्यंत मोठमोठ्या कुलांत, राजवंशांत व सुशील घराण्यांत ज्या नियोगाचा परिपाठ असे, ज्यापासून आमचे कांहीं अवतारी पुरुष झाले आहेत, ज्यांची कीर्ति दिगंतरीं गाजत आहे, ते काय व्यभिचारानें झाले असें तुह्मी कबूल करणार? ( नाहीं नाहीं. ) धिक्कार असो आमच्या पुरुषत्वाला. अशी धर्माची निंदा या कानांनीं आह्मीं ऐकावी ना? झडोत ते कान! आमच्या देवांची हेलना होतांना या पातकी डोळ्यांनीं आह्मीं पहावें ना? हे डोळे फुटले तरी कां नाहींत. अहो, तुमचा धर्माभिमान गेला कुठे? तुह्मी बांगड्या तर भरल्या नाहींत ना? (नाहीं,) मग हें

काय चालले आहे? जागे व्हा, उठा, बांधा कंबरा, काय पहातां? या पातकी सुधारकांना धर्मबल दाखवा. जोंवर थोडे आहेत तोंवरच साध्य होईल, मग जड जाईल. अरेरे, बाट्यांनो, आमच्या सनातन धर्माचा नाश करूं पहातां काय? दुष्टांनो, कैलासपति शंकर तुह्माला योग्य शासन करील हें खूब लक्षांत ठेवा. काय सांगावें; यावेळीं पेशवाई असती तर यांस दाखविलें असतें, कायदा मागणें किती कठीण असतें तें. सभासद हो, आज निश्चय करा कीं, हे सुधारक जर आमच्या धर्माची गोष्ट बोलतील व त्यांत ढवळाढवळ करूं पहातील, तर उगी रहावयाचें नाहीं आणि हा कायदा ह्मणून होऊं द्यावयाचा नाहीं. हा निश्चय. सर्वांनीं हीं पत्रकें घेऊन कायदा न व्हावा यास्तव त्यांवर सह्या कराव्या. आपले इष्टमित्र जे कोणी असतील, त्या सर्वांकडून सह्या घ्याव्या. मग पाहूं हे बाट्ये कुठवर भराऱ्या मारतात त्या. मी आतां व्याख्यान आटपतों. पुष्कळ बोलावयाचें होतें, परंतु उशीर झाला. कांहीं मुद्दा राहिल्यास, रावसाहेब अध्यक्ष आहेतच ते पूर्ण करून घेतील. परंतु बराच वेळ झाला. ईर्षेच्या भरांत कांहीं अधिक उणें बोललों असेन त्याची क्षमा असावी. पण लक्षांत ठेवा कायदा होऊं द्यावयाचा नाहीं. (नाहीं नाहीं.) करा तर सर्व मिळून 'वैदिकधर्माचा जय' अशी त्रिवार गर्जना.

( सर्वलोक )—"जयजय वैदिकधर्माचा जय"

( टाळ्यांची गर्जना होतांना कृष्णाजीपंत खालीं बसतात. )

**रावसाहेब**—( अध्यक्ष ) मी अध्यक्षस्थान स्वीकारलें खरें, परंतु आमच्या कृष्णाजीपंतांनीं मला सांगण्यास कांहींच बाकी ठेविलें नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.

व्याख्यानाबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच. बोलण्याची शैली व आवेश या गोष्टी त्यांच्या अगदीं मुठींतल्या. तुह्मा सर्वांस आतां एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यांनीं तुमच्या मनांत ठसविलेल्या गोष्टींचें नीट रीतीनें मनन करा व ह्या पत्रकांवर सह्या द्या. धर्माचा छल होत सुरे.. आमचे हक्क हिसकावीत आहेत हें मनांत आणून तुह्मांला जें कर्तव्य असेल तें करा. हीं घ्या पत्रकें. फिरवा सभेंत (एक दोन गृहस्थ पत्रकें घेऊन फिरवतात.)

**गोविंदराव**—(कृष्णाजीपंतांकडे येऊन) आज तर आपण कमाल केलीत बुवा, इकडे तर सुधारकांना हाणून पाडावयाचें आणि दुसरीकडे धर्मभोळ्या लोकांचे न समजतां दांत पाडावयाचे.

**कृष्णाजी०**—हल्लींचा काळच तसा आहे. ह्या दोन्ही लोकांची दिशा चुकत आहे ह्मणून आह्मांला असें करावें लागतें. तें तरी काय, आमच्या रावसाहेबांच्या बळावर ह्मणून समजा.

**गोविंद०**—त्यांची योग्यताच तशी, त्या वकीली बाण्यामुळें येथील मोठमोठ्या धेंडांस ते पुरून उरले आहेत. असो. सध्यां सह्या तर मिळवा पुढें काय होतें तें पाहूं. (पडदा पडतो.)

## प्रवेश ३ रा.

**स्थल**—केशवरावाचें घर.—(केशवराव व गोविंदराव.)

**गोविंद०**—केशवराव, आजचें व्याख्यान तुमच्या अगदीं पथ्यावर पडलें असेल. मला वाटतें, तुमच्या कुटुंबाचें वय १० वर्षांचें सुमारें असावें. तुमचें किती असेल बरें?

**केशव०**—आमचें ह्मणतां? असेल सुमारें तिसांच्या-जवळ. अहो मोठ्या मिळत नाहींत, करतां काय? कसा-तरी निर्वाह केला पाहिजे. काय हो गोविंदराव, हा कायदा जर झाला नाहीं तर या सुधारकांचीं नाकेंच ठेचलीं ह्मणून समजा. हे वसंतराव, माधवराव वगैरे तर अति उड्या मारीत आहेत. यांचे कसे दांत पाडावे या विचारांत मी आहें.

**गोविंद०**—अहो, हेच आमचे मोठे शत्रु समजा. या वसंतरावानें आणि माधवरावानें माझी मोठीच हानि केली आहे. त्याची आठवण झाली कीं, पायांची तिडिक मस्तकांत पोंचते. आणि त्यांना समक्ष पाहिलें ह्मणजे तर ठार करूं कीं काय असें होतें. तुह्मांला ठाऊक असेलच. इंदि-रेशीं माझें लग्न होणार होतें आणि पांच हजारांचा अयता हुंडा येणार होता. परंतु या दोघांनीं घात केला. या कारट्या वसंतानें बापाला सांगून सर्व फिसकटून टाकलें आहे. अहो, या पांच सहा महिन्यांतच कायतें या उभ-यतांचें इतकें संघटण झालें. परंतु त्या अवधींत या ठकानें त्या मूर्ख भोळवट वसंतास मोहनी घालून आपलासा करून घेतला व माझी आतां मुळींच डाळ शिजूं देत नाहीं. इतक्यांत त्याचे त्यांना काय गुण दिसून आले असतील ते असोत. मी तर आतां संधीच पहातों आहें, सूड ह्मणून घेतल्याशिवाय सोडणार नाहीं. परंतु केशवराव, ही गोष्ट बाहेर फुटतां कामां नये बरें. वरून अगदीं मित्रत्व दाखवून त्या ठकाचें कांहींच चालणार नाहीं अशा तजविजीस मी लागणार आहें.

**केशवराव**—वः गोविंदराव, आजपर्यंत मी तुझ्या गोष्टी बाहेर फोडल्याच्या अनुभव आहे का तुला? पण इंदिरा

तुझ्या हातांतून जाणार ह्मणतोस! हें आश्चर्य बुवा! त्या माधवाचें पाणी पातळ करायला उशीर तो किती?

**गोविंद०**—त्याच विचारांत आहें मी. असो. पण तुझी बहीण आज कुठें दिसत नाहीं ती? ( पडद्यांतून )—घरींच आहें बरें कां? ( बनी बाहेर येते. )

**बनी**—केशवा, शेजारचा बाळ्या कांहीं जरूरीच्या कामाकरितां तुला बोलवायला आला होता. आल्या-बरोबर पाठवून द्यायला सांगितलें होतें त्यानें.

**केशव०**—कोण बाळ्या? काय बरें काम असावें? गोविं-दराव, जरा बसा बरें येथेंच, मी आतां जाऊन येतों. (जातो.)

**बनी**—( गोविंदरावांकडे येऊन ) काय ह्मणत होतां आपण तें मी ऐकलें बरें कां सारें. त्या इंदिरेचें आतां नांव तें कशाला बाई? आणि त्याचा आतां सूड तो कसला?

**गोविंद०**—अग, त्या इंदिरेसाठीं थोडाच सूड ध्यायचा. त्या आमच्या धर्मसंबंधानें गोष्टी आहेत. त्यांत तुला काय समजतें? माझी त्यानें मानहानि केली आहे ह्मणून आह्मीं बोलत होतों. तें असो. तिकडचें कसें काय? कुठपर्यंत मजल आणलीस. ( हातधरून. ) खालीं तर बैस.

**बनी**—तें कांहीं नाहीं हो. आधीं माझें कायतें सांगा? किती दिवस मला थापा देणार आपण? मी भोळी ह्मणूनच आपल्या शब्दावर विश्वास ठेवून फसलें. आज चार महिने झाले, मजशीं पुनर्विवाह करतों ह्मणून सांगि-तलेंना आपण? अशी चोरून किती दिवस राहूं बाई मी? तुमच्या पायां पडतें; कधीं विवाहाची तयारी करतां सांगा? मग आपण सांगाल तें मी ऐकेन.

**गोविंद०**—तूं अगदीं वेडी आहेस, असल्या उतावळेपणानें सर्व फजीती मात्र होईल. या गोष्टी युक्तियुक्तीनें केल्या पाहिजेत. नाहींतर बहिष्कार पडेल. तूं अगदीं भिऊं नको. पुढच्या महिन्यांत पुनर्विवाहाची तयारीच ठेविली आहे. आतां झालेंना? माझा विश्वास नाहीं का तुला?

**बनी**—विश्वासाची गोष्ट नव्हे हो. परंतु अशी चोरीनें राहून दिवस काढण्यांत बाई मला वाईट वाटतें, दुसरें काय?

**गोविंद०**—त्याची तूं अगदीं काळजी करूं नको. पण खरें सांग. थोडें तरी त्या वेणूचें मन वळलें कीं नाहीं. अग ती वैधव्यदशेंत तळमळते आहे, तेव्हां लवकर साध्य होईल.

**बनी**—मुळींच नाहीं. अहो ती शिकलेली बायको, आणखी तिचा भाऊ तो माधव, त्याच्या सहवासांत राहिलेली. त्याचा तिला रोज उपदेश चालतो. तो नवीन कसलासा बाई समाज आहे त्याचीं पुस्तकें आणून तो तिजकडून वाचवितो. मी कांहीं एखादें बोलूं लागलें कीं, ती दहा बोलून मलाच निरुत्तर करते. मी काय बाई तिचें मन वळविणार? तिची सावत्र आई गंगाबाईना, तिची सुद्धां तिच्यापुढें मात्रा चालत नाहीं. गंगाबाई शास्त्रीबुवांस मुठींत वागवते खरी, पण बाई वेणूपुढें तिचें कांहीं शहाणपण चालत नाहीं.

**गोविंद०**—विष्णुशास्त्री बिचारा भोळा. तशांत त्याचें हें तिसरें लग्न. तरणीताठी बायको असली ह्मणजे ह्मातार्‍या नवर्‍यांना त्यांचे अंकित व्हावें लागतें, हें साहाजीकच आहे. तेव्हां तिच्याकडूनच आपलें काम होणार आहे. माधव कितीही चलाख असला तरी मजपुढें किती

टिकेल तें पाहीन. गंगाबाई त्याची सावत्र आई आहे, तेव्हां तिला आपण थोडीशी भर घातली ह्मणजे त्याची दुर्दशा करण्यास तो किती उशीर?

**बनी**—मी हल्लीं असें ऐकिलें आहे कीं, माधवरावानें अलिकडे बहिणीचें मन पुनर्विवाह करण्याकडे वळविण्याचा यत्न चालविला आहे. आणि वसंताची इच्छाही तिजबरोबर लग्न करण्याची आहे.

**गोविंद०**—(गोंधळून) काय! वसंताशीं वेणूचा पुनर्विवाह? आणि हें शास्त्रीबोवांस कळलें! त्यांना संमत आहे?

**बनी**—त्यांस संमत कसें असेल! आणि त्यांस कळलें ही नसेल.

**गोविंद०**—वेणू कबूल झाली पुनर्विवाह करायला?

**बनी**—अझून नाहीं. पण बाई माधवरावाचें वजन पडून ती कबूल होईल.

**गोविंद०**—अँ, जेथें जातों तेथें हे दोघे हात धुवून एकसारखे माझ्या पाठीस लागले आहेत. (दांत ओंठ चावून) माझ्या आशेचा अशा प्रकारें भंग करून तुह्मी सुख भोगाल कायरे? पहातों तर. बने, तूं आतां एवढेंच कर कीं, तिकडे त्यांचें काय काय होतें तेवढें मात्र मला कळीव. मी जातों आतां. केशवरावास सांग, कांहीं जरूरीच्या कामासाठीं मी लवकर गेलों–येतों बरें. (जातो.)

**बनी**—(आपणाशींच) देवा कायतरी हे पुरुष; हा गोविंदरावच पहा, थोड्या दिवसांमागें मला किती प्रेम दाखवीत होता. मला पुनर्विवाहाची आस लावून कसें फसाविलें. आतां हातांत सांपडलें तेव्हां त्याचें

नांव सुद्धां नाहीं. बरें, इतकें करूनही थांबला का! आतां ह्मणे त्या वेणूला वश करून आण ह्मणजे मग तुजबरोबर पुनर्विवाह लावीन. काय आह्मा विधवांची देवा दशा ही! आणि कसे हे बेइमान पुरुष! अरेरे, यानें कसें कसें मला फसविलें आहे. प्रथम तर केशवराव आमचे दादा, त्यांना चांगलेंच मुंडलें. त्याला नाहीं नाहीं ते छंद लाविले. नाच, तमाशे, विचकट नाटकें यांच्या नादीं लावलें. तो हातीं आला तसें मग त्याला सांगून मलाही नाटकास न्यावें. तीं नाटकें तरी कसलीं रासक्रीडेसारखीं चावट. त्या वेळीं माझी थट्टा करावी. मग नाहीं नाहीं तीं पुस्तकें वांचायला आणून द्यावीं. त्यांत कांहीं प्रेमाचीं व बीभत्स वगैरे भाषणें असलीं तर मेल्यानें आपण होऊन मोठ्या खुषीनें वाचून दाखवावीं. त्या तसल्या नाटकांच्या व कादंबऱ्यांच्या योगानें माझ्याही मनांत कसेंसेंच होऊं लागलें. त्यांत आणखी हा बेमान भर घालीतच गेला. हा मेला केशव, माझा भाऊ ना, याणें तरी मला मागें ओढावयाचें होतें. पण तो तरी काय करणार बाई! त्याणें त्याला आपल्या मुठींत ठेविलें आहे. केशवाची जर ही दशा तर मजसारख्या अबलेला फसविलंन् यांत नवल तें कसलें? परस्त्रीवर मेल्यांचा नेहमीं डोळा. तो चांडाळ माझी अशी दुर्दशा करून, आतां त्या वेणूच्या मागें लागला आहे आणि हा मेला केशव त्या गंगाबाईवर डोळा ठेवतो आहे. ह्या काळतोंड्याला थोडीच ती दाद देणार आहे. पण नियम नाहीं बाई, मी फसलेंच कीं नाहीं! आपल्यावरून जग पारखावें. गंगाबाई तरी

बिचारी काय करणार? या मेल्या साठीला येऊन पोचलेल्या नवऱ्यांच्या १७–१८ वर्षांच्या तरण्याताठ्या बायका असल्या म्हणजे त्यांची सुद्धां आह्मा विधवांसारखीच गत. या मेल्या थेरड्या विष्णुशास्त्र्यानें त्या कोवळ्या पोरीशीं लग्न लावतांना विचार करूं नये का? मेले पुरुष तेवढे सगळे मतलबी. ( थांबून ) मागची आठवण झाली कीं, या गोविंदरावाच्या लबाडीविषयीं खात्री होऊन छातींत धडकी बसते. मेला बेमान तरी कसा; प्रथम किती प्रेम दाखविलें. पुनर्विवाह लावतों ह्मणून वचन दिलें; आणि आतां फसलें तेंव्हां मेला मला कवडी मोलाची समजून दुसरीचीच इच्छा करूं लागला. जसा तो भुंगा फुलामध्यें मध आहे तोंवर त्यावर घिरट्या घालतो आणि तो मध सरला कीं, त्या फुलाला सोडून दुसऱ्यावर व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर धांवतो, तसें या बेमान पुरुषांचें ग बाई? मला कांहीं महिने लोटले हेंही त्याला सांगितलें तरी लक्षच नाहीं. ह्मणे वेणूला वश कर! देवा, सर्व झालें, आतां कुंटिणीचें काम करायला सांगतो ना. हाय हाय! हेंच का माझ्या कापाळीं यावें? मेल्या तुझे सारे डाव समजलें मी. माझी अशी दशा केलीस हें धडधडीत पहात असतांना त्या पोरीस सुद्धां मजबरोबर नर्कांत ओढून आणूं काय? पण ती कसली या वाघाच्या तावडींत सांपडायला. मजसारखी थोडीच मूर्ख आणि भांबडी आहे ती. बिचाऱ्या साध्वीनें माझेच कान उघडले. तेंव्हांपासून या मेल्याच्या हातून केंव्हां सुटेनसें झालें आहे. ( डोळयांत पाणी आणून ) कसली सुटतें—या वाघाच्या जबड्यांतून! जर का मेल्यानें माझी

अशी वृत्ति पाहिली तर माझा प्राणच ग बाई घेईल! माझे हाल हाल करील! (कपाळाला हात लावून) काय करूं देवा! या मेल्यानें सर्वस्वी माझा नाश केला! मला बुडविलें! देवा, नको नको हा जन्म! (रडूं लागते व पडदा पडतो.)

## प्रवेश ४ था.

**स्थल**—बाबासाहेबांच्या घरांतील इंदिरेची खोली.

(इंदिरा विचारांत बसली आहे.)

**इंदिरा**—आज माझ्या वयाला १९ वर्षें होत आलीं असतील, पण बाई असले विचार कधींही माझ्या मनांत आले नव्हते. बाबांनीं माझ्या लग्नाविषयीं गोष्ट काढल्यापासून व माधवरावांविषयीं वेणूकडून मला विचारविलें तेव्हांपासून माझ्या मनांत हे विचार घोळत आहेत. काय बाई असेल तें असो. तेव्हांपासून त्यांच्या बोलण्याचालण्याकडे लक्ष द्यावें, बारीक रीतीनें स्वभाव पहावा असेंच वाटूं लागलें. सौंदर्याप्रमाणें अंतरही असेल काय, हें पहाण्याकडे किती तरी लक्ष लागलें आहे! नाहींतर आज ६–७ महिन्यांपासून त्यांचें आमच्या घरीं उठणें बसणें आहे, परंतु या गोष्टी कधींतरी बाई माझ्या मनांत आल्या का? पण दादा आणि बाबा त्यांचे गुण वर्णन करतात त्यावरही मी विश्वास ठेवूं नये का? कोण हा वेडेपणा! मना तूं कांहीं भिऊं नको. जसें तें स्वरूप तुला मोहक वाटतें आहे, त्याच्या हजार पटीनें त्यांच्या सद्गुणांवर तूं लुब्ध होऊन जाशील बरें का! (भिंतीला टांगलेली तसबीर काढून घेऊन) दादा आणि ते हातांत हात घालून उभे आहेत, किती तरी बाई एकमेकांवर प्रेम

हें! मना, आतां परीक्षा पुरी कर. दादांवर त्यांचें प्रेम आहे तितकें जरी तुजवर असलें तरी तूं आपणाला भाग्यशाली समज ( तसबिरीकडे टक लावून पहात रहाते इतक्यांत वेणू हळूच प्रवेश करते. )

**वेणू**—( एकीकडे ) किती तरी बाई पाहण्यांत गढून गेली आहे ही! आमच्या दादाचीच तसबीर असावी ही. आतां गम्मत करतें. ( हळू हळू जाऊन मागें उभी रहाते व हातांतील फूल मागून तसबिरीवर टाकून उघड ) दादा हें घे तुला फूल.

**इंदिरा**—( घाबरून तसबीर खालीं टाकते ) अग बाई कोणतें! ( इकडे तिकडे पहाते. )

**वेणू**—( पुढें येऊन ) मीती तुझी गरीब वेणू, तुझ्या आनंदांत विघ्न आणलें त्याची क्षमा कर बाई.

**इंदिरा**—ही पण काय असली थट्टा, एखाद्याला घाबरून टाकायची! अग तूं घरीं जात होतीसना?

**वेणू**—इंदिरे, तूं आपली आमच्या दादाला मन अर्पण करीत होतीस तेव्हां मी ह्मटलें, आपण फूलच तेवढें अर्पण करावें त्याला. ( तसबीर उचलून घेते ) ह्मणून थोडा-वेळ राहिलें.

**इंदिरा**—अस्सें, अस्सें, कोणाला अर्पण केलेंस तें समजलें बरेंका! आमच्या वसंताला नव्हे का? पण बाई इतका भोळा नको समजूं त्याला, नुस्त्या फुलांवर नाहीं भाळायचा बरें तो.

**वेणू**—बरें बरें, तें अझून फार दूर आहे. त्याचें काय? ( जवळ एक चोपडी होती ती घेऊन ) हें काय आहे इंदिरे!

**इंदिरा**—स्त्रियांचा धर्म या विषयावर मी निबंध लिहिला आहे तो.

**वेणू**—बरी बाई तूं मोठमोठ्या विषयांवर निबंध लिहूं लागलीस. आह्माला एखादें पुस्तक सुद्धां हातांत घ्यायची चोरी. माधव मजकडून एकदा पुस्तक वाचून घेत होता तेव्हां आमचे बाबा त्याच्यावर संतापून ह्मणाले, इला आतां शिकून काय करायचें? असले फंद आह्माला नको आहेत.

**इंदिरा**—देवा वडील माणसेंच जर असें करूं लागलीं तर उपाय काय? यांचा कधीं दुराग्रह सुटेल कोण जाणें. वडीलांचें मन दुखवावें तरी वाईट, बरें तिकडे त्यांच्यासाठीं विवेकास सोडून वागणें हेंही सत्यप्रिय मनुष्यास दुःसह होतें.

**वेणू**—बाई इंदिरे, माधव सुधारकांचा सहवास ठेवतो; त्यांचा पक्ष घेऊन बोलतो, ह्मणून बाबा त्याच्यावर फारच संतापतात. आणि त्यांत आणखी आमच्या आईसाहेब तेल ओततात. काल बाई त्याला इतकें बोलले तें ऐकून मला सुद्धां कींग रडूं आलें.

**इंदिरा**—( दीर्घ श्वास टाकून ) सखे वेणू, आमच्याशीं सहवास ठेवतात ह्मणून जर त्यांचा इतका छळ होत आहे, तर आमचें विवाहाचें घाटत आहे तें तुमच्या वडिलांस समजेल तेव्हां काय होईल कोण जाणे. मला तर बाई धडगत दिसत नाहीं. परंतु लवकर कळेल तर बरें, एकदाचें काय होणें असेल तें समजेल तरी.

**वेणू**—तो प्रसंग मात्र माधवाला कठीण जाईलसा दिसतो बाई.

**इंदिरा**—देवा, मजकरितां त्यांचा छळ होऊं देऊं नको. बाई वेणू, आतां एवढी मात्र कृपा कर कीं, तिकडे काय काय होईल तेंवढें मला कळीव.

**वेणू**—तें काय तूं मला सांगायला पाहिजेस. बरें जातें बाई आतां; इकडे आलें ह्मणून आई टोमणी मार-मारून माझा अर्धा जीव करील.

**इंदिरा**—ये तर, पण सांगितलेलें विसरूं नको बरें का?

**वेणू**—विसरेन कशी? ( जाते, पडदा पडतो. )

**प्रवेश ५ वा.**

**स्थल**—विष्णुशास्त्र्याच्या घरांतील बसायची खोली.
—आंतील भिंतीला एक दरवाजा आहे.
( विष्णुशास्त्री व गोविंदराव. )

**गोविंद०**—माधव रोज त्यांच्या घरीं जातो. तेथें गाणें, सतार वाजविणें वगैरे त्यांचें चाललेलेंच असतें. हें आपणासही माहित असेल?

**विष्णुशा०**—होय तें आहे; परंतु विवाहसंबंधीं मला मुळींच माहिती नाहीं. मागें एकदा कोणीसें विचारलें होतें परंतु मी मुळींच जबाब दिला नव्हता. कारण श्रीमंतांची कन्या गरीबांनीं करणें योग्य नाहीं. आणि त्या घरामध्यें ब्राह्मणत्व तरी राहिलें आहे कोठें? बोभाटा तुम्हीं ऐकतांच आहां.

**गोविंद०**—तुम्हीं कांहीं जबाब दिला नाहीं त्यावरून तुमचें अनुमत आहे असें ते समजले असतील. तुह्मीं साफ कायतें सांगायचें होतें. तसें कांहीं असेल तर तुह्मी लवकर सावध झालें पाहिजे. कारण इंदिरेशीं माधवाचें

लग्न होणार ही वदंता गावांत पसरली तर तुम्हाला आजच ग्रामण्य येईल. त्याची जर परवा तुह्माला नसेल तर मग खुशाल तो संबंध तुह्मी जोडा. बाकी माधवाचें व इंदिरेचें जोडपें चांगलें शोभतें व तो योग घडून यावा असें मलाही मनापासून वाटतें. ( वेणू दरवाजाच्या आंतल्या बाजूला येऊन वाती करीत बसते. )

**विष्णुशा०**—विष्णवे नमः. आह्माला तें मुळींच कर्तव्य नाहीं. हा संबंध जोडून जिकडे तिकडे काय छीःथूः करून घेऊं; आमचें कूळ काय, शील काय, आमचा धर्म कोण; या सर्व गोष्टींना आजच हरताळ लावायचा काय? तो माधव मूर्ख आहे; अशा गोष्टींच्या पुनरपि नादीं लागेल तर मजशीं गांठ आहे ह्मणावें. अहो त्याला मी रोज सांगतों कीं, त्यांच्या सभेंत जाऊं नको, त्यांच्या घरीं उठूं बसूं नको, त्यांच्या बरोबर हिंडूं फिरूं नको, लोक पहातील तर मला नांवें ठेवतील. पण तो मुळींच ऐकत नाहीं! आजकालचीं हीं पोरें आपणास मोठीं शहाणीं समजतात. याच्यासाठीं आजपर्यंत किती मी मुली पाहिल्या, परंतु त्याचें आपलें 'मला एव्हां लग्न करायचें नाहीं' हें ठरींव उत्तर आहेच. त्याला चोवीस वर्षें आज संपलीं. लोक सुद्धां हंसतात. काय करावें, हीं पोरें इंग्रजी शिकलीं कीं अशीं बिघडतात.

**गोविंद०**—तुमचा ढिला कारभार ह्मणून. पोटचा पोरगा ऐकणार नाहीं ह्मणजे काय गोष्ट आहे? तशांत माधव तर शहाणा आहे. इंग्रजी शिकला ह्मणून काय झालें. आह्मीं नाहीं इंग्रजी शिकलों? ( इतक्यांत गंगाबाई दरवाज्याकडे प्रवेश करते. )

**गंगा०**—कायग वेणे एथें बसून काय ऐकते आहेस? पुरुषांच्या गोष्टी ऐकत बसली आहे मोठी, चल एथून ऊठ.

**गोविं०**—बसेना बिचारी, काय आहे त्यांत?

**वेणू**—आई मी येथें वाती करीत बसलें आहें. ऐकायला ह्मणून मुद्दाम आलें नाहीं. आणि ऐकलें तरी इतकें आहे काय त्यांत?

**गंगा०**—ती सगळी तार पोंचेलना मग भावाकडे.

**वेणू**—( वाईट तोंडकरून ) आई कांबरें बोलतेस अशी? मी चहाड्या सांगतें कीं काय हें देवास ठाऊक आहे.

**गंगा०**—( वेणूस धरून नवऱ्यासमोर पुढें आणून ) पहा आतां तुमच्या समक्षच किती उद्धटपणा हा. एक ब्र तरीं तोंडांतून काढूं देतेका. हूं केलें कीं इच्या तोंडाचा तोफखाना सुटलाच. इकडे काय, भोळा स्वभाव बापडा पडला आहे. यांणीं पाहिजे तसा धिंगाणा घालावा. ( वेणूस हिसडावून ) काग, ए, आतां तूं नाकावर माशी सुद्धां बसूं देत नाहींसना? मोठीच साळसूद कीं नाहीं. थोड्याच दिवसांनीं बाहेर येईल बरें का. तूं मला भोळी समजत असशील पण ही नांवाची गंगा आहे, समजलीस?

( वेणू स्फुंदूं लागते. )

**गोविंद०**—छे छे तिच्याकडे काय? गरीब बिचारी.

**विष्णुशा०**—पोरीचें अंतःकरण कोमल हो. ( वेणू निघून जाते. )

**गंगा०**—हे आले कैवार घ्यायला. अशानेंच तर स्वतंत्रपणा माजला आहे हा. त्यांनीं पाहिजे तसें वागावें; इकडून सर्व दिशा मोकळ्या, गांवांत जिकडे तिकडे कुजबुज चालली आहे. त्याचा कांहीं विचार? एकदम

भंड बाहेर फुटलें ह्मणजे मग डोळे उघडणार. तेव्हांच मात्र माझ्या सांगण्याची प्रचीति येईल.

**गोविंद०**—तुह्मी नका त्याची काळजी करूं. सर्व व्यवस्था होईल. माधवराव शहाणा आहे. त्याच्या हातून वाईट गोष्ट कधीं होणार नाहीं.

**गंगा०**—नाहीं काय ? महिन्यामागें कसली मुलगी आली होती, आठ वर्षांची बरें का. पण कामाचा काळ. रूपानें कांहीं माझ्या इतकी नव्हती; पण बाई चार दागिने अंगावर घातले कीं नकटीला सुद्धां रूप येतें हो. तिचा बाप दोन हजारांचा हुंडा देत होता. शिवाय हजाराचे दागिने अंगावर. ( शास्त्रीबुवांकडे हात करून ) यांच्याही मनास आली होती. त्या मुलीच्या बापाकडे हिला आह्मी सून करूं असें बोलूनही चुकलों ; परंतु बेटे सवाई शहाणेच कीं नाहीं. ह्मणे मी नाहीं एव्हां लग्न करीत. झालें आटोपलें. इकडे लोणी विरघळलें. ( हात नाचवून ) दिवे ओंवाळा दिवे बापलेंकाच्या तोंडावरून. आतां तर एक चिन्हच ऐकतें. त्या इंदिरेला भाळला ह्मणे. केवढी हो घोडी वाढली आहे ती ! इश्श मेलें. घर तरी कसलें भ्रष्ट. अहो यांची अक्कल गेली तरी कुठें ?

**विष्णुशा०**—काय बुवा त्या पोरीचें जुळतें तर उत्तम होतें. तीन हजार रुपये किंहो चालत येत होते. आणि ग्रहसुद्धां उत्तम जमत होते.

**गंगा०**—पण तेव्हां तोंडाला खिळ बसली होतीना. शहाण्याचे चिरंजीव दीड शहाणे कीं नाहीं. मी कांहीं सांगायला गेलें कीं, हॉंव करून माझ्या आंगावर यायला तेवढें सांगा. बाळयानें जावें त्या भ्रष्ट लोकांबरोबर

मणामध्यें, नाहीं नाहीं तें खावें प्यावें, त्यांच्या समाजांत जावें, व्याख्यानें कीं फ्याख्यानें तीं द्यावीं, हल्लीं तें काय भलतेंच चाललें आहे ह्मणे, पोरींना बारा वर्षेंपर्यंत आईबापांनीं घोडया वाढवून ठेवायच्या. ती ताटका इंदिरा मोठी थोरली घोडी वाढवून ठेविली आहेच कीं नाहीं. असले हे तिरंदाज चिरंजीव! चांगले दिवे लावले. मोठा उजेड पडला आपल्या कीर्तीचा बरें का?

**विष्णुशा०**—अग झालें तें झालें. आतां चांगलाच बंदोबस्त करितों त्याचा.

**गंगा०**—हो हो असल्या पुळपुळीतपणानें केला बंदोबस्त. इकडून होत नाहीं तर मला तरी सांगायचें होऊं द्या, ह्मणजे मी बघतें कसें काय आहे तें.

**विष्णुशा०**—अग तूं उगी रहा. आतांच आणतों त्याला ताळ्यावर. मग तर झालें.

**गोविंद०**—तो आपला तुह्मीच विचार पहा. बाकी माधवरावाचें हित व्हावें हीच माझी इच्छा.

**विष्णुशा०**—वेणू, अग वेणू.

**वेणू**—( आंतून ) काय ह्मणतां बाबा. ( बाहेर येते. )

**विष्णुशा०**—माधव कुठें गेला आहे, तो तुला ठाऊक आहे?

**गंगा०**—कुठें काय विचारतां, लोळत पडला असेल त्या इंदिरेच्या घरीं.

**वेणू**—कुठें गेला मला ठाऊक नाहीं, बाबा.

**गोविंद०**—बरें मी येतों आतां शास्त्रीबुवा. मला खरेंच एके ठिकाणीं जायचें आहे. ( उठतो. )

**विष्णुशा०**—येतां, बरें या. पुनः भेटा बरें.

**गोविंद०**—ठीक आहे. ( आपणाशींच ) भेटणार कां नाहीं, हजारदां. येथवर तर सोळा आणे काम झालें. गंगा-बाईनेंही बहार केली. उद्यां याचा परिणाम पाहून मग पुढच्या तजविजीस लागायचें. ( जातो. )

**गंगा०**—( वेणूस ) तुला नाहींग ठाऊक, माधव कोठें गेला तो? बरीग बाई समुद्रांत बुडी मारून कोर-डीच्या कोरडीच निघतेस. वसंताकडे नाहींग गेला?

**वेणू**—आई, मला त्यानें नाहीं सांगितलें. ( जाते. )

**गंगा०**—तूं अशी थोडीच सांगशील. बारा बंदरांचें पाणी प्यालेली तूं. ( शास्त्रीबुवांस ) पाहिलंना. हे गोविंदराव कसे आहेत. माधव मित्र ह्मणून त्याची कशी बाजू संभाळीत होते. ते नाहींत का इंग्रजी कीं फिंग्रजी तें शिकले. पण किती सात्विक! कधीं कुठें गव-गवा आहे त्यांचा? नाहींतर तोच तुमचा दिवटा बाळ, शहरांत जसा पोळ सोडला आहे. आणि गांवभर धांडोरा पिटला आहे. लोकांना मात्र शास्त्रें सांगता आणि आपल्या पायांखालीं काय जळतें आहे त्याचें भान कोणास आहे. मी हांसतें लोकां आणि शेंबुड माझ्या नाका. कांहीं तरी या जळक्या मनाला वाटलें पाहिजे ना.

**विष्णुशा०**—अग, हें बघ, मी तरी काय करूं, किती सांगूं. इंग्रजी शिकविलें त्याचें फळ ह्मणावें झालें. ( इतक्यांत माधवराव हातांत कांहीं कागद घेऊन प्रवेश करतो त्याच्याकडे पाहून ) कारे, कोठें गेला होतास? हें हातांत काय आहे?

**माधव०**—परवां संमतिवयाच्या कायद्याच्या संबंधानें सभा होणार आहे तिकडे काय व्यवस्था चालली आहे ती

पहाण्याकरितां गेलों होतों, या त्या संबंधाच्या जाहिराती आहेत.

**विष्णुशा०**—त्या ठेव गुंडाळून एकीकडे. आणि तुला कांहीं विचारतों तें नीट सांग. ( गंगाबाई एकीकडे जाऊन ऐकत रहाते. )

**माधव०**—(एकीकडे) आज आईसाहेबांनीं कांहीं मंत्र फुंकला आहेसा दिसतो. ( उघड ) कायतें बाबा?

**विष्णुशा०**—अरे, हे फंद सोडून दे ह्मणून किती वेळां रे तुला सांगितलें? त्या वसंतरावाच्या व दुसऱ्या धर्मनिंदकांच्या नादीं लागून कां माझें काळें तोंड करवितोस? घरीं देवांस पाणीही घालीत नाहींस. आपणच मोठा शहाणा समजून धर्माविरुद्ध व्याख्यानें देतोस; वैदिक धर्माची निंदा करतोस, आणि त्या नास्तिकांशीं व्यवहार ठेवतोस. हें मला या उपर सहन होणार नाहीं. तूंच काय मोठा विद्वान् झालास? आह्मी, आमचे पूर्वज सर्व मूर्ख काय? तूंच काय एकटा इंग्रजी शिकलास? तो गोविंदराव पहा, कसा इंग्रजी शिकूनही, चालचलनानें शुद्ध आहे. दूर कशाला ते रावसाहेब, केवढे विद्वान्. पांच परीक्षा झाल्या, मोठमोठ्या वकिलांस सुद्धां दाद देत नाहींत. तुझ्या सारख्यांना ते आज शिकवीत आहेत. जगमान्य वर्तमानपत्र चालवीत आहेत. परंतु धर्मासंबंधानें त्यांचें आचरण कसें? आपल्या वर्तमानपत्रांतून कसा हिंदुधर्माचा अभिमान धरून भांडतात. तसेच ते कृष्णाजीपंत, किती तरी धर्मनिष्ठ. हे नाहींत का इंग्रजी शिकलेले! ते दादासाहेब पहा, सुधारकांसारखे जरी बोलतात, व्याख्यानें देतात, तरी तुमच्यासारखा हिंदुधर्म सोडून दिल्याचा किंवा प्रस्तुत रूढी-

विरुद्ध आचरण केल्याचा कधीं तरी गवगवा आहे? गण-पतिपूजन वगैरे सर्व कांहीं करितात. तोंडानें व्याख्यानें दिलीं आणि पुष्कळ बडबडले ह्मणून काय झालें. वागत तर तसे नाहींत. मूर्तिपूजा वगैरे गोष्टी तर त्यांनीं सोडल्या नाहीं. आणि तुह्मीच कोण एवढे मोठे विद्वान्. त्यांच्यापेक्षां तुह्मी कालचीं पोरें शहाणे झालांत कायरे?

**माधव०**—बाबा, आपली आज्ञा असेल तर खरें कायतें सांगतों.

**विष्णुशा०**—कायतें? काय सांगतोस?

**माधव०**—बाबा, मी जें कांहीं बोलतों व करतों त्या-विषयीं लोक येऊन पराचा कावळा करून सांगतात. तेणेंकरून आमच्याविषयीं आपले ग्रह वाईट होत आहेत. याचें कारण हे मधले लावालावी करणारे लोक. पूर्वा-पार वेदकालापासून जी धर्मामध्यें व आचारविचारामध्यें कालानुरोधानें सुधारणा होत आली आहे, तिलाच अनु-सरून आह्मी वर्तत आहों असें मला वाटतें. कोणत्याही समाजाचा मी कांहीं सभासद झालेला नाहीं; परंतु हीं धर्ममतें अगदीं खरीं आहेत असें मला वाटतें व त्यांत आह्मांला समाधानही वाटतें, याला निरुपाय आहे. आपल्या मनांत कोणी दुष्टांनीं भरून दिलें आहे कीं मी, वसंत व दुसरे समाजाचे लोक मिळून भ्रष्टाचार करितों, मद्य, मांस वगैरे असेव्य पदार्थांचें सेवन करतों, परंतु ह्या गोष्टी अगदीं खोट्या आहेत. नीच लोकांनीं द्वेषबुद्धीनें हा आमचा बोभाटा केला आहे. हे बोभाटा करणारेच लोक पाहिजे तसा आनाचार करितात व बाहेरून हिंदुधर्माभिमान्याचें ढोंग दाखवितात. ह्मणूनच लोक त्यांना धार्मिक,

हुशार व विद्वान् ह्मणतात. आणि आह्मी सरळ मार्गानें चालतों यास्तव भ्रष्ट व मूर्ख ठरलोंना ? दूर कशाला, ज्या विद्वान् रावसाहेबांचें आतां आपण उदाहरण दिलें, त्यांचीच गोष्ट पहा; त्यांच्या वर्तमानपत्रांतील लेख पहा. एकदा हिंदुधर्माभिमानी बनतील, दुसऱ्यान्दां सुधारकांचें पांघरूण घेतील, आणि मनांतून तिसरेंच असायचें. आतां ते कृष्णाजीपंत सांगून सवरून शाक्तच आहेत त्यामुळें त्या शाक्तधर्मपालनार्थ ह्मणा किंवा लपवाछपवीमध्यें प्रवीण ह्मणून ह्मणा, मद्य, मांस वगैरे पदार्थ ते यथेष्ट खातात पितात. आणि पाहिजे तसें आचरण करतात. इतकें करूनही ते मोठे धार्मिक व हिंदुधर्माचे पुढारी बनलेलेच आहेत.

**विष्णुशा०**—अरे, तसें जरी कदाचित् असलें तरी त्यांचा लोकांत बोभाटा नाहीं ना? दृष्टि आड तें सृष्टि आड असें ह्मटलें आहे. आणि रूढि असेल तिला अनुसरलेंच पाहिजे, ह्मणून शाक्त आहेत त्यांना तसें वागावें लागतें, आणि तसें वागतात ह्मणूनच त्यांची वहावा होते. धर्माच्या गोष्टींत कधींही शंका घेऊं नये. ते आपल्या धर्माप्रमाणें रूढीस अनुसरून वागतात व खातात, पितात. ह्मणूनच मी कृष्णाजीपंतांचें उदाहरण दिलें. तसेंच दादासाहेबांचें पहाना. ते जरी मोठमोठ्या सभांत जाऊन व्याख्यानें देतात व चालू रूढीस नांवें ठेवतात तरी तें सर्व तोंडच्या तोंडीं. स्वतःवर प्रसंग आला कीं, मूर्तीच्या पुढें नाकें घासूं लागतात. हें कां तर रूढीचें महात्म्य व हिंदुधर्माचें खरें तत्व त्यांस समजलें आहे ह्मणून, समजलास ?

**माधव०**—बाबा, आपण पाहिजे तर ह्मणा तसें; परंतु

मला तर असल्या वर्तणुकीचा किळस येतो. बोलायचें एक आणि आचरण भलतेंच हें कांहीं मनुष्यास शोभत नाहीं. असले लोक दोन्ही पक्षांस फसवूं पहातात असें ह्मटल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं.

**विष्णुशा०**—अरे तुह्मी मूर्ख आहांत. आपलाच शहाणपणा मिरविला पाहिजे. मोठमोठ्या विद्वानांला नांवें ठेवून हीं कालचीं पोरें चाललीं धर्मसुधारणा करायला. पुरे कर हे फंद आतां. असला भ्रष्टाकार नाहीं कामाचा; समजलास. याउपर त्या भ्रष्ट लोकांच्या नादीं लागशील तर खबरदार. पूर्वापार चालत आलेल्या रूढीवर विश्वास ठेवून त्याप्रमाणें तुला चाललें पाहिजे.

**माधव०**—बाबा, निरुपायास्तव मी आपणांस खरें तेंच सांगतों कीं, ज्या गोष्टींवर माझा विश्वास नाहीं त्यांवर माझा विश्वास आहे असें लोकांस दाखवून फसविणें मला पातक वाटतें. आणि माझें मन मलाच खाऊं लागतें; यासाठीं माझ्याच्यानें तसें होऊं शकत नाहीं. बाबा, मी उघड बोललों त्याची मला क्षमा करा, आणि मजवर दया करा.

**विष्णुशा०**—( संतापून ) फार बोलूं लागलास किरे. तुला आतां निक्षून सांगतों असल्या फंदांनीं तुला हें घर सोडून जावें लागेल! काय करूं इंग्रजी फळली ही!

( गंगाबाई पुढें येते. )

**गंगा०**—हीं लाडीगोडीचीं व्याख्यानें पाहिजेत कशाला पण? सांगायचें तें एकदम सांगून टाकावें. आजकाल मेली उलटीच दुनिया. बापांनाच पोरें व्याख्यानें देताहेत पहा कशीं तीं! असल्या दिवट्यांचे उपदेश ऐकून घ्या वाटोळें करून एकदाचें.

**माधव०**—आई, तूं ह्मणतेस तें कांहीं खोटें नाहीं. दुनिया हल्लीं उलटीच झाली. बापांला मुलें व्याख्यानें देतात, नवऱ्यांना बायका शिकवितात, सतींना वेश्या हंसतात; धार्मिकांचा धर्मभ्रष्ट लोक छल करितात, हाच प्रकार जिकडे तिकडे माजला आहे.

**गंगा०**—काय ह्मणलेंस, (संतापून) माझ्याशीं असली वटवट नाहीं चालायची, समजलास! इकडे कांहीं तरी लाज वाटते आहे का ऐकून घ्यायला हें? सांगतां कीं नाहीं एकदम याला काय तें, कीं पुन: बोबडी वळली? असल्या कुलास कलंक लावणाऱ्या पोरांना फूस देऊन तर या थरास गोष्ट आली आहे ती.

**विष्णुशा०**—अग तूं उगी रहा जरा, मी सांगत आहें त्याला.

**माधव०**—झालें तरी काय असें मजकडून? कसला कुळाला कलंक लावला? मी काय कोणाची चोरी केली कीं कोणाचा खून केला कीं वेश्यांच्या संगतीला लागलों? हें कांहींच मजकडून झालें नाहीं.

**गंगा०**—भोळारे भोळा. कशी नाकाला जीभ लावूं पहातो. त्या समाजांत जाऊन भ्रष्टाकार मांडला आहे सारा. काय केलें ह्मणून विचारायला लाज नाहीं वाटत? जा त्या अवदसेच्या घरीं मौज मार. मेल्यांनीं घोडी वाढवून ठेविली आहे, आणि लावतात मग स्वयंवर. भ्रष्टाकार सगळा; वेश्यांना आणखीं काय शिंगें असतात. असल्या चेटकिणीशीं लग्न करूं पहाणाऱ्या मेल्यांना जगाची शरम कोठें आहे?

**माधव०**—(रागानें लाल होतो; परंतु आवरण्याचा यत्न करून ) काय! असले घाणेरडे शब्द उच्चारून आपलें तोंड कां विटाळतेस? जा जा घरांत जा एकदाची.

**गंगा०**—( दांत ओंठ चावून तोंडांत मारायाला धांवते परंतु माधवराव मागें सरतो.) मेल्या तुझा सत्यनास झाला तो, तोंड टाकून बोलतोस, मला जा ह्मणतोस. निघ, येथून तोंड घेऊन, काळें कर एकदाचें, मेल्या. (माधवराव खालीं पहात रहातो. )

**विष्णुशा०**—( तिला धरून ) अग हें काय! संतापतेस कां इतकी? जा, आंत जा.

**गंगा०**—जीव घेईन मेल्याचा जीव; नाहींतर मी तरी देईन, सोडा. खबरदार हात लावला तर. मेल्याचा कैवार घेऊन मला जा ह्मणतां, ही चाललें पहा. (कपाळावर हात मारून. ) मेला देव सुद्धां कां मला नेत नाहीं. ( शास्त्रीबोवांस हिसका देवून धडपडत जाते. )

**विष्णुशा०**—( घाबरून ) काय हें पहा आतां; रागाच्या तडाक्यांत कांहीं तरी करून घेईल ती. तिच्या मागें जावें हेंच खरें. ( जातो. )

**माधव०**—( चिंतातूर) देवा ही सावत्र आई. आणि हे सावत्र मुलांचे सोहळे. धिक्कार असो असल्या संसाराला. ह्मणूनच त्या बिचाऱ्या साधुपुरुषांनीं ह्या नरकवासतुल्य संसारास लाथ मारून अरण्यवास पत्करिला असावा. असल्या स्त्रियांच्या योगानें राज्येंच्या राज्यें ओसाड झालीं. मोठमोठीं राजघराणीं धुळीस मिळालीं. दशरथासारखे राजे प्राणास मुकले. रामचंद्रासारख्या सत्वशील राजपुत्रास सुकुमार पत्नीसह दुर्धर वनवास कंठावा लागला. तेव्हां

आमची काय दशा होणार हें उघड दिसत आहे. हरहर! मग काय, ह्या घराचा त्याग करून मला जावें लागणार काय? हाय हाय! हे विचार तर भयंकर आहेत. मी गेलों तर माझ्या वेणूची काय दशा होईल? तिला पाठीराखा कोण? हा कठोर जाच ती कशी साहील? अरेरे, काय करूं? कांहींच सुचत नाहीं. (थांबून) बाबा, या ह्यातारपणामध्यें नका लग्न करूं नका लग्न करूं असें सांगत असतांना, आपमतलबी लोकांच्या भरीस पडून शेवटीं, याप्रमाणें सर्व संसाराची, आह्मा दुर्दैवी पोरांची व आपली दुर्दशा केलीत हो केलीत! हाय! (इतक्यांत पडद्यापलीकडे गडबड होते व मोठी ओरड ऐकूं येते—धांवा! लौकर! दादा धांव! आई विहिरींत उडी टाकते आहे. आह्माला आटोपत नाहीं. आई! अरे देवा!—पडदा उघडतो.)

**माधव०**—(घाबरून) आँ—कोण अनर्थ हा! (धांवतो. गंगाबाई, केंश मोकळे सोडलेली, अस्ताव्यस्त, विहिरीच्या कांठावर उभी आहेशी दिसते, बाहेरून विष्णुशास्त्र्यांनीं व वेणूनें तिला धरलें आहे. सुटण्यासाठीं वेणूस मारते, शास्त्रीबुवा विनवणी करताहेत, इतक्यांत माधवराव जाऊन धरतो व सर्वजण मिळून तिला कांठावरून खालीं उतरतात.)

**गंगा०**—(छाती बडवून) मेल्यांनीं माझा छल मांडला आहे! सोडा मला!

**विष्णुशा०**—(केवीलवाणें तोंड करून) अग नकोग, हें काय करतेस, क्षमा कर, तूं सांगशील तसें करतों; पण एकदांची शांत हो.

**गंगा०**—अरेरे चांडाळ पुनः आला समोर, काळें कर मेल्या. काढा आतांच घराबाहेर याला.

**माधव०**—( दुःखानें ) आई मला क्षमा कर, दया कर, तुझ्या पायां पडतां. ( पाय धरूं जातो. )

**गंगा०**—( लाथ मारते, माधवराव मागें पडतो. ) मर मेल्या, काढतां कीं नाहीं याला घराबाहेर?

**वेणू**—( माधवास मिठी मारून ) आई नको गे नको, पहा दादा रडतो आहे! आई रागावूं नको आह्मांवर.

**विष्णुशा०**—अगे मजकडे तरी पाहून काय करणें तें कर. ( कपाळावर हात मारून ) हाय दुर्दैवा! फसलों रे फसलों!

**माधव०**—(खेदानें उठून छातीवर हात मारून) धिक्कार माझ्या जिण्याला! माझ्यामुळें हें सर्व ना! असा मी अधम चांडाळ तुह्माला दुःख देण्यास कारण झालों! हें पहा काळें केलें! ही शपथ घेतली! याउपर या घरांत पाय ठेवीन तर हराम–हाय–बाबा–( बापाच्या पायांवर पडतो. ) जातों मी.

**गंगा०**—( पाय आपटून ) खेटर गेलें. जा मर मेल्या. ( निघून जाते, माधव उठतो. )

**वेणू**—रडून माधवरावाच्या गळ्यास मिठी मारून) दादा–शपथ नको घेऊं–नको जाऊं–मला कोण–मी कशी राहूं?

**विष्णुशा०**—हाय! माझा सर्वस्वीं नाश झाला!

**माधव०**—(अति दुःखानें वेणूची मिठी सोडवून) बाळे, सोड मला आतां.–बाबा या हतभागी पोरावर एकदां तरी कृपादृष्टीनें पहा. (रडून) मी-जा-तों आतां. (जाऊं लागतो.)

**वेणू**—( मागें धांवून कंबरेस मिठी मारून ) नको–दादा नको जाऊं–मी येतें.

**विष्णुशा०**—( गहिंवरून ) नको रे, नको जाऊं, मागें फीर!

**माधव**०—( कपाळावर हात मारून ) हतभागी मी, दुष्ट, या सर्व तुमच्या दुःखास कारण आहें! बाबा या घरांत रहाण्यास मी योग्य नाहीं! माझ्यामुळें तुम्हांला दुःख नको. ( वेणूची मिठी सोडवून ) देवा, इला तुजशिवाय आतां कोणी नाहीं. ( जातो.)

**वेणू**—( धरायला जाते. ) दादा,–गेला हो माझा पाठीराखा.–हायरे दैवा. ( कपाळावर हात मारून खालीं पडते. )

**विष्णुशा**०—काय! माधवा, अरे मला टाकून गेलास! ( छातीवर हात मारून ) हा स्त्रीलंपटा, अधमा, घात करून घेतलास. ( मागें पडतो. इतक्यांत पडदा पडतो. )

अंक पहिला समाप्त.

---

## अंक २.

### प्रवेश १ ला.

**स्थल**— बाबासाहेबांच्या घरांतील दिवाणखाना.

( बाबासाहेब, दादासाहेब, वसंतराव. )

**दादासाहेब**—असल्या गोष्टींना विघ्नें तर येणारच. हें पहा, धर्मसुधारणा, सामाजिक सुधारणा ह्या ज्या गोष्टी आहेत त्या कांहीं सहज रीतीनें होणाऱ्या नव्हत. हे लोक नाहीं नाहीं त्या प्रकारें अडथळे आणणारच. परंतु असल्या अडथळ्यांना मुळींच जुमानतां कामा नये. भ्यालें कीं ते अधिकाधिकच पिच्छा पुरविणार. यासाठीं हीं कामें नेटानेंच पुढें चालविलीं पाहिजेत. वसंतरावासारख्या तरुण लोकांनीं तर अशा समयीं खूब नेट धरला पाहिजे ! खरें कीं नाहीं बाबासाहेब ?

**बाबासाहेब**—यांच्या वरतींच कायतें आतां सर्व अवलंबून आहे. आमचें काय आतां. परंतु दादासाहेब, तुह्माला वाटतें काय, परवा व्याख्यानाचे वेळीं गडबड होईलशी ?

**दादा०**—नियम सांगवत नाहीं. आपण आपला पूर्वींच बंदोबस्त करून ठेवावा तो चांगला.

**वसंत०**—ते लोक दंगा करण्याच्या तजविजींत आहेत असें माझ्या कानावर आलें आहे खरें.

**दादा०**—तर मग असें करावें, वसंतराव तुह्मीं आणि माधवराव दोन वह्या घेऊन दरवाज्यावर उभे रहा. दोन पोलीसचे शिपाईही तुह्मांबरोबर असूं द्या. आणि जो आंत येण्याची इच्छा दर्शवील त्याला सांगा कीं, ज्यांचीं

संमतिवयाच्या कायद्यास अनुकूल मतें असतील त्यांनीं यावर सही करून मग आंत जावें. ही सभा केवळ सह्या घेण्याकरितां आहे. समजलासना?

**वसंत०**—हो हो हेंच ठीक.

**बाबा०**—असें केल्यानें सभेंत फार बोलण्याची व वाटाघाट करण्याचीही गरज रहाणार नाहीं.

दादा **बाबा०**—ठीक आहे, याचप्रमाणें व्यवस्था ठेवायची. मी येतों बाबासाहेब.

**वंसत०—बाबा०**—( उठतात. ) बरें आहे.

( दादासाहेब जातात. )

**बाबा०**—वसंता इंदिरेला तें मघां लिहिण्याकरितां दिलें होतें तें झालें काय? बोलाव पाहूं तिला. ( वसंतराव जातो व इंदिरेस घेऊन येतो. )

**इंदिरा**—बाबा तें मी सगळें लिहून टाकलें आहे. आणूं का? (इतक्यांत एक मनुष्य लगबगीनें प्रवेश करितो.)

**मनुष्य**—माधवराव कुठें घरांतून निघून गेले.

**बाबा०**—काय?

**वसंत०**—माधवराव गेला?

**इंदिरा**—अगबाई! ( कावरीबावरी मुद्रा होते. )

**मनुष्य**—गंगाबाईची व त्यांची कांहीं बोलाचाली झाली. ह्मणून ती विहिरींत उडी टाकायला जात होती. तेव्हां सर्वांनीं धरली, आणि माधवराव तिच्या पायां पडून क्षमा मागत असतां तिनें त्याला लाथ मारिली, तेव्हां काळें तोंड करितों अशी शपथ घेऊन ते निघून गेले.

**वसंत०**—कोण चांडाळीणही. कशी त्याच्या पाठीस हात धुवून लागली आहे.

**इंदिरा**—( डोळ्यांतून अश्रु वाहातात. एकीकडे ) देवा, काय संकट हें. ( उठून जाते. )

**वसंत०**—बाबा, मी जाऊन चौकशी करून येतों.

**बाबासा०**—जा, पण कांहीं गडबड करूं नको. (वसंतराव जातो.)

**बाबा०**—( आपणाशींच ) अरे काय झालें हें! कांहीं भलतेंच तर करून घेतलें नसेलना त्यानें! कुठें देशांतराला निघून गेला, किंवा आत्महत्या करण्याच्या विचारानें गेला? आत्महत्या नाहीं करणार. पण काय नियम, तारुण्यावस्थेंत मनुष्याचा राग अनावर असतो. कांहींच समजत नाहीं. हें काय संकट ओढवलें. इंदिरा आतां काय दशा करून घेईल कोण जाणे. ( विचार करून ) असो ईश्वराची इच्छा!

## प्रवेश २ रा.

### स्थल—इंदिरेची खोली.

( इंदिरा पलंगाच्या कांठावर मस्तक टेंकून पडलेली दिसते. )

**इंदिरा**—( कांहीं वेळानें मान उचलून कपाळावर हात मारून ) हाय दुर्दैवा, इतक्यांतच माझ्या सर्व आशेचा विध्वंस केलास काय? इतकी ममता लावून जाणें आवडलें तरी कसें! अग बाई, कोण असली आई असेल. पाय धरले असतां लाथ मारून घालवून दिलें ना! हाय हाय, तेव्हां काय दशा झाली असेल! तें हृदय किती विव्हळ झालें असेल! त्वेष आला असेल ग बाई! अरे दैवा रागांत कांहीं भलतेंच तर करून घेतलें नसेलना! ( कावरीबावरी होऊन ) नको ग बाई नको, असले घातक विचार नकोत. आतां काय तरी करूं देवा, ( थांबून ) जातेंच. ( उठते ) पण कुठें? अरे देवा, काय मला होतें हें? ( इतक्यांत बाबासा-

हेब व वसंतराव प्रवेश करतात. त्यांस पाहून दचकून ) बाबा—तुह्मी! दादा आलास काय?

**वसंत०**—इंदिरे घाबरूं नकोस, त्या माणसानें सांगितलें तेंच खरें. माधवराव कुणीकडे गेला असावा त्याचा पत्ता लागेल. मी जातों; आतां शोधून आणतों. गड्याला गाडी तयार करायला सांगितली आहे. इंदिरे तूंही चल येत असशील तर. ( इंदिरा बापाकडे पहाते. )

**बाबा०**—बरें घेऊन जा तिला. ( सर्व जातात. पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा.

**स्थल**—बागेंतील आंबराई.

( माधवराव विचारांत निमग्न झालेला असा प्रवेश करितो. )

**माधव०**—( दीर्घ श्वास टाकून ) देवा मी वेडा तर होणार नाहींना! या नाना तऱ्हेच्या विचारांनीं माझें मस्तक भगाणून सोडलें आहे. हें दुःखानें विव्हळ झालेलें मन कसकसें ह्मणून भटकत आहे? (मना, तुझ्या बरोबर हे पाय कसे धांवूं शकतील!) (थांबून) भटकतां भटकतां दोन प्रहर सुद्धां झाले. ( उपरण्याच्या पदरानें वारा घेऊन ) हें वरून कडकडीत उन्ह, खालीं जमीन तापून वाफेच्या लहरा चालल्या आहेत, त्यामुळें अंगाची लाही लाही होत आहे. हा सूर्य सुद्धां मजवर संतप्त झाला काय? या वायूला सुद्धां माझ्या शरीरास स्पर्श करण्याचा वीट आला ना! कां न येईल? ( कपाळास हात लावून ) दुर्दैव्या, सर्वांना तुझा तिटकारा आला. मग जगलास तरी कशाला? ( थांबून ) अरेरे या भूकेनें व तहानेनें तर माझे प्राण कासावीस करून सोडले. ( पुढें चालून ) तो हिरवागार बाग दिसतो आहे

तिकडे तरी जाऊं. हे वृक्ष पहा फळांनीं लादले आहेत. ही सीताफळ कशी फळभारानें लवून गेली आहे. कांहीं पिकलीं सुद्धां. दोन तीन तोडावींत. (तोडण्यासाठीं हात पुढें करतो, परंतु एकदम मागें घेऊन ) अरे, हें काय! धडधडीत चोरी! धिःकार या जीविताला, अरे अधमा, भूक लागली ह्मणून तूं चोरी करण्यास प्रवृत्त झालास काय? दैवगति विचित्र ह्मणतात ती खरी. ( विचार करून ) कोणी बागवान असेल तर त्याजकडून मागून तरी घेऊं. ( इकडे तिकडे फिरून ) कोणी नाहीं. काय ही निराशा! ईश्वरेच्छा! दुर्दैव येऊं लागलें ह्मणजे चारी दिशांनीं आ पसरून येतें. (थांबून) हाय हाय, अगदीं थकून गेलों. देवा पाणी तरी मिळेल काय? ( पुढें जाऊन) हा पाट वाहत आहे. हेंच पाणी पिऊन थोडीशी विश्रांति घ्यावी. ( पाणी हातांनीं पितो व झाडाखालीं पडतो ) अरेरे, आज नुस्त्या जमिनीवर या खडयाकांट्यांमध्यें पडण्याचें माझ्या कपाळीं आलें ना? होय! आतां असाच वनवास काढायचें माझ्या नशिबीं आहे. ( झोंप लागते. कांहीं वेळानें इंदिरा व वसंतराव प्रवेश करतात. )

**इंदिरा**—( डोळ्यांत आसवें आणून) दादा, त्या माणसाच्या सांगण्यावरून तर या शहरांत सुद्धां ते राहिले नसावेतसें वाटतें.

**वसंत०**—अशी घाबरूं नको. त्यानें नाहीं का सांगितलें कीं, या बागेकडे त्याला जातांना पाहिलें ह्मणून. प्रथम एथें तर शोध करूं. तूं दरवाजावर गाडींतच राहिली असतीस तर बरें झालें असतें. मजबरोबर तूं थकून जाशील.

**इंदिरा**—मला काय होतें आहे? (एकीकडे) देवा, त्यांची कुठें काय दशा होत असेल? आणि मी खुशाल गाडींत बसून चाललें आहेंना. (इकडे तिकडे फिरतात.)

**वसंत०**—(दूर पाहून) इंदिरे, तें पहा तिकडे कोणी निजलेलें दिसतें आहे. चल पाहूं लवकर. (जवळ जातात.)

**इंदिरा**—(माधवरावास ओळखून) तेच ग बाई तेच. (भान विसरून धांवूं लागणार इतक्यांत वसंताकडे पाहून लाजून थबकते.)

**वसंत०**—पाहिलेंस. सांगत होतों तसेंच झालें; आतां कसा आनंद झाला.

**इंदिरा**—(लाजून) हेंच तुझें आपलें कांहीं तरी. (माधवरावाकडे पाहून एकीकडे) अग बाई, कोण दशा झाली आहे! कांटे सुद्धां रुतले असतील ना, देवा!

**वसंत०**—इंदिरे, प्रथम माधवराव निघून गेला हे शब्द ऐकून जितकें मला दुःख झालें होतें तितकाच याला पाहून आतां आनंद होत आहे. केव्हां जाऊन त्याला कडकडून भेटेनसें झालें आहे. परंतु एक गोष्ट आतां केलीच पाहिजे. या वेळीं याचे काय विचार आहेत व पुढें काय करण्याचा याचा उद्देश आहे हें समजलें तर पुढें आपणास तशा तजविजीनें वागतां येईल. यासाठीं आपण या झाडामागें लपून राहूं व याच्या अंगावर पानेंबिनें टाकून त्याला उठवूं, ह्मणजे मग तो काय बोलतो व करतो तें समजेल. तूं मात्र जरा धीर धर, कसें?

**इंदिरा**—(एकीकडे) अरे देवा, याचें कोण कठोर मन हें; एकीकडे आड आणि एकीकडे विहीर असें झालें

आहे. ( उघड ) दादा तुझी तशी इच्छा आहे तर ठीक आहे.

**वसंत०**—तुला हें आवडणार नाहीं हें मी जाणतों. परंतु त्याचा उद्देश कळेल तर बरें.

**इंदिरा**—( लाजून ) दादा तसें नव्हे—ह्मटलें—बरें चल तर. ( दोघें झाडामागें लपतात. वसंतराव माधवरावाच्या अंगावर पानें टाकतो. )

**इंदिरा**—( माधवाकडे टक लावून पहात रहाते ) मना डोळे भरून पहा! अहा, परमेश्वरा धन्य केलेंस मला, पण कोण कठीण हृदय माझें तरी बाई. त्यांना अशा स्थितींत पाहून मी आनंदच मानितें ना! ( इतक्यांत माधव त्रासल्यासारखें करून डोळे चोळीत उठून बसतो. )

**इंदिरा**—( एकीकडे ) धांवून घट्ट पाय धरूं काय?

**माधव०**—या चमत्कारिक स्वप्नांनीं सुद्धां माझी पाठ पुरविली! काय मला असें होत आहे कोण जाणें. अरे, दिवसरात्र येथेंच बसून मी घालविणार कीं काय? (थांबून) काय? बैरागी होऊन कोठें तरी निघून जाऊं? छे! हा तर अगदींच अविचार! ईश्वरानें हें मानवशरीर व ही अमूल्य बुद्धि दिली आहे ती काय बैरागी होऊन आळशासारखें भटकून दुसऱ्यांच्या मेहनतीवर उदरभरण करण्याकरितां! मनुष्याच्या हातून कांहीं परमार्थ घडला नाहीं व कांहीं देशसेवा घडली नाहीं तर पशूंत आणि त्याच्यांत अंतर तें काय? ( थांबून ) आईबापांनीं घरांतून घालवून दिलें ह्मणून काय झालें, ( वर डोळे करून ) तो दयासागर पिता तर आपल्या अंकावरून मला दूर लोटणार नाहीं! मग आणखी मला काय पाहिजे. शिवाय आपल्या

हृदयाशीं धरणारीं माणसेंही त्यानें पैदा केलीं आहेत ना! अहा! ते बाबासाहेब, किती धर्मशील, कोण मजवर त्यांचें प्रेम! तो जिवलग मित्र वसंतराव, केवढे त्याचे मजवर उपकार! किती शुद्ध अंतःकरणानें मजबरोबर तो वागतो. अहाहा! त्यांच्या सहवासांत मी असें तेव्हां कोण तो आनंद! तें घर ह्मणजे सदाचरणाचें केवळ वसतिस्थान होय. ती माझी प्रिया! सद्गुण मंजरी! या पृथ्वींतील एक अमूल्य रत्न आहेना! आणि हें रत्न ईशकृपेनें हातीं येत असतांना दूर ढकलून मी बैरागी होईन ह्मणतों! छीः छीः! मजसारखा अविचारी प्राणी या दुनयेंत कोणी नसेल. (थांबून) अहाहा! लाडके, माझ्या जीवनाचा व सुखाचा आधार काय तो तूं आहेस!

**इंदिरा**—(एकीकडे) अहाहा! धन्य झालें मी! अग बाई (छातीवर हात ठेवून) पण माझ्या हृदयांत काय असें होतें हें! (वसंताचा हात धरून हळूच) दादा मला घेरी येते! मला धर (वसंत धरतां धरतां मूर्च्छित होऊन वसंताच्या अंगावर पडते.)

**वसंत०**—(घाबरून मोठ्यानें) अरेरे, हिला मूर्च्छा आली! धांवा!

**माधव०**—(चकित होऊन चोहोंकडे पाहून) आँ! हें काय आश्चर्य! कोण, कुठें ओरडतें!

**वसंत०**—माधवा धांव, इंदिरा मूर्च्छित झाली! पाणी आण लौकर.

**माधव०**—(गडबडून उठून) कोण, वसंत, (त्यांच्याकडे पाहून धांवतो) आँ, इंदिरा मूर्च्छित! हा काय अनर्थ!

**वसंत॰**—पाणी आण लौकर, इला सावध करूं दे. ( माधवराव लौकर जाऊन ओंजळींतून पाणी आणून इंदिरेला पाजतो व डोळ्यांस लावतो आणि उपरण्याच्या पदरानें वारा घालीत रहातो—इंदिरा हळू हळू सावध होऊं लागते. ) इंदिरे, इंदिरे सावध हो, मजकडे पहा!

**इंदिरा**—( वसंत व माधव यांजकडे पाहून उठून बसते. )

**माधव॰**—हें आहे तरी काय?

**वसंत॰**—इंदिरे कसें वाटतें तुला आतां, असें काय केलेंस तें?

**इंदिरा**—( लाजून ) कांहीं नाहीं एरवीच तें.

**माधव॰**—अरे तुह्मी एथें कशीं? आणि हिची अशी दशा कां ही?

**वसंत॰**—माधवा, तूंच कारण आहेस याला.

**माधव॰**—काय मी? मजमुळें इला सुद्धां दुःख? असो, नशीब!

**इंदिरा**—दादा, असें काय ह्मणतोस तूं? उष्णतेनें माझें पित्त भडकलें व मूर्च्छा आली; आणि तूं आपलें तिकडेच लोटूं लागलास!

**वसंत॰**—माधवा, चुकलों क्षमा कर!

**माधव॰**—क्षमा कशाबद्दल. पण तुह्मी येथें कशीं!

**वसंत॰**—कशीं, काय विचारतोस. तूं निघून गेलास हें ऐकून आमची काय दशा झाली होती हें आतां सांगतां येणार नाहीं. तेव्हांपासून इंदिरेच्या डोळ्यांतील पाणी खळलेंच नाहीं. तसेच शोध करीत धांवलों. सम-जलास?

**माधव०**—( दुःखानें ) वसंता, माझें दुर्दैव तुझालाही भोंवतें कायरे ? असो उपाय नाहीं! इला तरी आणायचें नव्हतेंस. दुःख शांत करून मी येणार होतोंच.

**वसंत०**—आणायचें नव्हतेंस ह्मणजे. इची त्या वेळची अवस्था पाहून बाबांनींही 'इला घेऊन जा' असें ह्मटलें.

**माधव०**—ठीक! ठीक! (एकीकडे) अहाहा! लाडके, मजकारितां धांवलीसना! केवढा मी भाग्यशाली, असलें अमूल्य रत्न मला लाधणार! माझ्या लाडकीच्या या थोड्याशा सहवासानेंच या वेळीं माझें दुःख नाहींसें झालें.

**इंदिरा**—( लाजून ) दादा तूं कांहीं तरी आपलें सांगत आहेस.

**वसंत०**—हँ, आतां असेंच ह्मणशील. त्या वेळची तुझी स्थिति आणि ती चर्या अझून मला डोळ्यांसमोर दिसते आहे बरें! ( इंदिरा लाजते. )

**माधव०**—झालें तें झालें. (एकीकडे) प्रिये याच गुणांनीं तूं माझें हृदय जिंकलेंस! अहा! लाडके तुला कुठें मी सांठवून ठेवूं!

**इंदिरा**—( खालीं मान घालून ) दादा, हें मग नाहीं का सांगतां येणार! बाबा तिकडे दुःख करीत असतीलना ?

**वसंत०**—खरेंच माधवा, चल गाडी आणली आहे. बाबा फार काळजी करीत असतील. मग बोलूं या गोष्टी.

**माधव०**—बरें आहे, चला. (पडदा पडतो.)

## प्रवेश ४ था.

**स्थल**—कृष्णाजीपंतांच्या घरांतील दिवाणखाना.

( कृष्णाजीपंत व गोविंदराव. )

**गोविंद०**—त्या सुधारकांच्या सभेची कडेकोट तयारी चालली आहे बुवा.

**कृष्णाजी०**—आपल्याही मंडळीला बोलाविलें होतें, परंतु अझून आले नाहींत.

**गोविंद०**—इतक्यांत येतीलच. पण तें माधवरावाविषयीं तुह्मी ऐकलें काय? बापानें ह्मणे त्याला घरांतून हांकून लावलें आणि आईनें लाथांखालीं बडविलें. भली खोड मोडली. येथून काळें तोंड करणार होता पण त्या वसंतरावानें त्याला परत आणलें. त्या दोघांचें आजकाल फार दाट झालें आहे.

**कृष्णाजी०**—त्याची बहीण आहेना ती, त्यामुळें आहे तें सारें. हींच सुधारकांचीं लक्षणें बरें. १९ वर्षांची पोर वाढवून ठेविली आहे! काय मूर्ख हे लोक! कसे सुधारणेंच्या कैफानें बेफाम झाले आहेत. एवढ्या मोठ्या पोरी काय नीट राहिल्या असतील ह्मणतां!

**गोविंद०**—अहो यांची फजिती केल्याशिवाय हे ताळ्यावर येणार नाहींत. (केशवराव, भाऊशास्त्री व नारायणवर्मा–प्रवेश करतात.

**कृष्णाजी०**—या बसा. तुमची केव्हांची वाट पहात आहोंत. ( सर्व बसतात. )

**गोविंद०**—मंडळी तर आली, आतां होऊं द्या विचार.

**कृष्णाजी०**—विचार तो काय? कायदा हाणून पाडायचा, आणि सुधारकांची टेर् उडवून द्यावयाची. असे पिटले पाहिजेत कीं, कायद्याचें लचांड नको, असें ह्मणून हाय बाप करीत घरींच बसतील. माझी तर अशी सल्ला आहे बुवा.

**भाऊशास्त्री**—उत्तमोत्तम, कृष्णाजीपंतांचा विचार मला सर्वथैव मान्य आहे.

**गोविंद०**—व्हावें तर असेंच; परंतु यामध्यें आपल्या रावसाहेबांची सल्ला घेतली पाहिजे, त्यांचें पाठबळ मिळाल्यास कालेजांतील वगैरे मंडळी आपणास पुष्कळ मिळेल. शिवाय पुढें मागें कांहीं कमी जास्ती झाल्यास, आपल्या वकिली पेचांनीं ते आपणास वांचवून घेतील.

**भाऊशा०**—हो हो हेंही मला ठीक दिसतें.

**कृष्णाजी०**—( एकीकडे ) रावसाहेबांचा काय एवढा मोठेपणा यांना वाटतो कोण जाणें. मीच होऊन त्यांना पुढारीपणा दिला आणि तोच मला आतां भोवूं लागला आहे. चिंता नाहीं तेंही पारडें फिरवीन. ( उघड ) हें पहा, सध्यां ही गोष्ट त्यांना सांगून उपयोग नाहीं. त्यांना या गोष्टीचें महत्व एव्हां समजणार नाहीं. त्यांना केव्हां सामील करायचें तें मी मग तुह्माला सांगेन. आणि ते पाहिजेत तरी कशाला? मी एकटा या सुधारकांना पुरून उरेन. हां हां ह्मणतांना तीन चारशें मंडळी जमा करतों पहा.

**भाऊशा०**—खरेंच, आपल्यासारखे विद्वान् सुधारकांशीं टक्कर मारायाला आमच्या पक्षाकडे आहेत ह्मणून आमच्या ह्या उडया; नाहींतर या बाल्यांनीं आमचा हा वैदिक धर्म

केव्हांच बुडवून टाकला असता. खरेंच गोविंदराव यांची मी इतकी शिताफी पाहिली आहे कीं, कांहीं खोट्या जरी गोष्टी असल्या तरी त्यांस असें कांहीं स्वरूप देतात कीं, निदान आमच्या सारख्यांना सुद्धां त्या वेळीं भुरळ पडते. आणि त्या खऱ्याशा वाटतात. ही काय लहान सहान विद्वत्ता!

**कृष्णाजी०**—तसें नव्हे हो. आह्मी आपले स्पष्ट-वक्ते आहोंत. आह्मी कोणाला भीत नाहीं यवढेंच; काय हो, आज उष्मा फार होतो नाहीं का? थोडें बर्फ आणि शरबत मागवतों. ( गण्या नोकरास ) गण्या, तें टेबलावर शरबत आणि बर्फ ठेवलें आहे तें तयार करून आण तर!

**भाऊशा०**—छे छे, काय प्रयोजन आहे त्याचें.

**कृष्णाजी०**—कां, त्यांत कांहीं दोष नाहीं. आपल्या मोठमोठ्या पंक्तींत मणो गणती बर्फ खपतें. शरबताचे सुद्धां पेलेच्या पेले इराण्याच्या दुकानीं उडतात. या तर रोजच्या रूढींतल्या गोष्टी.

**भाऊशा०**—तसें नव्हे हो. परगृहीं कधीं मी कांहीं भक्षण किंवा प्राशन करीत नाहीं ह्मणून, दुसरें कांहीं नाहीं.

**कृष्णाजी०**—हँ हँ, असें काय? येथें आपलीच मंडळी आहे, ह्मणून सांगतों. आपण खरें सांगा. त्या चुन्नाचे घरीं कसें काय आपण करीत असाल बरें? दुसरें कांहीं खाल्लें पिलें नाहीं असें जरी क्षणभर गृहित केलें तरी त्या यवनी वेश्येच्या हातचे विडे किती प्रीतीनें, कसे मिटक्या मारमारून चघळले असतील बरें आपण? त्या चुन्यांत तिणें आपल्या माठांतलें पाणी घातलें नसेल का? अहो दूर कशाला, ती यवनी, जी तुह्माला स्वस्त्रीपेक्षांही इतकी हृद-यंगमा झाली, तिच्या तांबूलपिकानें आर्द्र झालेल्या अधर-

पानानें तुह्मीं किती वेळां बरें आपणास धन्य मानिलें असेल? त्या भरांत तोंड पुसण्याची तरी कसली हो आठवण रहाणार! आणि तो तांबूलरस तुमच्या पोटांत गेल्याशिवाय राहिला असेल असें तुह्माला वाटेल तर अगदीं तुमची चूक आहे.

**भाऊशा०**—बरें बुवा, तुह्मी थट्टा करणार नाहींत तर काय तुमचीं पोरें करणार?

**कृष्णाजी०**—अहो ही ह्मणजे तुमचीच गोष्ट सांगतों असें नाहीं, परंतु आपल्यासारख्यापासून तों भटभिक्षुकगृहस्थादिकांपर्यंत जेवढे ह्मणून वेश्यागृहीं जाणारे आहेत त्यांचीही हीच हकीगत आहे. आणि तेच आमचे ब्राह्मण वेश्यांच्या घरीं पवित्र होऊन इकडे येऊन सर्व ब्रह्मवृंदास पंक्तिपावन करितात! बरें त्या वेश्येच्या घरीं तरी सर्व प्रकारचे लोक जाणार, तिकडे ब्राह्मण सारखा, मुसलमान सारखा, म्लेंच्छही खपतो, तरी ती आम्हां ब्राह्मणांला गंगाभागिरथीतीर्थासमान पवित्रच. तेव्हां तुह्मां आम्हाशीं त्या म्लेंछ यवनांदिकांचा कसा कायसंबंध जुळतो तो तुह्मीच पहा बुवा.

**भाऊशा०**—कृष्णाजीपंत तुह्मी तर फारच खोल बुडी मारलीत बुवा. शर्थ तुमची.

**गोविंद०**—शर्थ कां? आह्मी ह्मणतो, असेंच होत जावें. आणि हीं बंधनें समूळ नाहींतशीं व्हावींत.

**कृष्णाजी०**—खरोखर सांगतों शास्त्रीबुवा प्रत्येक गोष्टीचा व रुढीचा जेव्हां विचार करूं लागावें तेव्हां सर्वत्र हा प्रकार. वरवर सोंवळें ओंवळें करतांना आह्मी मरतों मात्र; बाकी आंतून हा असा घोंटाळा चालला आहे.

आह्मी ह्मणतों होऊं द्या, कारण आपल्यासारख्याचें उदाहरण आमच्या पत्थ्यावरच पडतें.

**केशव०**—कृष्णाजीपंत बोलूं लागले कीं, कमाल करून सोडतात बुवा.

**नारायणवर्मा**—मग यांनीं तरी शरबत पिण्यासाठीं येवढे आढेवेढे कां घ्यावेत.

**भाऊशा०**—झालें बुवा, तुमच्या अग्रभागीं आमची मति कुंठित झाली. आजकालचा मनूच तसा, त्याला उपाय काय?

**गोविंद०**—दूर कशाला, शाक्त धर्माचें साधन करण्यासही कांहीं पंथांत अति शूद्र प्रथम पाहिजेत. त्यांचें उष्टें खाल्याशिवाय धर्मसाधन होतच नाहीं. हें सर्वांस ठाऊक आहे. तें खाऊन किती बरें शाक्त ब्राह्मण पवित्र झाले असतील, आणि तेच आमचे आप्तसोयरे आहेतना! हे केशवरावही त्या कुंडापंथांतले आहेत. कां केशवराव खरें ना?

**केशव०**—अहो तें चाललेंच आहे. आमचा धर्मच तो. मूर्ख लोक या गोष्टीची थट्टा उडवतात परंतु मोक्षसाधन व खरें सुख त्यांतच आहे, हे कृष्णाजीपंतच सांगतील.

**कृष्णाजी०**—बरोबर, हे ह्मणतात तेंच खरें आहे. ( गण्या बर्फांतील शरबत आणतो, त्यांतून एकेक ग्लास सर्वांपुढें ठेवून ) हँ टाका पिऊन, हें शरबत लखनौहून मागविलें आहे, पहा तर याची कशी खुमारी आहे ती.

**गोविंद०**—घ्या शास्त्रीबुवा, नारायणवर्मा चालूं द्या.

**भाऊशा०**—( हातांत घेऊन ) बरें बुवा मित्रांच्या आग्रहास्तव घेतों तर. ( सर्वजण पितात. )

**कृष्णाजी०**—आहेना बहार, किती गारिगार तब्येत झाली आहे.

**भाऊशा०**—वः अत्युत्तम! खरेंच ह्या बेट्या इंग्रजांनीं स्वर्गीचें सुख भूलोकीं आणून सोडलें आहे, पण बेट्यांचें शुद्धाशुद्ध व सोंवळें ओंवळें याकडे मुळींच लक्ष्य नाहीं, हेंच कायतें वाईट.

**कृष्णाजी०**—ती सुधारणा आतां आपण केली पाहिजे. ( सर्व हंसतात. )

**भाऊशा०**—बरें, मी येतों आतां. काम तर झालें. ठरल्याप्रमाणें लोक जमविण्याची व्यवस्था तुमच्याकडे ना, कृष्णाजीपंत? ( उठतो. )

**कृष्णाजी०**—हो हो. त्याविषयीं कांहीं काळजी नको.

**भाऊशा०**—ठीक आहे नमस्कार. ( जातो. )

**कृष्णाजी०**—( भाऊशास्त्री गेलेसें पाहून, हसून ) द्या टाळी गोविंदराव. हे आमचे शास्त्रीबुवा बरें!

**गोविंद०**—तीन तीन तास रोज देवपूजा चालत असते. ( सर्व हंसतात. )

**नारायणवर्मा**—अहो ती लोकांच्या डोळयांत धूळ टाकण्याकरितां.

**कृष्णाजी०**—समक्षच दांत पाडले कीं नाहींत. हे आमचे धर्मशास्ते! ढुंगणाशीं वेश्या बाळगून, म्लेंच्छांनीं वगैरे तयार केलेलें शर्बत व पाणी पिऊन वैदिक धर्माचें अशा रीतीनें रक्षण करीत आहेत.

**नारायण०**—या धर्माधिकारी पोपजींनींच तर या आर्य धर्माची धूळधाणी करून टाकली. सगळ्या वेदांचे

अर्थ फिरवून भलतीं सलतीं मतें आंत घुसडलीं. आणि धर्म ह्मणजे आपल्या पोटाचा धंदा करून सोडला आहे. आमच्या स्वामिजींनीं केलेले अर्थ ज्यांनीं पाहिले असतील त्यांच्या लक्षांत हें पोपांचें ढोंग आल्याशिवाय रहाणार नाहीं. स्वामिजींनीं धर्माची उत्तम सांगड लाविली आहे.

**कृष्णाजी०**—आले बुवा यांचे समाज, पोपजी आणि स्वामिजी. हें सुद्धां वेड्यांमध्यें एक खूळ माजलें आहे. ह्मणे आजपर्यंत जे सर्व भाष्यकार झाले त्या सर्वांनीं वेदांचा भलता सलता अर्थ केला. त्यांना वेदांची भाषा व खरा अर्थ समजत नव्हता; आणि खरा व सत्यार्थ काय तो स्वामींनीं केला व त्यांनाच खऱ्या अर्थाची स्फूर्ति होऊन त्यांणीं प्रकाशांत आणला. वः सर्व भाष्यकार वगैरे मूर्ख होते ना! आणि हें भरतवर्ष वेदांविषयीं अगदीं अज्ञानांत होतें अँः देव तरी कसा हो तुमचा चमत्कारिक! आजपर्यंत जे ऋषि वेद ह्मणत आले त्यानांसुद्धां त्यांच्या अर्थाचें ज्ञानच होऊं दिलें नाहीं! आणि आतांशाकुठें स्वामीजीला अर्थ शिकवून त्याचा प्रसार करण्याकरितां या जगांत पाठविलें! बरें हे आजकालचे अविश्वासी लोक तरी कसे! त्या स्वामीच्या अर्थाला अगदीं झूट समजतात.

**गोविंद०**—अहो कोणत्या लोकांविषयीं तुह्मी बोलतां अहा हें?

**कृष्णाजी०**—अहो ते. एकदा तुह्माला सांगितलें नव्हतें का, त्यांच्यांत नियोगाचे प्रकार आहेत ह्मणून.

**गोविंद०**—ते हे का? हें नियोगाचें मी ऐकतों हें खरेंच काय हो?

**केशव०**—जाऊं द्या हो, या गोष्टींशीं आपल्याला

कर्तव्य काय? आपलें पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यासारखा ब्रह्मानंद कशांतच नाहीं. कृष्णाजीपंत, आज तयारी आहे कीं नाहीं? आपणाला बुवा त्याशिवाय चालत नाहीं.

**कृष्णाजी०**—हो, सर्व तयार असेलच, तिकडेच चलूं या. ( उठतो ) चला नारायणवर्मा, गोविंदराव उठा. ( गोविंदराव उठतात. )

**नारायण०**—मला नको बुवा कांहीं.

**गोविंद०**—नाहीं, उठा हो. ( धरून उठवतो, सर्व जातात.)

## प्रवेश ५ वा.

**स्थल**—कृष्णाजीपंतांच्या घरांतील दुसरी खोली.

( टेबलावर पुष्कळसे खाण्याचे पदार्थ मांडलेले आहेत. दारूच्या बाटल्या तसेंच चांदीचीं ग्लासें वगैरे वस्तु नीट ठेविलेल्या दिसतात व कृष्णाजीपंत, गोविंदराव व नारायणवर्मा खुर्च्यांवर सभोंवते बसले आहेत. )

**गोविंद०**—आज तर बुवा बराच थाट दिसतो.

**कृष्णाजी०**—अहो रोजचेंच आहे. गण्या, या तिन्ही डिशिस बाजारच्याच कायरे, त्या आपल्यां अग्निहोत्र्याकडच्याच ना?

**गण्या**—जी व्हय रावसाब, तो ह्मनाला कीं, आज लय मजा येल. ( बाटलीस हात लावून ) ही लय चढती हाय बगा.

**नारायण०**—कुठला अग्निहोत्री हो. कोण वेदी तो?

**कृष्णाजी०**—ते झेंदावेस्त वेदी. दिनशा कुवरजी नांव त्यांचें ( सर्व हंसतात. )

**नारायण०**—वः अग्निहोत्री खरेच पण. मला वाटतें हें कांहीं फळांचे पदार्थ आहेत?

**गोविंद०**—मला वाटतें असल्या प्रसंगाला नारायणवर्मा पहिल्यानेंच आहेत; मागें आले होते, त्या वेळीं हा प्रकार नव्हता.

**कृष्णाजी०**—( ग्लासांमध्यें सुगंधींत विलायचीच्या वासाची दारू ओतून व बश्यांमध्यें पदार्थ वांटून सर्वांपुढें ठेवतात. ) घ्या हो, चालूं द्या. नारायणवर्मजी, कांदे, बटाटे, कोबी, गोराडू वगैरे पदार्थ आपण खातच असाल.

**नारायण०**—ह्मणजे, खायला काय हरकत आहे?

**कृष्णाजी०**—ह्मटलें तुह्मी जुन्या शास्त्रानें चालणारे तेव्हां कदाचित् खात नसाल.

**नारायण०**—असें सर्वच शास्त्रानें कुठें चालतें, कांहीं शास्त्र व कांहीं रूढि. हे पदार्थ खाण्याची आतां रूढि आहेच.

**गोविंद०**—मग ठीक. हें घ्या. ( ग्लास पुढें करतो व आपणही पिऊं लागतो. )

**नारायण०**—( ग्लास घेऊन हळूच गोविंदरावास विचारतो.) हें काय आहे हो?

**गोविंद०**—हे लागले बुवा आतां चर्चा करायला. अहो काय ह्मणजे? पिऊन पहा, त्याला कसा वेलचीचा घमघमाट सुटला आहे! एक प्रकारचें चढतें शरबत आहे हें.

**कृष्णाजी०**—नारायणवर्मा हें काय ह्मणून विचारतात होय? अहो ज्याला वेदकाळीं सोमरस असें ह्मणत व ज्याच्या प्राप्तिस्तव इंद्र वरुणादि देव लाळ घोंटीत

असत त्याच जातीचा हा एक रस आहे, त्या रसाची शास्त्रांत मोठी तारीफ केली आहे हें तुह्मांलाही ठाऊक असेल. हल्लीं ती सोमवल्ली जरी गुप्त झाली आहे, तरी तिच्या ऐवजीं ही दुसरी वल्ली शोधून काढून तिच्या फळांपासून हें तत्व काढलें आहे. वेदकाळीं आमचे ऋषि जो सोमरस पीत होते त्याचे व याचे गुणधर्म सारखेच ह्मटले तरी चालतील. त्यापेक्षांही यांत सुधारणा फार झाली आहे. बघतां काय, टाका पिऊन.

**नारायण**०—ठीक आहे, पिऊन तर पाहूं. (ग्लास घेऊन पिऊं लागतो. ठसका लागून तोंड वाईट करून.) हें तर बुवा दाक्तराच्या औषधासारखें घसा जाळीत चाललें आहे. फार जलाल कींहो रस हा. परंतु यांत निःसंशय मजा आहे.

**कृष्णाजी**०—ह्मणजे. आमचे ऋषि व देव सोमरस पीत होते तो काय उगीच? ते पीत होते ह्मणूनच ते इतके तेजस्वी असत. आणि वेदांसारखीं शास्त्रें लिहिण्याची त्यांना शक्ति आली. तुह्मी सतत प्याल तर तसेच तेजस्वी व्हाल. आजही आपण ऋषीच होऊं. जे कांहीं पदार्थ ते खात होते, ज्यांचे यज्ञ हवन वगैरे करीत होते; त्यांपैकींच कांहीं पदार्थ हे आहेत. (कोंकते हातांत घेऊन) हे पहा, तुमच्या लोकांनीं सांगितलेला अर्थ तुह्माला माहीत असेलच. त्यांनीं याला साळीच्या पिठाचे मोदक असें ह्मटलें आहे, व पूर्वकाळीं ऋषींनीं यांनाच अजमांसपिंड म्हटलें आहे. खाऊन तर पहा किती मधुर आहेत ते.

**नारायण**०—(थोडा कैफ चढून) हेच कायते अजमांसपिंड (खाऊं लागतो) अरे वः, पिठाचे असून इतके स्वादिष्ट लागतात अँ!

**गोविंद०**—व्हाव:! कृष्णाजीपंत, तुम्हाला यांच्या अर्थाची बरीच माहिती आहे हो. नारायणवर्माजी, असेच अर्थ करून अजमांसपिंडावर यथेच्छ हात मारीत जा तुम्ही आपले!

**कृष्णाजी०**—अहो संस्कृत भाषेची व आमच्या ग्रंथांची हीच तर गमत आजकाल चालली आहे. जें ज्याला पाहिजे तें सर्व आमच्या ग्रंथांतून धर्माच्या नांवानें त्याला काढतां येतें. चोरी करा ग्रंथाधार आहेच, दारू प्या, भांग प्या, गांजा ओढा, शास्त्राज्ञा आहेच, कोंबडी खा, डुकर खा, बैल खा, या सर्व गोष्टींस धर्माचा आधार मिळेलच. गारुड्याच्या पोतडीचा जसा ठावठिकाण लागत नाहीं तशी गत आमच्या शास्त्रांची आहे. तुमच्या मनांत जें येईल तें तुह्मीं त्यांतून काढूं शकतां. द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, शाक्तधर्म, आर्य समाज हीं एकमेकांच्या छातीवर बसणारीं वेदांचींच पिल्लें आहेत. इतकेंच नाहीं परंतु आगगाडी, तारायंत्र, टेलिफोन, विजेची ट्राम्वे हीं सर्व आमच्या वेदांतूनच हे म्लेंच्छ लोक काढीत आहेत. आणि यासाठींच आह्मी या धर्माचा इतका अभिमान बाळगतों तो.

**नारायण०**—( धुंदींत ) आमच्या शास्त्राचें महात्म्यच तसें आहे! तुह्मीं काय समजलांत! हाँ आतां ते म्लेंच्छ लोक वेद शिकून कसे विद्वान् झाले. तुह्मी ध्या नुस्तें धुपाटणें आतां. आतां तुह्मी असेच बरें?

**गोविंद०**—( दारूचा घोंट घेऊन ) वाहवा असें कां ह्मणतां; यज्ञ, हवन, अश्वमेध, गोमेध करून व सोमरसपान करून आमचे वेदप्रणीत ऋषि धर्म साधन करीत

होते ह्मणून त्यांची उन्नत स्थिति होती. मग आह्मी अजमेध केला व हें असलें रसपान केलें तर कांहींच का आमच्यानें होणार नाहीं. अहो तुमच्या चार वेदांपेक्षां त्या पाकेट डिक्शनरींत सर्व विद्या भरल्या आहेत. शब्दांची जुळवाजुळवी व लावालावी करणाराच मात्र पाहिजे. द्या हो यांना तो आणखी रस द्या पाहूं. (केशवराव ग्लास भरून जबरदस्तीनें नारायणवर्मास पाजतो.)

**नारायण०**—तुह्मी दुष्ट धर्मनिंदक खरे बुवा!

**कृष्णाजी०**—जाऊं द्या हो या गोष्टी. हीं भजीं तर खाऊन पहा. तुमच्या कांहीं पुस्तकांत, ग्रामकुक्कुट ह्मणजे कोबीचा कांदा, असा ज्याचा अर्थ केला आहे, त्या ग्रामकुक्कुटाचीं हीं भजीं आहेत. कशी बहार आहे पहा यांची.

**नारायण०**—( खातो ) वः असले उत्तम पदार्थ मी जन्मांत खाल्ले नव्हते. कोबीच्या कांद्याचीं भजीं इतकीं स्वादिष्ट अँ!

**केशव०**—ह्मणजे ग्रामकुक्कुटतें उगीच का. द्या हो तें ग्लास इकडे. हा दुसऱ्या प्रकारचा रस आहे बरें, का नारायणवर्मा. (ग्लासांत ओततो व नारायणवर्माकडे करून) पहा, पहा, याची मजा पहा. (आपण पितो.)

**नारायण०**—हा–फारच, अति गोड. हा–हा! घशांत गुदगुल्या करीतच चालला आहे. (दुसऱ्या पदार्थाचे तुकडे तोंडांत टाकून चघळीत) ह्या कसल्या फोडी बुवा, या नाहीं आपणाला आवडत, किती चावल्या तरी तुटतच नाहींत, रबर जसा चामट. (धुंदींत चघळीत खुर्चीवर मागें पडतो.)

**कृष्णाजी**०—तें खाल्लें का आपण. त्याला विड्वराह असें ह्मटलें आहे; तुमच्या लोकांनीं त्याचें नांव गोराडू असें ठेवलें आहे. (हसतात.)

**नारायण**०—तें गोराडू हें? आह्मी त्याची भाजी करतों, ती कांहीं अशी चीवट होत नाहीं. ती बटाट्या सारखी लागते.

**गोविंद**०—अहो स्वारी खुब रंगांत आली आहे. आतां आपला प्राकृत अर्थ काय तो सांगायला हरकत नाहीं.

**केशव**०—( नशा चढून हसून.) कृष्णाजी–पंत अर्थ सांगा हो. कां गम्मत आहे ( गाण्याच्या सुरांत ) गम्मत आहे पहा कशी ती–गम्मत आहे पहा कशी ती,

**कृष्णाजी**०—पहा बुवा तुमच्या अर्थानें तुह्मी पदार्थ खाल्ले. आतां आह्मी आमचा अर्थ सांगतो. तो रस प्यालात तो, सुगंधींत ब्रान्डी होती. अजमांसपिंड ह्मणजे बकऱ्याच्या सागोतीचे कोकते ह्मणजे गोळे आहेत ते.

**नारायण**०—अरररररर–भ्रष्टाकार–छी-छी-थू-थू-थू.

**केशव**०—वहाव: कशी गम्मत, गोड गोड-ग-म-त-हा-हा-हा.

**कृष्णाजी**०—पुढें ऐकाना? ग्रामकुक्कुट ह्मणजे कोंबडें, त्याचीं भजीं तुह्मी आतां खाल्लींत तीं.

**नारायण**०—( ओकारी काढून ) ओय–छी-छी-छी मला मळमळूं लागलेंरे बाबा! ( संतापून ) दुष्ट लोक, चांडाळ!

**गोविंद**०—अहो पण तेव्हां मिटक्या मारमारून खाल्लेंत ना तुह्मी. आणि विड्वराह ह्मणजे डुकर; त्याची सागोती खाल्लीत ती!

**नारायण०**—( ओकूं लागतो व अस्ताव्यस्त पडतो. ) लुच्चानों डुक्कर कायरे गाढवा, तो आतां आह्मला, ( जीभ आडवी पडते, बरळूं लागतो.)

**केशव०**—डुक्कर खाल्ला! का ग ए. खाल्ली खाल्ला हां ( इकडे तिकडे झोंके खात फिरतो. ) अरे आणखी ग-ग-ग लासरे गो-विंदराव पीत्वा-पी-त्वा-अरे कुंड कुठें-रे ही पहा चोळी—सांपडली. नारायणवर्म्याची शेंडी धरतो. ) तुझीचना ग चोळी हां—आतां मी रुद्र! ( नारायणवर्माच्या गळ्यांत हात घालतो-नारायणवर्मा त्याच्या तोंडांत मारतो.)

**नारायण०**—चोर-हो-मी, कोण-समजलास-हँ-मी मी मी. तुझा-बा-प-( दोघांची मारामारी होते. दोघे पडतात. गोविंदराव व कृष्णाजीपंत त्यांना संभाळतात. पडदा पडतो.)

**प्रवेश ६ वा.**

**स्थल**—नारायणवर्माचें घर. (नारायणवर्मा व भाऊशास्त्री.)

**नारायण०**—हल्लीं केशवरावानें केवढा भयंकर अनर्थ केला. तुह्माला कळला काय?

**भाऊशा०**—नाहीं. मी कांहीं दिवस येथें नव्हतों. आपला बनीचा भाऊ केशवराव त्यानें ह्मणतां?

**नारायण०**—हो हो त्यानें.

**भाऊशा०**—ह्मणजे?

**नारायण०**—त्यानें थोड्या दिवसांमागें एका थेरड्याला पैशाची लालूच देऊन त्याच्या १० वर्षांच्या पोरीशीं लग्न केलें हें तुह्माला ठाऊकच आहे. परवां त्या थेरड्या बापानें त्या पोरीला केशवरावाच्या घरीं पोंचती केली. आणि या राक्षसानें आपल्या राक्षसी कामवासनेच्या बळी घालून त्या पोरीचा जीव कीं हो घेतला!

**भाऊशा०**—आँ! केवढें घोर कर्म! मग.

**नारायण०**—मग काय, हें सर्व प्रकरण कोर्टांत गेलें. परंतु केशवरावाला दोनच महिन्याची शिक्षा झाली.

**भाऊशा०**—हें कांहीं ठीक नाहीं. तो केशव बेटा मूर्ख खरा. याच वेळीं त्याला हें काय सुचलें पहा. या सुधारकांस या वेळीं दौंडी पिटायला पहा कसें हें साधन झालें. आतां ते कांहीं कमी करावयाचे नाहींत. आपल्या पक्षास बळकटी आणण्याकरितां ही गोष्ट पुढें केल्याशिवाय ते रहाणार नाहींत. ती पोरगी ह्मणे ह्या बाबासाहेबांची कोणी आप्त होती. तेव्हां तें प्रकरण अधिकच चेतेल. आपल्या पक्षाचा कोणी असता तर या प्रकरणाचा मागमूसही लागूं दिला नसता. पण काय उपाय! तरी येवढें बरें झालें, कीं त्या केशवरावाचें नशीब ह्मणून दोनच महिन्यांच्या शिक्षेवर सर्व आटोपलें. यावेळीं संमतिवयाचा हा कायदा असता तर त्याला जन्मठेपीचीच शिक्षा झाली असती.

**नारायण०**—काय हो हा मोठाच चमत्कार नव्हे का? ती पोर त्याच्या जबरीनें मेली असतां, नुस्ती दोनच महिन्यांची शिक्षा!

**भाऊशा०**—अहो हीच तर गमत होती. अशा रीतीनें, कोणाची स्त्री जरी मरण पावली, तरी तिच्या त्या नवऱ्यास नुस्त्या दुखापत केल्याच्या आरोपाची शिक्षा होत होती; यामुळें लोकांस कांहीं याविषयीं फारसें वाटत नव्हतें. परंतु आतां, हे नीतीचा तोरा मिरविणारे व स्त्रियांचा पक्ष उचलून त्यांस शिरावर चढवून नाचवूं पहाणारे बायकेसुधारक हा घाट आणून, आपल्या पोरी १५–१६ वर्षांच्या

घोड्या वाढवून घरीं बाळगूं लागले आहेत; आणि जुल- मानें कायदा करून आह्माला सुद्धां आपल्यासारखे बन- विणार आहेत!

**नारायण०**—मी असें ऐकतों कीं, केशवरावास थोडी शिक्षा झाली ह्मणून ते लोक कुरकुर करीत आहेत. शिक्षा अधिक व्हावी ह्मणून त्यांनीं किती हातपाय आपटले. परंतु कांहीं झालें नाहीं. आतां तेवढ्यावरूनच त्यांचीं व्याख्यानें चालली आहेत. आणि या गोष्टीचा मोठा बाऊ करून लोकांस ती गोष्ट फुगवून दाखवून त्यांजकडून कायद्यास अनुकूल मतें घेण्याची खटपट चालविली आहे. त्यांची ती जंगी सभा इतक्यांत आटोपली असेल. परंतु आज दंगा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आपली ती सर्व मंडळी गेली आहे. केव्हां त्या पक्षाच्या फजितीचें वर्त- मान या कानीं पडेलसें झालें आहे. (इतक्यांत कृष्णा- जीपंत व गोविंदराव प्रवेश करतात.) शाबास हे आलेच. पूरीं शंभर वर्षें आयुष्य आहे बुवा तुह्माला. सांगा सांगा, काय झालें तें सांगा लवकर?

**कृष्णाजी०**—अहो सांगणार काय! सुधारकांचे पुरे बारा वाजले. सोळा आणे फजिती झाली. यथास्थित मार दिला. कां गोविंदराव?

**गोविंद०**—तें कांहीं पुसूंच नका.

**भाऊशा०**—वहावा? शाबासरे शाबास? मंडळी असावी तर अशी. पण सविस्तर हकीगत काय ती ऐकूं दे.

**कृष्णाजी०**—बरें ऐका तर. त्यांची व्यवस्था काय होणार होती हें तुह्माला त्यांच्या जाहिरातीवरून ठाऊक

आहेच. त्याप्रमाणें ते दोन पोरटे—वसंत आणि तो माधव, दोघे दोन शिपाई घेऊन द्वारपाल बनून दरवाजावर उभे राहिले होते. आंत जाऊं पहाण्याऱ्यांस या कागदावर सह्या करा असें सांगून ते एक वही पुढें करीत. तींत बिल पास करण्यासाठीं अर्ज होता. लोक ह्मणत कीं आह्माला तुमचें काय ह्मणणें आहे तें कळल्याशिवाय आह्मी सही करीत नाहीं, त्यावरून ते कालचें केशवरावाचें उदाहरण देऊन लोकांस ह्मणत कीं, असले अनर्थ होऊं नयेत ह्मणून हा अर्ज आहे; तेव्हां आमची मंडळी तयारींत होतीच. त्यांनीं गडबड करण्यास सुरवात केली. सर्वांनीं मिळून एकच हलकल्लोळ करून सोडला. पोलीस तर मागेंच दबून राहिलें. बाहेरच्या लोकांकडून शिव्यांचा वर्षाव, आणि दगड, शेण व धूळ यांचा भडिमार होऊं लागला. तेव्हां आंतील सुधारकांची पांचावर धारण बसली. सह्या एकीकडेसच राहिल्या. जिकडे तिकडे पळापळ सुटली. ज्याला त्याला देमाय धरणी ठाव असें होऊन जो तो आपापल्या बचावाकरितां डोक्यावर हात धरधरून सैरावैरा धांवूं लागला; त्या वेळीं तर उत्तर गोग्रहणाच्या वेळीं जशा गाई पुच्छ उभारून दशदिशा पळत सुटल्या होत्या तद्वत् हे लोक पळतांना दिसूं लागले.

**नारायण**०—बहुतेकांना जखमाही झाल्या असतील.

**कृष्णाजी**०—ऐकून तर घ्या. बडी बडी पुरस्कर्ती मंडळी होती ती ज्याच्या घरांत आश्रय मिळेल तेथें बेधडक घुसली; परंतु आमच्या मंडळीनें त्यांचा तसाच पाठलाग केला. तेही लोकांच्या घरांत घुसूं लागले. मग

काय विचारतां, सुधारकांची बोबडीच वळली. जेमतेम दरवाजे लावून घेऊन चोरांप्रमाणें व कित्येक तर बायकांसारखे लपून बसले. बाहेरून शिव्यांचा, तसेंच दगड, धूळ, शेण व गटारांतील घाण यांचा मारा चाललाच होता. लोकांच्या घरांची दुर्दशा होऊन गेली. शिपाई तर आपलें शेंपूट संभाळीतच राहिले. मग काय, आमच्या लोकांस अधिकच स्फुरण आलें. आह्मीही कांहीं वेळपर्यंत त्या गडबडींत मिसळलों होतों. आणि रावसाहेब व त्यांचे दुसरे मित्र हे शेजारींच एका घरांत बसून सर्व गम्मत पहात होते. इकडे हें चाललें आहे तों सभास्थानीं आमचे लोक शिरले. तेथील सामानाची त्यांनीं राखरांगोळी करून टाकली. जो मिळेल त्याला पिटून बाहेर काढूं लागले. ते दोघे द्वारपाल शौर्याचा मोठा तोरा मिरवीत होते, तेव्हां लोक त्यांच्यावर धांवले; व सात आठ जणांनीं मिळून त्यांना गच्च धरिलें. बराच वेळ त्यांची झटापट चालली होती, इतक्यांत कोण्या सुधारकाच्या पांच सहा वर्षांच्या मुलास दोन असामी खूब पिटूं लागले व त्याची विटंबना करूं लागले, तेव्हां माधव तें पाहून या लोकांस झटका देऊन त्या पोराकडे धांवला, व त्या दोघांच्या अंगावर तुटून पडला. एकास तर त्याणें खालीं पाडलेंच, परंतु दुसऱ्याची व याची बरीच जुंपली. पोरगा ओरडतच होता, इतक्यामध्यें एक दगड माधवाच्या कानशिलांत सपाट्यानें येऊन बसला. गोविंदरावांनीं तर या वेळीं आपला दावा खूब साधला. ( गोविंदराव सांगू नका अशी मानेनें खूण करतात. ) मग काय विचारतां, माधव धाडकन खालीं पडला. तो

मूर्च्छितच झाला. कपाळांतून रक्ताच्या धारा चालल्या. तें पोर होतें, तें माधवाच्या गळ्यास मिठी मारून मोठमोठ्यानें रडूं लागलें. वसंत ही धांवला. इतक्यांत पोलीस आफिसरही आले, त्याबरोबर एका मिनिटांत सर्व लोक पळाले. आह्मीही हळूच एकीकडून निघालों. पुढें काय झालें कोण जाणें. मला तर वाटतें माधव लवकरच तत्सत ह्मणणार.

**नारायण०**—माधवाविषयीं मला वाईट वाटतें.

**गोविंद०**—वाईट कसलें, अशांचा हाच शेवट. कांहीं असो, आपण आपले निराळे आहोंत.

**भाऊशा०**—एकंदरींत याप्रमाणें सभेचा निकाल लागला अँ, योग्य.

**कृष्णाजी०**—तुमच्या मनासारखेंच झालें ह्मणायचें.

**गोविंद०**—असेच हे सुधारक मरायचे, हें खास समजा.

**कृष्णाजी०**—बरें चला घरीं. आज फारच थकलों आहोंत; थोडेंसें रिफ्रेशमेंट पाहूं. (जातात.)

## प्रवेश ७ वा.

**स्थल**—बाबासाहेबांच्या घरांतील खोली.

(माधव बिछान्यावर पडला आहे, वसंत जवळ बसला आहे. व इंदिरा एकाबाजूस रडत उभी आहे.)

**वसंत०**—हें काय बरें इंदिरे. तुझ्या डोळ्यांचें पाणी मुळींच खळत नाहींना. कोणाचा बरें इलाज आहे या गोष्टीला. माधव आतां औषधाच्या गुंगींत आहे. थोडा वेळ झोंप लागून तो उठला ह्मणजे त्याला पुष्कळ बरें

वाटणार आहे. अशी घाबरूं नको. झोंप लागली ह्मणजे त्याला बरें वाटेल, असें डाक्तरही सांगून गेले आहेत.

**इंदिरा**—देवा, कोण दशा ही ; बोलायला सुद्धां शक्ति नाहींशी झाली ना! ( हुंदका अनावर होऊन ) दादा, तूं मला कांहीं तरी सांगत आहेस. देवा नको नको, असले घातक विचार मनांत येऊं देऊं नको. दादा, तुझ्या पायां पडतें, काय तें सांग, दाक्तर काय सांगून गेले?

**वसंत०**—( एकीकडे ) इला काय तरी सांगूं आतां? ( अश्रु वाहूं लागतात. ) काय सांगूं इंदिरे, बरा होईल असें त्याणें ह्मटलें आहे खरें. पुढें ईश्वराची मर्जी.

**इंदिरा**—( वसंताच्या डोळ्यांकडे पाहून घाबरून ) अग बाई! दादा तुझ्या डोळ्यांतून अश्रु वहात आहेत. माझा संशय दुणावतो आहे! धडगत दिसत नाहीं ग बाई! निष्ठुर दैवा! कसा घाला घातलास हा! ( इतक्यांत माधव जागा होतो. )

**माधव०**—मला फार तलखी होते, वसंता पाणी—

**वसंत०**—इंदिरे पहा, माधव पाणी मागतो आहे. आण तें इकडे. ( इंदिरा पाणी आणते, तें घेऊन वसंत पाजतो. )

**वसंत०**—माधवा, तुला आतां बरें वाटतें आहे ना?

**माधव०**—होय. बाबासाहेब कोठें? तूं येथें एकटाच आहेस का?

**वसंत०**—आमचे बाबा, तुझे वडील, दाक्तर वगैरे मंडळी तुला झोंप लागलीसें पाहून मघांच गेली. दाक्तरानें येथें गर्दी करूं नका असें सांगितलें होतें, ह्मणून येथें मी व इंदिरा अशीं दोघेंच आहोंत.

**इंदिरा**—( एकीकडे ) आतां किती तरी माझ्या जीवाला धीर आला. देवा तुझे उपकार अनंत आहेत.

**माधव०**—वसंता, मजकरितां तुह्मांला किती ह्मणून रे कष्ट होत आहेत हे!

**इंदिरा**—( एकीकडे ) असलें काय बोलणें हें बाई!

**वसंत०**—माधवा, असें काय बोलतोस तूं. एकदाचा बरा हो, हींच आमची ईश्वाराकडे प्रार्थना आहे.

**माधव०**—मला आतां पुष्कळ बरें वाटतें आहे.

**इंदिरा**—हेंच देवापाशीं पदर पसरून आमचें मागणें आहे.

**वसंत०**—यावरून ईश्वराचें आह्मांस पाठबळ आहे हें उघड दिसत आहे.

**माधव०**— वसंता, या वेळीं ईश्वराचें कांहीं भजन ह्मणाल तर मला आणखी किती बरें वाटेल ह्मणून सांगूं.

**वसंत०**—ठीक, ठीक. इंदिरे चल आपण कांहीं ह्मणूं.

पद.—( देस-चाल-टाकिला यानें वेष पहिला. )

**अनुपम तुझी-तुझी हरि करुणा। वर्णूं किती हे अघ संहराणा ॥ धृ० ॥ प्रभु तूं होसी,-होसी भक्त जनां। कल्पद्रुम शाश्वत सुख सदना ॥ संकटीं रक्षिसी, रक्षिसी दीन जना। देउनि त्यांसीं अभय दाना ॥ सत्पथा करिसी-करिसी नारायणा। विजयी सर्वदा खलदमना ॥ राखिसी ब्रीदा-ब्रीदा जगज्जीवना। शासुनी शेवटीं दुष्टजना ॥ अनुपम ॥**

**माधव०**—वसंता, "श्री जगदीशा हरि कृपाळा" हें पद आणखी ह्मणा.

वसंत०—बरें. ह्मण इंदिरे (इंदिरा व वसंत म्हणतात.)

पद.—( चाल–वलसागर तुम्ही पार्था. )

श्रीं जगदीशा हरि कृपाळा ऐकें विनतीला। दास हे आपुले अनन्य भावें नमिती चरणाला ॥ धृ० ॥ विचित्र जन हे पीडिती पहा कसे या तव बाळांला। धांवुनि संकटीं राखीं देवा दुर्बल दासांला ॥१॥ दीन शरण तूं पतितपावन ठाउक सकळांला। ह्मणुनी घातिली दृढतर मिठीही तव पदकमळांला ॥२॥ नित्य असो लोलुप हें मन तव गुण गानाला। न ढळो निश्चय मनिंचा ऐसा दे वर आह्मांला ॥ ३ ॥

माधव०—अहा, परमेश्वरा. (डोळे झांकून स्तब्ध रहातो.)

( गायनाच्या शेवटीं शेवटीं गोविंदराव एकीकडे प्रवेश करतो. पद संपल्यावर तिघेंही कांहीं वेळ स्तब्ध राहातात.)

गोविंद०—( एकीकडे ) अरे, हें काय आश्चर्य! गायन चाललें आहे! आणि अशा वेळीं? माझी खात्री होती कीं, इतक्यांत त्यानें राम ह्मटलें असेल; आणि जिकडे तिकडे रडारड व हाहा:कार झाला असेल; काय समजावें तरी! मरणसमयीं रडण्याच्या ऐवजीं गायन करण्याची सुधारकांची ही सुधारलेली नवी टुम तर निघाली नसेल ना! किंवा माझा तर्कच खोटा. ह्मटलें यांची रडारड चालली असतां आपल्या डोळ्यांस पाणी नच आलें तर निदान कापूर घालून डोळ्यांतून पाणी काढावें. हँ: आह्मी आपले मनचेच मांडे खाल्ले ह्मणायचे एकूण! ( थांबून ) पण हा इतका कोकिलेसारखा मधुर कंठ तिचाच काय? हो इंदिरेचाच. अहाहा! इच्यापुढें आमची चंद्रा नायकीण तर झक मारते! ( पुढें डोकावून ) अहाहा तीच, किती गुल-

जार! पण जवळ तो कारटा वसंतही आहे. आणि तो बेरड माधव नाहीं मेला आँ. परंतु सर्वांनीं डोळे मिटले आहेत ( हंसतो ) हां समजलों, हे आकाशांतील बापाला खालीं बोलावताहेतसें दिसतें, काय तरी ढोंग! अरे बेव्या, तूंच जायचें होतेंस ना त्या बापाला आकाशांत भेटायला. मग आज मी कसा आनंदानें असतों. अनायासें इंदिरा माझी झाली असती, चिंता नाहीं. एक फसला तर दुसरा उपाय. जाते कुठें, माझीच आहे ती. ( इतक्यांत माधव बोलतो तिकडे लक्ष्य देतो. )

**माधव०**—अहाहा, परमेश्वरा धन्य तूं, काय तुझी दया ही, संकटसमयीं आह्मा दीनांस किती तरी धैर्य देत आहेस. वसंता, या वेळीं माझें सर्व दुःख कींरे नाहींसें झालें. हा पहा मी उठतों. ( उठूं लागतो.)

**वसंत०**—हाँ हाँ उठूं नको एव्हां. ( एकीकडे ) अहाहा, ईश्वरगुणगानानें या वेळीं या माधवावर जादुसारखा परिणाम झाला आहे.

**माधव०**—बरें तर वसंता, नाहीं उठत; तुझ्या मर्जीप्रमाणें होऊं दे.

**गोविंद०**—अरेच्या, याला तर कांहींच झालें नाहीं. बेरड ठणठणीत बोलतो आहे आँ. चिंता नाहीं आंतच जाऊन पाहावें–झालें. ( पुढें जातों ).

**वसंत०**—कोण गोविंदराव? या वसा इकडे.

**गोविंद०**—आतां कशी काय प्रकृति आहे. मघां मी पाहून गेलों होतों त्यापेक्षां बरें आहेना? एकदा लौकर आराम होवो ह्मटलें. जखम बरीच मोठी आहे ह्मणतात. ( इंदिरा निघून जाते. )

**माधव**०—आतां बरें आहे; तुमच्या कृपेनें वांचलों ह्मणायचा.

**गोविंद**०—अँः आमची कृपा रडली! देवाची ह्मणा. पण एकंदरींत लोक दुष्ट खरे. विरुद्धपक्ष झाला ह्मणून काय झालें, मूर्खांनीं असा प्रसंग आणावा काय? धिःकार असो या दुरभिमानाला. अहो या दंग्यांत मलाही दगड बसले, पण मी आपला तसाच ह्मणून फारसें कांहीं झालें नाहीं. कायहो वसंतराव, या दंग्यांत बहुत करून शाळेंतीलच पोरें होतीं ह्मणतात. परंतु यांत कोणी मास्तरही असावेत असें मला वाटतें. काय करावें. तुमच्या ठिकाणीं मी असतों तर त्या मूर्खांचीं हाडेंच मऊ केलीं असतीं. तुह्मी तरी अशी मारामारी करीपर्यंत तेथें इतका वेळ कशाला राहिलां कोण जाणे.

**वसंत**०—अहो एकदम दंगा आणि मारामारीच त्यांणीं चालविली.

**गोविंद**०—यांत कोणाकोणाचें अंग असावेंसें तुह्मांला वाटतें बरें? मला तर रावसाहेबांचा व कृष्णाजीपंताचा संशय येतो बुवा.

**माधव**०—असोत बिचारे कोणीही. परंतु एवढेंच कीं अशा मनुष्यांनीं असलें नीचकृत्य करण्यास प्रवृत्त व्हावें ही मोठी दुःखाची गोष्ट होय! असो ईश्वर बिचाऱ्यांना सुबुद्धि देवो ह्मणजे झालें. बाकी यांणीं कांहींही केलें; कितीही आमचा छल केला, तरी आह्मांला जें खरें वाटतें तें करण्यास आह्मीं कधीं भिणार नाहीं.

**गोविंद**०—वः तें तर आहेच. काय सांगूं हो, तुह्मांला धरलेंसें पाहून मी तुमच्या मदतीस येतच होतों,

इतक्यांत कोणी दुष्टानें तुह्माला दगड मारलाच, आणि तितक्यांत पळापळही झाली.

**माधव०**—वसंता, मला तहान लागली, पाणी दे.

**गोविंद०**—( झटकन उठून पाणी आणून देतो. ) माधवराव आतां तुह्मी अगदीं बरे झालांत. दोन तीन दिवसांतच हिंडूं फिरूं लागाल, असो. पण याउपर या दुष्ट लोकांशीं आपण आतां संभाळूनच राहिलें पाहिजे. अहो घेतां काय यांचें? एका दोघां लुच्यांनीं तर तूं सुधारकांच्या संगतीस लागलास तर तुझा खून करूं असें मला ह्मटलें! पण असल्या धमकावणीला मी थोडाच दाद देतों आहें. एवढेंच मात्र, संभाळून राहिलें पाहिजे. परंतु वसंतराव, या मूर्ख लोकांची खोड जिरविण्याकरितां कांहीं तरी युक्ति काढा बुवा.

**वसंत०**—आह्माला युक्ति बिक्ती कांहीं नको. बिचारे पाहिजे तें करोत. आपणाला जें करणें तें दृढनिश्चयानें ईश्वरावर भरंवसा ठेवून करावें ह्मणजे झालें. ( बाबासाहेब हातांत वर्तमान पत्र घेऊन प्रवेश करतात. )

**बाबासाहेब०**—गोविंदराव आपणही आलां आहांत काय? माधवाची प्रकृति बरी आहे आतां. आणखीही एक आनंदाची खबर या पत्रांतून आली आहे.

**वसंत०**—ती कसली बाबा?

**माधव०**—कशा संबंधानें?

**बाबासा०**—हा पहा टेलिग्राम. संमतिवयाचें बिल पास झालें. तुमच्या खटपटीस ईश्वरानें सहाय केलें. पहा.

**माधव०**—काय, बिल पास झालें? धन्य परमेश्वराची. ( हर्षानें उठून बसतो. )

**वसंत॰**—शाबास. गोविंदराव द्या टाळी.

**गोविंद॰**—( हंसरें तोंडकरून ) वहावा शेवटीं आपणच जिंकलों आँ. कां प्रयत्नाचें फळ मिळालें कीं नाहीं? विरुद्ध पक्षाचीं तोंडें आतां हीरमुसलीं झालीं असतील. कशीं रडवीं दिसतील ह्मणतां. राम राम; आतां त्यांच्या फजितीस पार नाहीं.

**बाबासा॰**—अँः त्याविषयीं आपण कशाला विचार करावा.

**वसंत॰**—बाबा, आज तर मोठाच सुदिन उगवला! माधवही बरा झाला. माझा आनंद पोटांत माईनासा झाला आहे. कां गोविंदराव, तुह्माला झालें कीं नाहीं तसें?

**गोविंद॰**—मला अति हर्षानें तर बुवा कसेंसेंच होऊं लागलें आहे. मी कदाचित् भ्रमिष्ट होईन कीं काय नकळे. मी घरीं जातों बुवा लौकर-( उठतो ) येतों बरें बाबासाहेब.

**बाबासा॰**—बरें आहे यावें. ( पडदा पडतो. )

## प्रवेश ८ वा.

### स्थल—( गोविंदरावाचें घर.)

( गोविंदराव व कृष्णाजीपंत. )

**गोविंद॰**—कृष्णाजीपंत, आतां काय त्याचें, झाला कायदा तर झाला. त्यामुळें आपल्या थोड्याच बांगड्या फुटल्या. कायदा झाला न झाला तरी सारखेंच. आपला उद्देश तर फसला नाहींना? रावसाहेबांस तर याची मुळींच खंती वाटत नाहीं. या धर्मभोळ्या लोकांवर आपलें वजन व आपल्याविषयीं त्यांची पूज्यबुद्धि या गोष्टींत अंतर तर नाहींना पडलें? मग त्याच्याविषयीं इतका विचार तो कशाला पाहिजे आहे.

**कृष्णाजी०**—या मोठमोठ्या सुधारकांना कसें तरी हाणून पाडून त्यांचें पाणी पातळ करण्याचा आमचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं ह्मणून वाईट वाटतें. आधींच या हिंदुधर्माच्या बंधनांनीं आह्मी त्रासलों आहोंत त्यांत आणखी हे नीतीचा तोरा मिरविणारे सुधारक नवीन नवीन नीति व धर्मबंधनांनीं आम्हांस जखडूं पहात आहेत. हा त्यांचा उद्देश तडीस न जावा म्हणून धर्मभोळ्या लोकांची कशी तरी समजूत पाडून त्यांना आपल्या पक्षास घेऊन या सुधारकांचीच कशी तरी फजिती केली पाहिजे. हे सुधारक मोठमोठ्या पदव्या धारण करून जे पुढें पुढें नाचत आहेत त्यांच्या गळ्यांत या साधारण लोकांच्या हातूनच मूर्खपणाचें गांठोडें बांधवायचें. यासाठीं या लोकांचा पुढारीपणा कसा तरी हातीं आला पाहिजे, म्हणजे काम होणार. परंतु ह्या प्रसंगीं हा बेत तडीस गेला नाहीं. चिंता नाहीं. आतांच आपण रावसाहेबांकडे जाऊं आणि मला जी एक युक्ति सुचली आहे तिच्याविषयीं त्यांचें काय मत आहे तें पाहूं. तेही कांहींना कांहीं युक्ति काढतीलच. (दूर पाहून) तो हो कोण येत आहे इकडे, नारायणवर्मासारखा दिसतो नाहीं का?

**गोविंद०**—हो हो, तोच, इकडेच स्वारी येत आहे. अहो तो म्हणे हल्लीं ख्रिस्ताच्या कळपांत शिरला. त्याचे तरी सरड्याप्रमाणें रंग बदलतात कीं हो. मूळचा वैष्णव, तें नापसंत होऊन आर्यसमाजी बनला, त्याची थोडी चांचणी पाहून आतां म्हणे कोंकरूं बनून त्या ख्रिस्ती कळपाच्या गोठांत शिरला आहे. पण तें तरी किती दिवस रहाणार म्हणतां. आठ दहा दिवसांनींच मुल्लाजी बनके म्हणून खबर येईल.

**कृष्णाजी०**—पण त्यांचा ख्रिस्ती धर्मही कांहीं चमत्कारिक आहे म्हणतात. ख्रिस्ताचें चमत्कारिक जनन, त्यानें केलेले चमत्कार, तसेंच तीन देव मिळून एक देव हें कोडें तो मानीत नाहीं; तेव्हां त्याला हे ख्रिस्ती लोकही तो लांडगा आहे असें म्हणून लौकरच पिटाळून लावतील. (नारायणवर्मा प्रवेश करतो.)

**गोविंद०**—याहो, पाद्री साहेब. आज इकडे रस्ता कसे चुकलेत?

**नारायण०**—आपल्याकडेच आलों आहें. ते आपले पार्लमेंटचे सभासद विद्याभूषण टागोर येथें आले आहेत हें आपणास ठाऊकच आहे. त्यांना आज दोराबजी पेटिट यांच्या बंगल्यांत पानसुपारी आहे. तेथें आपणासही आमंत्रण आहे.

**गोविंद०**—असें काय? आणखी कोण मंडळी येणार तेथें?

**नारायण०**—(कागद पुढें करून) हे पहा, कोण कोण येणार ते. यांत साहेब आहेत, हिंदु आहेत, मुसलमान, पार्शी वगैरे सर्व आहेत. हें पहा आपल्या प्रसिद्ध विद्वन्मणी रावबहादुरांचें नांव, हे दादासाहेब, हे बाबासाहेब, व त्यांचे चिरंजीव; हे रावसाहेब, हेही जाणार. आपली ब्राह्मण मंडळीच ५०–६० आहे.

**गोविंद०**—कृष्णाजीपंत करा तर सही, गम्मत तर पहायला मिळेल.

**कृष्णाजी०**—द्या पाहूं वही इकडे, (वही घेऊन सही करून) उद्यां पांच वाजतां चलायचें नाहीं का?

**नारायण०**—हो बरोबर पांच वाजतां (वही घेऊन) जरूर या हो, जातों. आणखीं ऱ्याच ठिकाणीं जायचें आहे. (जातो.)

**कृष्णाजी०**—बरं यावं. (पडदा पडतो.)

**अंक दुसरा समाप्त.**

---

## अंक ३.

### प्रवेश १ ला.

स्थल—कृष्णाजीपंतांचें घर.

( कृष्णाजीपंत व गोविंदराव.)

**कृष्णाजी०**—काल पानसुपारीचा मोठाच थाट झाला बुवा.

**गोविंद०**—खरेंच, काय झालें तें सांगा तर खरें. मंडळी कितीशी होती?

**कृष्णाजी०**—सुमारें दीडशें असेल. बहुतकरून मोठमोठीं धेंडेंच होतीं. त्यांत आपले विद्वन्मणी उभयतां रावबहादुर, व रावसाहेबही होते. त्यांनीं मोठाच आनंद प्रदर्शित केला व पाहुण्याचेंही मोठें गौरव केलें. रावबहादुर म्हणाले कीं, असले प्रसंग वारंवार आल्यानें सर्व जातींत मित्रभाव वाढेल. मग दोराबजी पेटिट यांनीं व एका दोघां साहेबांनीं उठून अशाच अर्थाचीं भाषणें केलीं. हें आटोपल्यावर मंडळी इकडे तिकडे फिरूं लागली. कोणी गप्पा मारूं लागले. थोड्या वेळानें सर्वजण पुनः एकत्र जमले. तेव्हां टेबलांवर कांहीं फळें, चहा, बिस्किटें वगैरे पदार्थ बबरजीनें मांडले. हा थाट होणार हें पुष्कळशा मंडळीस पूर्वी कळलें नसावेंसें वाटतें. सर्वांच्या पुढें पदार्थ मांडले तेव्हां, आमच्या ब्राह्मण मंडळींत मोठीच गम्मत झाली. कित्येकांच्या तोंडचें पाणीच पळालें, कित्येकांना आनंदही झाला. कोणी तर एकमेकांच्या तोंडाकडे 'ऑ'—पसरून वेडयासारखे पाहूं लागले. कोणी म्हणे, 'हँ, चालूं द्या, येथें कसलेंही भय नाहीं, बेफिकीर

चालवा.' तेव्हां बहुतेकांनीं यथेष्ट हात मारला. मग काय विचारतां, जिकडे तिकडे आनंदीआनंदच होऊन गेला. ( इतक्यांत नानासाहेब व भाऊशास्त्री प्रवेश करतात त्यांस पाहून ) यावें नानासाहेब. शास्त्रीबुवा, बसावें.

**भाऊशा०**—हा काय आजकाल अनर्थ मांडला आहे. कोण हा ब्रह्मघोंटाळा! हर हर! या धर्माची अशी नीच दशा होणार काय देवा!!

**कृष्णाजी०**—अहो म्हणतां काय शास्त्रीबुवा, झालें तरी काय?

**भाऊशा०**—काय? काय झालें! तुम्हाला ठाऊक नाहीं! अहो हिंदुधर्माचे मोठे पुरस्कर्ते तुम्ही आपणांला म्हणवितां ना, आम्हा सर्वांचा पुढारीपणा घेतला आहेना तुम्ही?

**कृष्णाजी०**—बरें मग, हो घेतला आहे, आणि पुढें ही तसाच चालवूं. पण तुमचें म्हणणें काय?

**नानासा०**—( संतापून ) काय ह्मणतां! दुष्ट, विश्वासघातकी, पाजी लोक कुठले, शरम नाहीं वाटत, पुढारीपणा मिरविला पाहिजे काय?

**गोविंद०**—हाँ, हाँ, हाँ, हें काय नानासाहेब; बोलतां कोणाशीं तुह्मी.

**कृष्णाजी०**—( चकित होऊन ) काय? हें आहे काय? विचार केला, खबरदार चकारशब्द काढाल तर, तुह्मी श्रीमंत झालां तर आपल्या घरचे.

**नानासा०**—झालें काय! काय याला म्हणावें. काढाहो शास्त्रीबुवा तें वर्तमानपत्र, काढा कुठें आहे तें. ( शास्त्रीबुवा पत्र पुढें करतात ) पहा पहा, तो माथाळा पहा! अरेरे कोण हा अधर्मपणा!

**कृष्णाजी०**—(पत्र घेऊन) 'बाबू विद्याभूषण टागोर यांचें स्वागत' (आश्चर्यानें) चहा प्याले म्हणून सर्वांची नांवें दिलीं आहेत. हें माझें नांव. दगारे दगा, विश्वासघात केला दुष्टांनीं, अरे चोरानों, समजलों आतां. (पत्र जमिनीवर आदळतो—विचारांत पडतो.)

**नानासा०**—कां आतां बोबडी वळली. अहो, हिंदुधर्माभिमानीं बोला बोला, मोठ्या तोऱ्यानें बोला. हातहातलांब गफा मारून फिरवा बिचाऱ्या धर्मभोळ्या लोकांच्या डोक्यावर हात! अहो, धर्माचे उद्धारकहो, पहा! हा धर्म तुमच्या नांवानें ओरडतो आहे पहा, म्लेंच्छ यवनादिकांच्या घरीं महारधेडादि बुटलेरांच्या हातचीं चहा, भिस्कुटें यांवर यथेच्छ हात मारून हिंदुधर्माचा उद्धार करण्याचा हा नवीन मार्ग नव्हे का! अरेरे, काय भ्रष्टता ही. केवढें महत्पाप! धिक्कार तुमच्या मनुष्यपणाला. तुम्हांपेक्षां ते बिचारे सुधारक बरे. ते उघड सांगून सवरून तरी कांहीं करणें तें करितात. ते विश्वासघात करीत नाहींत किंवा लोकांना फसवीत नाहींत. त्यांच्यांत खरेपणा तरी आहे. परंतु तुम्ही घातकी, महत्वाकांक्षी, दगलबाज लोक. तुमचें बोलणें मानभावाचें आणि करणी कसाबाची आहे. अरेरे, अझूनपर्यंत कसें आम्हांस हें कळलें नाहीं. या पाजी लोकांनीं सर्व भ्रष्टाकार करून सोडला आहे. निःपात होवो यांचा.

**कृष्णाजी०**—घ्या, किती पाहिजे तेवढें तोंडसुख घ्या.

**नानासा०**—यांना शरम नाहीं शरम. कवडीच्या मोलाची अक्कल नसतां देशहित करण्याचा टेंभा मिरवून धाड घालून कीर्ति संपादन करण्याची तुम्हाला अशी

हांव ना? आग लागो तुमच्या अकलेला आणि त्या तुमच्या कीर्तीला. अरे हा तुमचा पाजीपणा जगजाहीर करून तुम्हांला कवडीमोल करून टाकतों पहा! विधवा बोडक्यांसारख्या तुमच्या मिशा भादरून शेण खावूं घालून सर्वांपुढें नाकें घासायला लावीन तरच मी नांवाचा नानासाहेब. चला, उठा शास्त्रीबुवा. असल्या भ्रष्टांचा विटाळही नको.

**गोविंद०**—नानासाहेब हें तुम्हाला योग्य नाहीं, शांत व्हा. असल्या गोष्टींचा शांतपणेंच विचार केला पाहिजे.

**नानासा०**—बस, पुरे झालें आतां.

**कृष्णाजी०**—( एकीकडे ) या स्वारीवर विश्वामित्राचें पिशाच उतरलें आहे, तेव्हां आपण जमदग्नीचा अवतार घेतला तरी होणार आहे; पण तेणेंकरून आपलीच इमारत ढांसळेल. ( उघड ) नानासाहेब, हें मीच म्हणून सहन केलें समजलांत. इतकी एकाकीं तब्यत गरम होऊं देणें तुम्हाला योग्य नाहीं. आतां माझें थोडें ऐका, विचार करा, जर कांहीं वावगें असलें, तर आम्ही आपले आजपासून बहिष्कृत. मी तयार आहें या गोष्टीस.

**भाऊशा०**—नानासाहेब, ऐकून तर घेऊं, पुढें आपला विचार आहेच.

**नानासा०**—तुम्ही ऐका पाहिजे तर; मला सर्व समजून चुकलें आहे.

**कृष्णाजी०**—मी सत्यास स्मरून सांगतों कीं, तेथें मी नुस्ता चहा मात्र प्यालों. बिस्कुटें कांहीं खाल्लीं नाहींत. आतां चहा कां प्यालों म्हणाल तर मला तो पिण्यांत कांहीं हरकत वाटत नाहीं. जर तुम्हीं साहेबांच्या व बुटलेरांच्या हातचें सोडावाटर किंवा बर्फ, शरबत

वगैरे पीत आहां व तें पंक्तींतही खपत आहे व साहेबांच्या हातचीं पाहिजे तीं औषधें पीत आहांत तर चहा पिण्यांत काय दोष आहे. त्यांत दोष नाहीं हें एखादें कालचें पोरही सांगेल.

**भाऊशा०**—वः, चहा पिणें व बर्फ, शरबत पिणें किंवा औषध घेणें आपण सारखेंच समजतां काय? चहा शिज-विला जात नाहीं का? त्यामुळेंच तो असेव्य आहे.

**कृष्णाजी०**—मग शरबतें किंवा औषधें हीं तरी काय आहेत? जशीं तुम्ही चहाचीं पानें उकळतां, तसेंच शरबतही गुलाबाच्या कळ्या उकळून त्यांचें पाणी घालून करतात. औषधेंही तशींच; दोहोंच्या क्रिया सारख्याच; त्यांत पदार्थही सारखेच; ज्यांच्या हातचें शरबत व दुसरे काढे आपण पितां, त्यांच्याच हातचा आह्मी चहा प्यालों. मग तुम्हां आम्हांत काय फरक? तुम्ही सोंवळे व आह्मीं ओंवळे का झालों?

**भाऊशा०**—वहावः तर मग बिस्किटें व त्यांच्या घरची शिजलेली भाजी खाण्यांत तरी कां दोष मानावा? भात सुद्धां चालेल. कारण यांची सुद्धां क्रिया तीच. चहा जशीं पानें आहेत तशीच भाजी सुद्धां पानें! मग खुशाल जाऊन सोंवळें नेसून साहेबांच्या टेबलावरील सर्व पदार्थांवर हात मारून पुनः युष्मादिक आपले सोंवळे वैदिक ब्राह्मण बनलेलेच आहेत! असेंच ना कृष्णाजीपंत?

**नानासा०**—हेंच खरें, शास्त्रीबुवा! हे तुमचे पुढारी व हिंदुधर्माचे पुरस्कर्ते साहेब बहादुर तुम्हाला वैदिक धर्मांचें ज्ञानतत्त्व शिकवितात तेंच खरें! (कृष्णाजीपंतास) महाराज, आपलें पांडित्य आतां पुरे; मी आपणास आतां

निक्षून सांगतों. आपणाला प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. आम्हीं हें प्रकरण श्रीशंकराचार्यांपर्यंत नेणार, आणि या लोकांचा फजितवाडा करणार. त्या पूर्वींच आपण प्रायश्चित्त घेतलें तर ठीक, अशानें आपला कांहीं तरी बोज राहील, नाहीं तर आजपर्यंत मिरविलेलें शहाणपण एका क्षणांत घसरेल. कोणी आपल्यावर विश्वास ठेवणार नाहीं. ना आमच्यांत, ना सुधारकांत, हात डोक्यावर घेऊन मध्येंच रडत बसाल.

**कृष्णाजी०**—(एकीकडे) या मूर्खांशीं बुद्धिवाद करून कांहीं चालायचें नाहीं. यावेळीं यांस मोठेपणा देऊनच यांचे दांत पाडले पाहिजेत. या सुधारकांनीं या थरास गोष्ट आणली काय? यांनीं आह्मांला तोंडघशी पाडण्याचा हा घाट आणला आहे काय? पाहून घेईन. (उघड) बरें नानासाहेब, आपण ह्मणतां त्या गोष्टीस मीं तयार आहें. आपल्या बाहेर मी नाहीं. परंतु माझा चहा पिण्यांत व लोकांस पिवविण्यांत आणखी एक उद्देश होता तो आपणास आतां कळवितों, व पुढें काय करायचें हेंहीं आपणास मी सांगतों. पहा, या सुधारकांपैकीं रावबहादुरादि मोठमोठे लोक दोन्ही डगरींवर पाय देऊन आहेत. त्यांची खोडकी जिरविण्याची ही एक उत्तम संधि मीं साधली आहे. कित्येक लोक आपणांस सुधारकही ह्मणवितात व जुन्या लोकांप्रमाणें वागून तुह्मा आह्मासही फसवूं पाहतात. त्यांना पालथें पाडण्याचा हाच प्रसंग आहे. हे सर्व लोक, जे चहा प्याले आहेत, त्यांस प्रायश्चित्त घेवविलें पाहिजे, पुनः इतकें करूनही जातीबाहेरच ठेवायचे. त्यांनीं प्रायश्चित्त घेतलेंच, तर लोकांत त्यांच्या अकलेची

परिक्षा होईल आणि प्रायश्चित्त घेऊनही जातींत घेतलें नाहीं ह्मणजे त्या फजितीस पारच नाहीं. दोहोंकडूनही त्यांची छीः थुः होईल आणि त्यामुळें सर्वच सुधारकांचा बभ्रा होऊन ते लंगडे पडतील. असें झालें कीं आपल्या हिंदुधर्माचें व आपलें पुनः वर्चस्व आहे तें आहेच.

**गोविंद०**—वः! कृष्णाजीपंतांच्या बुद्धीची कमाल आहे बुवा.

**भाऊशा०**—ही युक्ति तर आहे खरी.

**नानासा०**—ठीक आहे; पण आपण अगोदर प्रायश्चित्त घेऊन मोकळे व्हा. मगच्या या गोष्टी आहेत.

**गोविंद०**—त्याला कुठें ते नाकबूल आहेत!

**कृष्णाजी०**—आमचें तर झालें; परंतु रावसाहेबांविषयीं काय?

**नानासा०**—त्यांच्याकडून आतांच इकडे आलों. ते आजच प्रायश्चित्त घेणार आहेत. त्यांना आज खूबच झाडलें.

**कृष्णाजी०**—झालें तर, आह्मींही उद्यां प्रायश्चित्त घेऊन मोकळे होऊं. (पडदापडतो.)

### प्रवेश २ रा.

**स्थल**—दादासाहेबांचें घर.

(दादासाहेब व बाबासाहेब.)

**बाबासा०**—त्याचा एवढा तो बाऊ कसला, दादासाहेब?

**दादासा०**—प्रायश्चित्त घेण्यासाठीं या लोकांनीं माझी पाठ पुरविली आहेना. शिवाय रावबहादुरांसारख्या आमच्या सुधारकांनीं व मोठमोठ्या मंडळीनें प्रायश्चित्त घेतलें, ह्मणून हें आह्मांला कोडें पडलें आहे.

**बाबासा०**—तुह्मी पण एवढ्या बुचकळ्यांत कां पडलां आहां कोण जाणें. आपण जेव्हां रावबहादुर होऊं तेव्हां मग असल्या पॉलिसिच्या भरीस पडूं. परंतु सध्यां तर चकचकीत त्यांना लिहून पाठवा कीं, आह्मी आमच्या धर्ममतानुसार वागलों; चहा पिण्यांत आह्माला कांहीं दोष वाटत नाहीं. एवढें लिहिलें कीं सर्व निकाल: आह्माला ग्रामण्य ह्मणून ह्मणतील. त्यांत त्यांनीं नवीन तें काय सांगितलें? आजपर्यंत अर्धेमुर्धें ग्रामण्य होतेंच. असें असतांही जे लोक आमच्याशीं व्यवहार ठेवणारे आहेत, ते ठेवतीलच. या नवीन पुटानें ह्मणजे ते बिचकून जातील ही गोष्ट नाहींच. मग उगीच शिंगें मोडून वासरांत शिरून दोहींकडून हानि करून कां घ्यावी? दादासाहेब, आपण याचा पूर्ण विचार करावा.

**दादासा०**—बरें आहे; आतां याचा निकाल केलाच पाहिजे.

**बाबासा०**—त्यांत आहे काय? प्रायश्चित्त घेत नाहीं ह्मणून पत्र पाठवा, झालें. मी येतों आतां.

**दादासा०**—बरें यावें. ( बाबासाहेब जातात. ) काय करावें आतां, यांना वाटतें यांत काय आहे! असल्या माणसांना कोणत्याच गोष्टीचा खोल विचार करायला नको. परंतु आपल्याला क्षुल्लक गोष्टही विचाराशिवाय करितां येत नाहीं. या लोकांना तारतम्य नाहीं. कोणतीही गोष्ट करावयाची ह्मणजे, एक घाव आणि दोन तुकडे. असल्या उतावळ्यांच्या नादीं लागून आमची सर्वच पॉलिसी ढांसळावयाची. ( विचार करून ) छे, छे, हें ठीक नाहींच. चांगलाच विचार केला पाहिजे—पण असें केलें तर?

(थांबून) हो हो, रावसाहेबांची व कृष्णाजीपंतांचीच युक्ति सोळा आणे आहे. नाहीं तर त्या रावबहादुरांनीं प्रायश्चित्त कां घेतलें असतें. तसेंच करावें ह्मणजे सर्व सुरळीत होईल. हे उतावळे लोक जरा नाकें मुरडतील, पण त्यांची समजूत मागाहून करितां येईल. इकडचें आपलें ठरलेलेंच आहे. मग उशीर कशाला. पांच सात रुपये फेंकून जर जुने लोक थंड होत आहेत तर ही संधि घालविणें ह्मणजे केवळ मूर्खपणा होईल. शिवाय आपलें कर्तव्य तर करायचेंच. (मान डोलवून) हो, असेंच केलें पाहिजे. (जातात.)

### प्रवेश ३ रा.

#### स्थल—दादासाहेबांचें घर.

(दादासाहेब, कृष्णाजीपंत व नानासाहेब.)

**कृष्णाजी०**—खरोखरच या वेळीं दादासाहेबांची तारीफ करावी तेवढी थोडीच. याला ह्मणतात दूर दृष्टि आणि धोरण. प्रायश्चित्त घेऊन किती बाजू संभाळल्या. लोकांस हें ऐकून फारच आनंद होईल, कां नानासाहेब?

**नानासा०**—असें तर खरेंच. जगद्गुरूंनीं तर या वेळीं मोठेंच औदार्य दाखविलें ह्मणायचें. परंतु इकडच्या मंडळीचे काय विचार आहेत तें पहावें.

**दादासा०**—माझे तर बुवा हे विचार आहेत—कोणाचेंच मन दुखवूं नये. सर्वांस प्रिय वाटेल तेंच करावें, आणि आपण तर सर्व लोकांस घेऊन चालणार. यांतच शहाणपण आहे. आमच्या मागें उतावळे सुधारक ह्मणून पालुपद जें तुह्मीं लावतां तें ह्मटलें नको. (इतक्यांत बाबासाहेब, वसंतराव व माधवराव प्रवेश करितात, त्यांस)

या बाबासाहेब. माधवराव, आतां आपली प्रकृति कशी आहे?

**माधव०**—फार चांगली आहे; दादासाहेब.

**बाबासा०**—दादासाहेब, आपली प्रकृति जरा हल्लीं क्षीण दिसते.

**दादासा०**—हो, आमच्या मागें तो एक रोग लागला आहेना! केव्हां त्यापासून सुटेन ईश्वर जाणें. औषध चाललें आहे, परंतु अझून कांहीं गुण दिसत नाहीं. (एकीकडे) हो, बरी आठवण झाली. आतांच जेवण झालें; तें औषध घ्यायचेंच राहिलें, बरें मग घेऊं. (इतक्यांत नारायणवर्मा प्रवेश करतो, त्यास) या नारायणवर्मा, कांहीं काम आहे वाटतें. बसा इकडे.

**नारायण०**—कांहीं दुसरें काम नाहीं. ही चिठ्ठी आमच्या साहेबांनीं दिली आहे. (पत्र देतो तें घेऊन दादासाहेब वाचतात, इतक्यांत बळवंत चाकर दादासाहेबांचें औषध घेऊन येतो.)

**बळवंत**—हें आपणाला आतां प्यायचें आहे ना?

**दादासा०**—अरे तें इकडेच आणलेंस का? बरें तर आण आतां. औषध घेऊन पिऊं लागतात, इतक्यांत बाबासाहेब विचारतात.)

**बाबासा०**—हल्लीं कसलें औषध घेतां हें. (दादासाहेबांस औषध पितां पितां थोडासा उत्तर देण्यास वेळ लागला ह्मणून बळवंत उत्तर देतो.)

**बळवंत**—हें कॉडलिव्हर ऑईल चाललें आहे, बाबासाहेब.

**दादासा०**—(पिऊन झाल्यावर रागावून) अरे, पण हें तुला आजपासून बंद करायला नव्हतें मी सांगितलें?

**बळवंत**—( आपल्याशींच ) मला तर कांहीं सांगितलें नव्हतें. ( इतक्यांत गणू पाणी बिछायतीवर आणतो.)

**दादासा०**—अरेरे, कुठें पाणी आणलेंस हें, दिसत नाहीं तुला. जा, तें फेंक, दुसरें आण ; आणि दरवाजावरच ऐस. मी येतों तिकडे. ( माधवराव व वसंतराव एकमेकांकडे पाहून हंसतात. गणू व बळवंत जातांजातां एकमेकांशीं बोलतात. )

**गणू**—कालपासून दादासाहेब काय असें करतात कांहींच समजत नाहीं.

**बळवंत**—आतां माझ्या लक्षांत आलें तें. हें कालच्या प्रायश्चित्तामुळें आह्माला प्रायश्चित्त भोगावें लागतें आहे. समजलास? ( जातात, दादासाहेबही जातात.)

**नानासा०**—( कृष्णाजीपंतास हळूच ) हें पौष्टिक औषध आहे वाटतें; आमच्या घरांत चालविलें तर कसें हो?

**कृष्णाजी०**—अहो तें माशाचे तेल आहेना? तुह्माला चालेल तें?

**नानासा०**—( आश्चर्यानें ) ह्मणजे! हा घोंटाळा मला कांहींच समजत नाहीं. कालच यांणीं प्रायश्चित्त घेतलें ना? ( दादासाहेब येऊन बसतात. )

**कृष्णाजी०**—मग सांगेन. एव्हां उगी रहा.

**बाबासा०**—दादासाहेब, शेवटीं असंभवनीय गोष्ट घडलीच ना? असें आपण कराल हें आमच्या स्वप्नींसुद्धां नव्हतें. हें करणें आपणाला योग्य दिसलें काय?

**दादासा०**—( एकीकडे ) हें प्रायश्चित्त नव्हे पण एक मोठा रोगच मला जडला आहे. कोणाला ह्मणून उत्तर

देत बसूं. (उघड) अहो, माझीं मतें काय आहेत हें पुष्कळदां मी आपणास सांगितलें आहे. आह्माला कोणाचींच मनें दुखवायचीं नाहींत. आणि जुन्या लोकांचीं तर मुळींच नाहींत.

**माधव०**—परंतु नव्या लोकांचीं दुखवलींत ना? आपण हमेशा ह्मणत असतां कीं नव्या होतकरू लोकांचीं मनें दुखविल्यापासून नुकसान फार. देशाच्या भल्या बुऱ्या स्थितीची मदार काय ती तरुण लोकांवर आहे. तर त्यांणींच आतां असला प्रकार पाहून काय समजावें तरी!!

**दादासा०**—जे शाहाणे असतील त्यांणीं मनास वाईट वाटूं देऊं नये; नवीन मंडळी आपणास शहाणी समजत असेल तर मी जो हा प्रकार केला त्याचें कारण त्यांच्या लक्षांत आल्यावाचून रहाणार नाहीं. नारायणवर्मा, काय बुवा तुह्मीं आमच्या मागें ससेमिरा लावून दिला आहे हा?

**नारायण०**—आह्माला काय ठाऊक हे लोक असले सोहळे करून घेणार होते तें. यांच्या मनांतून कोणाला नकळत खायचें होतें हें आह्मी तरी कसें समजावें बरें? पुढच्या वेळीं खबरदारी ठेवूं ह्मणजे झालें. ही आंतील गोम आह्मांला माहितच नव्हती. हेच लोक व्याख्यानें देत असतात कीं, जातिभेद नसावा, अशी सुधारणा करावी, यँव करावें, त्यँव करावें. तेव्हां या त्यांच्या बढाईवर आह्मी गेलों. तें त्यांचें ह्मणणें सभेपुरतेंच असतें तें आतां कळलें. (दादासाहेबांचा मुलगा प्रवेश करतो.)

**मुलगा**—बाबा, आज सकाळीं बिस्कुटाचा डबा आणविलाना आपण, त्यांतून आईनें कीं नई मला दोनच दिलीं आणि ताईला मात्र तीन.

**दादासा०**—( संतापून ) जा तिकडे. कोण आहे रे, जा याला घेऊन. ( मुलगा रडत जातो. )

**माधव०**—( एकीकडे ) देवा काय हें ढोंग! कोण हें आचरण, माझ्यानें तर आतां बोलल्याशिवाय रहावत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, या पोरांना विद्वान् व मोठ्या लोकांवर टीका करण्यांत फुशारकी वाटते. परंतु असले धडधडीत प्रकार पाहून कोणाच्यानें कसें उगी रहावेल? काय होईल तें होवो. असल्यांच्या राज्ञी इतराजीला काय करायचें? ( उघड ) नारायणवर्मा, तुमच्या तेथील मेजवानीनें मनुष्यांचें वर्गीकरण उत्तम केलें. सोनें, लोखंड व तांबें मिळून जी पंचधातु बनते तिला खूब ताव लावला ह्मणजे त्या सर्व निरनिराळ्या होतात. तसेंच या प्रकरणानें खऱ्या खोट्या योग्यतेचे पुरुष निरनिराळे अचुक छाटून काढले. विद्वान् व मोठे ह्मणविणाऱ्यांची जर ही स्थिति, तर बिचाऱ्या इतर जनांनीं काय करावें?

**बाबासा०**—( उगी रहाण्यास खूण करतात. )

**कृष्णाजी०**—काय चमत्कार पहा, कालचीं शाळेंतील पोरें, दादासाहेबांसारख्यांना नीति शिकवायला आलीं. कोण अक्कल ही! अहो महाराज, तुमची विद्या काय? योग्यता काय? तुमचा अनुभव किती? कोणाशीं कसें बोलावें याचें ज्याला ज्ञान नाहीं, तो नीति शिकवायला चालला पहा! जे दुर्वर्तनीं असतात तेच बाहेरून सदाचरणाचा व नीतीचा मोठा आव घालतात. परंतु अंदरकी खूण आह्मी जाणतों आहों; बाबासाहेब व वसंतराव यांच्यासारखे भोळे असतील तेच फसतील; समजलां?

**माधव०**—महाराज, जरा सभ्य मनुष्यासारखें बोला; आपलें सदाचरण व नीति प्रसिद्धच आहे.

**दादासा०**—या गोष्टी येथें कशाला पाहिजेत?

**वसंत०**—कृष्णाजीपंत, आह्मी फसलों तर आपण मात्र हुशारीनें रहा!

**कृष्णाजी०**—बरें,येईल त्याचा अनुभव. हातच्या कांकणास आरसा नको. या स्वारीला मी पूर्ण ओळखतों आहें.

**बाबासा०**—वसंत, बोलूं नको. दादासाहेब, आह्मी येतों आतां. (नारायणवर्मा, वसंतराव, माधवराव, बाबासाहेब जातात.)

**नानासा०**—(एकीकडे) हा काय घोंटाळा आहे हें कांहींच समजत नाहीं. तें पोर बिस्कुटें काय मागतें, ते माशाचें तेल काय पितात, कालच यांणीं प्रायश्चित्त घेतलें ना! हें कांहीं ठीक नाहीं. बरें आहे. अशांची खोडच मोडली पाहिजे. (उघड) चला कृष्णाजीपंत, उठा.

**कृष्णाजी०**—चलाच. दादासाहेब, येतों आह्मीं. (उठतात.)

**दादासा०**—बरें आहे! (पडदा पडतो.)

## प्रवेश ४ था.

### स्थल—रस्ता.

(कृष्णाजीपंत व गोविंदराव बोलत प्रवेश करतात.)

**कृष्णाजी०**—चार चौघांत त्याणें मला असें ह्मणावें, खरोखर सांगतों गोविंदराव, तेव्हांपासून माझ्या अंगाची आग होऊन राहिली आहे. आतां त्यांना चांगलाच हात दाखवितों पहा.

**गोविंद०**—असें नुस्तें बोलून काय फळ, त्याच्या खटपटीस लागलें पाहिजेना! पहा आतां ढिलाई करून उपयोग नाहीं. हे दोघे माधवराव व तो वसंतराव आपोआपच नाहींतसे होतील, व हें घरच्याघरच बसून जाईल, अशी कांहीं तजवीज करूं या. यांत आपल्याला लोकांचीही मदत घ्यायला मिळेल. कारण, ह्या सुधारकांस ते पाण्यांत पहात आहेत. त्यांत आपण आणखी थोडीशी भर घातली कीं, यांचे पुरे बारा वाजलेच समजा. मी याला उत्तम युक्तिही योजिली आहे.

**कृष्णाजी०**—ती कोणती, सांगा पाहूं?

**गोविंद०**—हें पहा, आपली प्रस्तुत रूढि मोडून जे जे ह्मणून नवीन उद्योग हे लोक करीत आहेत, ते त्यांचे उद्योग अनीतिप्रवर्तक आहेत असें लोकांस आपण भासविलें व थोड्याशा तसल्या गोष्टी त्यांना दाखविल्या, ह्मणजे झालें; आणि हे सुधारक लोक दुराचारी व सर्व प्रकारें भ्रष्ट आहेत असें दाखविण्यासाठीं मी पुष्कळ गोष्टी योजून ठेविल्या आहेत. प्रथम हीच गोष्ट पहा. मोठ्या मुली वाढविल्या व लग्न केल्याशिवाय घरीं ठेविल्या ह्मणजे काय परिणाम होतो, हें लोकांच्या मनांत बिंबविण्यासाठीं, इंदिरा व वसंतराव या बहीणभावांचाच अति नीच संबंध आहे असें लोकांस भासवूं. तसेंच माधवराव हा दुर्वर्तनी व व्यभिचारी आहे असा गवगवा करूं; ह्मणजे या सुधारकांची फजिती होईल; व तें घर धुळीसच मिळून जाईल.

**कृष्णाजी०**—तुह्मी म्हणतां हें खरें; परंतु लोक मिळाले पाहिजेत, व त्यांचा विश्वास या गोष्टींवर बसला पाहिजे. हेंच कठीण दिसतें

**गोविंद०**—अहो हें सहज होईल. पहा, प्रथम यांची आपसांत फुटाफूट झाली कीं, काम झालें. इंदिरा व वसंत यांच्याविषयीं गांवांत बभ्रा झाला, व तो माधवाच्या कानीं आला कीं, माधवाच्या मनांत संशय आल्याशिवाय रहाणार नाहींच. शिवाय मीही या गोष्टीस पाहिजे तसें रूप देईन. माधव व वसंत यांच्यांतच प्रथम कलह, द्वेष व मत्सर उत्पन्न केला पाहिजे आणि तें मी सहज करीन.

**कृष्णाजी०**—पहा बुवा, मीही लोकांची मदत पहातों.

**गोविंद०**—मला तुमच्याकडून येवढेंच पाहिजे आहे.

**कृष्णाजी०**—मग ठीक आहे, हाही एक प्रकार पाहावा. (जातात.)

### प्रवेश ५ वा.

**स्थल**—बाबासाहेबांचें घर. (माधवराव आणि वसंतराव.)

**माधव०**—ते रावबहादूर व दादासाहेब अशीं शंभर प्रायश्चित्तें घेऊन, व कदाचित् पंचगव्याचे घडेच्या घडे पिऊन फस्त करून सोंवळे होऊं लागले ह्मणून आपण कां हातपाय गाळावे. विद्वान् व श्रीमंत लोकांच्या दूरदृष्टीचे हे प्रकार आपल्या बुद्धीच्या बाहेर आहेत. लोकांस त्यांची कृति कशी काय वाटते तें आपण पाहूं ह्मणजे झालें. मात्र, आपलें कर्तव्य असें जें आपणास वाटतें तें जर न केलें तर आपण अपराधी होऊं.

**वसंत०**—परंतु हे मोठमोठे नावाजलेलेच लोक जर असे प्रकार करूं लागले व आह्मांला तोंडघशी पाडूं लागले, तर विश्वास तरी कोणावर ठेवावा? मला तर आतां आमच्या विवाहाची आशा दिसत नाहीं. एखादे वेळीं दादासाहे-

बांसारखे सुधारक ह्मणविणारेच कांहींना कांहीं विघ्न आणतील, किंवा आमचे कसे हाल होतात तें दुरून पाहत राहातील.

**माधव**०—अँः! असल्या लोकांविषयीं विचारच करूं नये. मोठेपणा, श्रीमंती व मानमान्यता यांच्या मागें धांव घेणारे लोकच अशा सत्कृत्यास अपायकारक होतात, हें इतिहासप्रसिद्धच आहे. तेव्हां यांची परवा न बाळगतां आपण चालावें. तुमच्या लग्नाविषयीं मला वाटतें तें मी सांगतों. मी आजारी होतों कीं नाहीं, तेव्हांपासून आमचे बाबा आमच्या आईसाहेबांच्या सांगण्यांत जरा कमी वागूं लागले आहेत. आणि तुजवर तर त्यांची आजकाल मेहरबानी दिसते. तुझें जाणेंयेणेंही आमच्या घरीं आतांशीं पुष्कळदां होतें. परंतु ही स्थिति आमच्या त्या आईसाबांच्या स्वभावामुळें फार दिवस चालेल असें मात्र समजतां कामा नये. ती बाई केव्हां कसें विघ्न आणील याचा नियम नाहीं. याकरितां, आतांच तुमच्या लग्नाचा योग जमवून आणला पाहिजे. मग कसें काय? तुझा विचार काय आहे?

**वसंत**०—माझ्याही मनांत तोच विचार घोळत आहे. तूं ह्मणतोस तसें सर्व आहे खरें; परंतु वेणूशीं बोलण्यास किंवा तिच्याकडील हकीगत कळण्यास मुळींच साधन नाहीं, त्यामुळें निरुपाय झाला आहे. आणि दिवसेंदिवस तुझी आई वेणूचे अधिकाधिकच हाल करिते आहे. (खिशांतून पत्र काढून) हें पहा, सकाळीं गेलों होतों तेव्हां तिनें हें पत्र दिलें आहे. असाच जर आणखीं थोडे दिवस आपण आळस केला तर एखादे वेळीं दुःख असह्य होऊन ती प्राणत्यागही करील. (पत्र देतो.)

**माधव०**—( पत्र वाचतो. ) " अजूनपर्यंतही आपण किती दिवस घालविणार? माझे येथें जे हाल होताहेत ते आपल्या ध्यानींमनींही नाहींत ना? ईश्वरानें मलाच काय हो अशी दुर्दैवी निर्माण केली आहे? इतके दिवस माधव तरी होता, दुःखामध्यें तो समाधान करीत असे, पण आतां तोही नाहीं. रोज शिव्यागाळी, टोमणी, लाथाबुक्यांचा मार हेंच ईश्वरानें माझ्या कपाळीं लिहिलें आहे काय हो? माधव इतका आजारी होता ना! माझें मन त्याला पहाण्याकरितां इतकें धांव घेत होतें, पण तिकडे जातें, असें ह्मटल्याबरोबर या आईनें माझ्या तोंडांत मारून नाहीं नाहीं तसल्या शिव्या देऊन माझी विटंबना कीं हो केली. मी अशाच दुःखांत मरणार काय हो? असें होतें तर माधवानें आणि तुह्मीं मला आशा तरी लावायची नव्हती. मग इतकें दुःखही झालें नसतें. इतर बिचाऱ्या मजसारख्या पुष्कळ असतात त्यांतलीच मी एक, असें मानून दिवस कंठिले असते. "

**माधव०**—( डोळ्यांस पाणी आणून ) हर हर, माझ्या लाडक्या वेणूची अशी दशा व्हावी ना! मी तिला एकटी टाकिल्यामुळें तिचे हे हाल होत आहेत. मी बंधु असून काय केलें–( पत्र पुनः वाचतो.) " माझ्यामुळें बाबांनासुद्धां फार त्रास व दुःख होत आहे; तें पाहून तर माझी रात्रच्या रात्र रडण्यांत जाते. त्यांच्या पोटीं येऊन त्यांस सुख देणें तर एकीकडेसच राहिलें, पण उलट त्यांच्या दुःखाला मात्र मी अभागी राक्षसीण कारण झालें आहे. या स्थितीपेक्षां देव मला मरण देईल तर मी आनंदानें त्याला तयार आहे. माझी ही दैन्यावस्था पाहून सवरून आपण जो इतका उशीर

लावीत आहांत, याचें कारण तरी काय? मी आपल्या अप्रीतीस कारण झालें काय? किंवा माझ्याकडून कांहीं दोष घडला आहे?"

**वसंत०**—( डोळ्यांत पाणी आणून एकीकडे ) नाहीं नाहीं, प्रिये, हा तुझा वसंत इतका कठोर नाहीं होणार.

**माधव०**—( पत्र वाचतो ) "नाहीं हो नाहीं, मजकडून कांहीं तसें झालें नसावें. व आपलेंही मन इतकें कठीण होणार नाहीं. मी तें अंतःकरण जाणतें आहे. माधवानें त्याची मला पूर्ण खात्री करून दिली आहे. तर मग, मी सर्व हवाला परमेश्वराच्या इच्छेवर सोडतें. त्याचीच इच्छा मी या घोर यातना सोसून मरावें अशी असेल, तर आपण तरी काय करणार? असें असेल तर मग मला जो मार्ग सुचेल तो मी धरीन; कारण आतां मला कोणीच पाठीराखा नाहीं. हें पत्र दुःखाच्या असह्य वेदनांच्या झपाट्यांत परंतु मोकळ्या अंतःकरणानें लिहिलें आहे; त्याची पाहिजे ती वाट लावावी. एक दोन दिवसांत तरी, आपल्याकडून कांहीं समजेल, ही आशा धरून मात्र बसलें आहें. पुढें आपली मर्जी. कृपाकरून माधवालाही हा मजकूर सांगावा.

आपली होऊं इच्छिणारी,

**वेणू.**"

**वसंत०**—माधवा, या पत्रानें तर मला मोठा चटका लाविला आहे. राहून राहून आठवण येते आणि मन सद्गदित होऊन कांहीं सुचेनासें होतें. अरेरे, तिचे असे हाल करण्यास त्या आईचे हात तरी कसे वाहातात! मला तर आतांच उत्तर पाठवायचें आहे. याकरितां तुजकडे आलों.

**माधव०**—बाबासाहेब येत्या सोमवारीं लग्न उरकून घ्यावें असें ह्मणत आहेत; ह्मणून आपला विचार ठरला आहे त्याप्रमाणें पत्र वेणूला तूंच लिही. आणि त्या रात्रीं दहा वाजतां तयार रहाण्यास सांग. हें सुभद्राहरणच होणार वसंता!

**वसंत०**—ठीक ठीक, तूं कृष्ण सहाय्य आहेसच, मग काय कमी? पण सन्यास मात्र देऊं नको हो बुवा! (जातात.)

## प्रवेश ६ वा.

### स्थल—विष्णुशास्त्र्याचें घर.

(एक कोच पडली आहे, वेणू कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें एक पत्र घेऊन येते.)

**वेणू**—(इकडे तिकडे चौकस मुद्रेनें पाहून) आई घरीं नाहीं, शेजारींच गेली असावी. तोंपर्यंत हें वाचून घ्यावें. अहा! आज माझा भाग्योदयच झाला! किती लौकर पण उत्तर देणें झालें! मी बाई उगीच त्यांना लावून लिहिलें. (पत्र उघडून वाचते.) प्रिये, वेणू—तुझें हृदयभेदक पत्र वाचून अतिशयच दुःख होत आहे. तुझे हाल होताहेत हें मला नाहीं का समजत? मी काय करूं? परंतु ईश्वरकृपेनें त्यांचा लौकरच शेवट होईल. तुला त्या दुःखसमुद्रांतून काढावी यासाठीं जे आह्मी प्रयत्न करीत आहोंत, ते तुला आतां कसे समजावेत? प्रिये आणखी सात आठ दिवस पुढच्या आशेवर हृदय कठीण करून हें दुःख सहन कर. (**वेणू**—आपल्या चरणसेवेच्या लाभासाठीं मी मरणसुद्धां हो सहन करीन.) हें येवढें मोठें कार्य अल्पस्वल्प प्रयासांनीं तडीस जाणारें नाहीं, हें तुला मी सांगावें असें

नाहीं. पहा प्रिये, तुझे निकट संबंधीच आईबाप हे आमचे प्रथम शत्रु होणार ना? शिवाय येथील मोठमोठे श्रीमंत लोक पहिल्यापासूनच आमचे वैरी होऊन बसले आहेत. एक दोन जे आपण सुधारणा पक्षाचे आहोंत असें आजपर्यंत दाखवीत होते, ज्यांच्या भरंवशावर आह्मी कांहीं साहस कर्मं हातीं धरलीं होतीं, त्यांणींच हे प्रायश्चित्ताचे सोहळे करून घेऊन कसा दिग्विजय केला, हें तूं पहात आहेसच. या लोकांनीं तर आमचे हातपायच तोडले आहेत. अशा स्थितींत जर विरुद्ध पक्षाच्या कचाट्यांत आह्मी सापडलों तर एका क्षणांत आह्मांला ते रसातळास पोंचवितील. प्रिये असे जरी आह्मीं एकटे उघडे पडलों आहोंत तरी चिंता नाहीं. योग्य कृत्यास ईश्वर सदा सहाय्य आहे. आणि तें कृत्य तडीस नेण्यास प्राणावरचीं जरी संकटें आलीं तरी आह्मीं डगणार नाहीं. तेव्हां याला अनुसरून जो आह्मीं निश्चय केला आहे तो तुला कळवितों. तुला जें कांहीं करावयाचें त्यांत तूंही चुकूं नकोस. आजपासून आठव्या दिवशीं ह्मणजे सोमवारीं ता० ९ रोजीं बारा वाजतां विवाह उरकण्याचा निश्चय आहे. ( वेणू—[पत्र पोटाशीं धरून] अहाहा! देवा, आज काय हा आनंदाचा दिवस दाखविलास.) तेव्हां त्या रात्रीं दहा वाजतां, तूं तयारीनें मागील दारानें बाहेर ये. त्या वेळीं जिकडे तिकडे सामसूम असेल, सर्व निजलेले असतीलच; दाराबाहेर माधव उभा असेल, तो तुला नेमलेल्या ठिकाणीं घेऊन येईल. मात्र येवढें लक्षांत ठेव कीं, बरोबर अंगावरील एका वस्त्राखेरीज दुसरें कांहीं एक आणूं नको. नाहींतर शत्रु चोरीचा आळ आण-

त्याशिवाय रहाणार नाहींत. प्रिये, मीही तुझ्या भेटीला किती उत्सुक झालों आहें, हें लिहून कसें कळवूं? ईश्वर यश देवो, हीच त्याजवळ प्रार्थना आहे.

तुझ्या समागमाची आशा धरून राहिलेला,

वसंत.

**वेणू**—प्राणनाथ, धन्य केलेंत या दासीला! पण, अरे देवा, आठ दिवस अजून आहेत. आठच लिहिले आहेत वाटतें. पुनः तरी एकदां वाचून घेतें. ( वाचूं लागते, इतक्यांत गंगाबाई हळूच येऊन लपून पहाते. )

**गंगा०**—( एकीकडे ) ही काय बरें येथें वाचीत आहे? हातांत कोणाचें पत्र दिसतें, कोणीकडचें बरें हें? हिची चर्या पहा कशी चमत्कारिक दिसते. यांत कांहीं तरी काळेंबेरें आहे खरें! काय पुढें करते पहावें.

**वेणू**—( पत्र वाचून चोळींत खोंचून विचारांत गर्क होऊन मागें बिछान्यावर पडते. ) अहा! या पत्रास हेंच स्थळ योग्य आहे. आजपासूनच माझें दुःख नाहींसें झालें. प्राणनाथ, आठ दिवसांनीं या दासीला आलिंगन द्याल! आहाहा, काय तो आनंद! कोण तें सुख मी अनुभवणार! त्या मनोहर मुखाकडे मी वाई पाहतच राहीन. ( अंगावर शहारे येतात ) अहा! सर्व सुखांचा अनुभव घेत आनंदलहरीमध्यें मी तरंगूं लागेन! अश्रूनों! आजपासून तुह्मी आनंदाश्रु झालां!!

**गंगा०**—इची मुद्रा पहा कशी ती! हिचे चाळे तरी कसे चालले आहेत! ही त्या वसंतरावाच्या नादीं लागली आहे खरी हो! माझा इतक्या दिवसांचा संशय खराच दिसतो. हें पत्र त्याचेंच असावें खचीत; याचा पत्ता लावलाच पाहिजे.

**वेणू**—( आपणाशींच ) देवा! इतके दिवस मला कशी ती झोंप सुद्धां येत नव्हती. रात्रीच्या रात्री रडून जात. पण आज सुखानुभवाच्या ऐनवेळीं या अवदसा झोंपेनें पहा मला कसें भंडावून सोडलें आहे. असो. झोंपेंत प्राणनाथांचीं स्वप्नें तरी पडोत. ( विचार करितां करितां डोळा लागतो. )

**गंगा०**—आतां ठीक, तो पहा तिचा डोळा लागला. पण जरा आणखी कांहीं वेळ जाऊं द्या. पत्र तिनें चोळीं-तच ठेविलें आहे. तो पहा, कोंपरा दिसतो आहे ( चुटकी वाजवून) ठीक ठीक, चांगली संधि आली. ( हळू हळू पुढें जाते; झोंप लागलीसें पहाते, मान हालविते—हळूच वेणूच्या चोळींत हात घालून पत्र काढून घेते. ) अग बाई, पण माझें काळीज किती तरी धडधडतें आहे. अवदसे, आतां खुशाल नीज. ( जाते. )

**वेणू**—( स्वप्नांत ) बोला हो! ( कांहीं वेळानें ) अग बाई! ( मिठी मारू, जाते.) ( इतक्यांत गंगाबाई प्रवेश करिते. )

**गंगा०**—थोडेंसें शिकलें त्याचा कांहीं तरी, केव्हांना केव्हां असा उपयोग होतो. वसंतरावाचेंच तें पत्र. ( विचार करून ) आतां असें करीन. या वेळीं तिला पत्राची आठ-वणच होऊं देतां कामा नये. (वेणूस हांक मारते ) अग ए, बरी वेळ पाहिलीस निजायला. रात्र कुठें जाते कोण जाणे? ए, अवदसे, उठतेस कीं नाहीं? ( वेणू–धडपडत उठते. ) ही वेळ निजायाला सुचली नव्हे? जा, तीं धोत्रें वाळत घाल. ( वेणू भीत भीत जाते. ) बऱ्याच दिवसांपासून जो मनांत हेतु होता तो साधून घेण्याची बरी वेळ आली—

पत्र अगोदर नीट वाचून घेतें. (वाचते, मधून मधून मान हालवते, चर्या बदलते.) ठीक ठीक शाबास! काय घाट आणला आहे पण. वसंतराव, जसें तुमचें रूप मोहक तसेंच चातुर्यही वर्णनीय खरें. आतां माझ्या हातांत आली बरें आपली शेंडी. पत्र हातीं आलें हें मोठें नशीब. ही द्वाड अवदसा तरी पहा, किती बाई धारिष्ट या बायकांचें? वाहवा ग सटवे, तुझा आतां जीवच घेईन. वसंतरावाची आतां स्वारी आली कीं काम झालेंच. इला मात्र त्याच्या नजरेस पडूं देतां नये. बरें. (जाते व कांहीं वेळानें वेणू प्रवेश करिते.)

**वेणू**—आई निजायला गेली वाटतें. आज हा दिवस किती तरी आनंदाचा बाई! पण किती मोठा! आजची रात्र गेली कीं, उद्यांपासून नुसते सहाच दिवस रहातील! पण कोण तारीख लिहिली आहे ती. पत्रांतच पाहूं (चोळींत हात घालून पहाते, घाबरून चकीत होऊन) अँः अग बाई! पत्र नाहीं! (कावरीबावरी होऊन) अरे देवा! काय झालें! हाय! घात रे देवा, घात केलास! (खालीं पडते—कांहीं वेळानें उठते—विचार करून) हँ, कुठें तरी पडलें खचित! येथें तर कुठें दिसत नाहीं. हो पण धोत्रें वाळत घालीत होतें, (पहात पहात जाते—कांहीं वेळानें परत येते.) नाहीं, कुठें नाहीं! हाय हाय! (रडून कपाळावर हात मारून) म्यां चांडाळणीनें घात करून घेतला! देवा यापेक्षां मरण तरी दे. (थांबून) आँ! आई येथें आली होती! तिला तर मिळालें नसेल? (डोळे गरगर फिरवून किंकाळी फोडून कोचावर पडते.)

(पडदा पडतो.)

## प्रवेश ७ वा.

**स्थल**—विष्णुशास्त्र्याचें घर.

( गंगाबाई कोचावर पडली आहे. )

**गंगा०**—काय माझा जन्म हा! एकान्तांत बसलें कीं तेच विचार पुढें उभे रहातात. आईबापांनीं केवळ पैशाकडे पाहून मला या घरास विकली. कांहीं तरी देवा सुख! वैधव्यांत तळमळणाऱ्यांची व माझी दशा सारखी. एक तरी पुत्ररत्न पोटीं झालें असतें, तर किती मी धन्य झालें असतें! देवा ही इच्छा नाहीं का तूं पूर्ण करणार? याकरितां बाई उपाय तरी किती केले मेले! औषधें झालीं. देवधर्म झाले. जे जे ह्मणून उपाय ऐकले तेवढे बाकी ह्मणून ठेवले नाहींत. हाय दुर्दैवा! बाळाला घेऊन खेळविण्याचे सुखसोहळे ब्रह्मदेवानें माझ्या नशिबींच नाहीं का लिहिले? ( विचार करून ) पण हो गडे दुसरा एक उपाय हेरून ठेविला आहे, नव्हे का? खरंच बाई, माझें मन कधींपासून पण तिकडे गुंतलें आहे. इतके दिवस त्या माधवाच्या भयानें व जळल्या त्या अभिमानानें आपल्याच तोऱ्यांत मेली मी राहिलें. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून तर त्यांचे हेतु मी जाणून चुकलें आहें. आपण होऊन मजबरोबर बोलण्यासाठीं कितीदां प्रयत्न करीत होते. पण मीच मेली अभिमानानें बोललें सुद्धां नाहीं. आणि आतां हा जीव हळहळतो. पण आतां कीं नई ( विचार करून ) हो अस्सेंच करीन, मग झालेंच गडे काम. त्यांत आणखी माझ्या हातीं वर्म सांपडलें आहे. अग बाई! त्याची गरज का लागणार आहे! छत्. माझें एकदां मनोगत कळल्यावर ते त्या अवदसेचें नांव सुद्धां घेणार नाहींत. अगोदरच ती

हडळ, अंगावर दागिना नाहीं; आणखी हल्लीं तर झुरणीस लागून तिचीं खपाटें वळलीं आहेत. गाल बसून गेले आहेत. डोळे खोल गेले. शरीर निस्तेज होऊन तोंडावर मृत्युकळा आली आहे. अशा भूताला पाहिल्याबरोबरच पुरुष भिऊन जाणार. मला तर ती नुस्ती डांकीण दिसते. असें असतां मी होऊन मनधरणी केल्यावर पायां पडत येणार नाहींत ह्मणजे काय? जो तो मला शंभरांत एक बायको ह्मणतो. (शरीराकडे पाहून) आणि हे दागिने घातले ह्मणजे आणखी थाट होईल. (थांबून) असेंच असेंच. कालपासून पण स्वारी आली नाहीं. आल्यावर आजच जर मनासारखें केलें नाहीं तर नांवाची मी गंगाच नव्हे. (इतक्यांत वसंतराव प्रवेश करतो.)

**वसंत०**—शास्त्रीबुवा आहेत का घरीं?

**गंगा०**—(उभी राहून) घरीं नाहींत; पण तासा भरानें येतील (एकीकडे) यांना थांबविण्याची युक्ति काढली पाहिजे. (उघड) येईपर्यंत आपणांला बसवून घ्यायला सांगितलें आहे. इकडे असे बसा. (आंत जाते.)

**वसंत०**—(एकीकडे) आज आपलें भाग्यच समजायचें. आज बाईसाहेब ममतेनें बोलतात, हें कसें? बरें आहे, एका अर्थी माझ्या पथ्यावरच पडलें. प्रियेची भेट होण्याची संधि तरी मिळेल. (गंगाबाई पुन्हा प्रवेश करते.)

**गंगा०**—आपलें त्यांचें हल्लीं बरेंच संघटण झालें आहे. कधीं आले होते आपल्या घरीं?

**वसंत०**—संघटण काय? आपली कृपाच आहे. तीन चार दिवसांत कांहीं शास्त्रीबावा तिकडे आले नाहींत. आपले पाय आमच्या घराला कधीं लागत नाहींत पण.

**गंगा०**—( एकीकडे ) पाहिलें, माझ्या मनांत आलें आहे तेंच इकडेही वागतें आहे. ( उघड ) आह्मा गरीबांचें काय बाई! त्यापेक्षां आपल्या पायांनीं आमचें घर पवित्र होत आहे, हेंच ठीक आहे. हो, त्यांतच आम्हाला भूषण आहे.

**वसंत०**—( एकीकडे ) आज हा मोठा चमत्कारच झाला ह्मणायचा. इतक्या ममतेचें भाषण आजच मी इच्या तोंडून ऐकलें, सुदैव आमचें. ( उघड ) आज वेणूही कुठें बाहेर गेली आहे वाटतें?

**गंगा०**—( एकीकडे ) स्वारीला काय उत्सुकता लागली आहे पण. आतां कांहीं तरी बतावणीच केली पाहिजे. ( उघड ) कालपासून तिला ताप येत आहे हो. काय त्या पोरीला हल्लीं होतें आहे कोण जाणें? मोठी झाल्यापासून बाई तिची ही आवस्था झाली आहे. काय करणार? माझी आणि तिची दशा सारखीच.

**वसंत०**—( एकीकडे ) अरे देवा! हें विघ्न आलें! याच वेळीं कशी आजारी पडली. लग्नास अडथळा तर होणार नाहींना? परंतु तिच्याविषयीं इच्या मनांत काळजी दिसते. ( उघड ) मग उपचार करावा.

**गंगा०**—काय करणार हो? पोरीचा सारा जन्म असाच दुःखांत जाणार. तिला बाई जो रोग जडला आहे त्याचें मूळ कारण हेंच आहे. मला तर बाई तिला अशी पाहून दुःख वाटतें, पण आम्हीं बायका काय करणार? तें पुनर्विवाह कीं काय तें हल्लीं लावतात तें बरें आहे खरें. पण बाई आमच्या घरांत तर अगदीं नांव सुद्धां घेतां कामा नये त्याचें, काय करणार?

**वसंत०**—( एकीकडे ) केवढें आश्चर्य! इचें पुनर्विवाहाविषयीं असें अनुकूल मत! आणि वेणूविषयीं इतकी दया! ( उघड ) तुम्हाला पुनर्विवाहाची चाल आवडते एकूण. खरेंच गरीब बिचाऱ्यांना ही वैधव्य दशा मरणापेक्षांही दुःसह होत असेल.

**गंगा०**—अहो, विधवा स्त्रियांची तशी स्थिति तर होतेच होते, पण आमच्या सारख्यांचीही तीच दशा बरें का! विधवांची काय अवस्था होते, हें माझ्या स्थितीवरून अनुभवांतीं आतां कळूं लागलें आहे. मी सुद्धां विधवांपेक्षां सुखी नाहीं बरें का. साठीच्या वयांत तिसरेपणचें लग्न असलें ह्मणजे आमच्या सारख्यांचें कपाळ फुटलेंच ह्मणायचें. देव त्यापेक्षां मरण देईल तरी बरें. ( डोळ्यांत पाणी येतें ) काय करणार हो?

**वसंत०**—( वाईट वाटून ) अरेरे, काय ही दुष्ट चाल! कसे निर्दय लोक तरी! आपल्या थोड्याशा सवडीकरितां बिचाऱ्या स्त्रियांचें मोतेरें करताहेत. पाषाणहृदयी खरे. ( आपणाशींच ) पण ही अशी चमत्कारिक काय बोलते?

**गंगा०**—( एकीकडे ) मजविषयीं मन कळवळूं तर लागलें. मना, आतां धीर धर. (उघड) आमचा नाश करणारी ही दुष्ट चाल कधीं बंद होईल कोण जाणें, कसची बंद होते, त्या पुनर्विवाहालाच मेल्या आपमतलबी लोकांचे किती अडथळे! हेंच पहाना, वेणूचा पुनर्विवाह व्हावा असें मला मेलें पुष्कळ वाटतें आहे; पण तें घडून कसें येणार?

**वसंत०**—( एकीकडे ) आमचा उद्देश तर हिला कळला नसेलना. पण मी कसचा इला दाद देतों. ( उघड )

घडून यायला काय हरकत आहे? शास्त्रीबुवांची इतकी भीति बाळगायला नको. तें सहज होईल.

**गंगा०**—सहज आहे? तर बाई मी तयार आहें. कारण तिचा विवाह झाला कीं मी मोकळी झालें, माझेंही त्यांत काम होईल व लोक भलभलते तर्क करतात त्यांतून तरी आह्मीं मोकळीं होऊं.

**वसंत०**—( एकीकडे ) तरीच ही तयार झाली तिचा पुनर्विवाह करण्यास. तरी ह्मटलें हें कसें? ( उघड ) मग या गोष्टीला पुनर्विवाह पक्षाची मदत घेतली ह्मणजे सर्व व्यवस्था होईल.

**गंगा०**—पण मी कुठें त्यांना धुंडायला जाऊं? आपण आहांच त्या पक्षांतील. आमची दया आपणाला आहेच. पण बाई वर कोण तयार होईल?

**वसंत०**—वर ह्मणतां? होईल कोणी तरी, त्याचें काय?

**गंगा०**—( जवळ येऊन ) पण मी आतां माझ्या मनांतली गोष्ट सांगतें हो आपणाला, दूर कशाला वर धुंडायला गेलें पाहिजे, आपण नाहींका आमच्यावर एवढी दया करणार? आपणच आह्माला पदरीं घ्या ह्मणजे झालें.

**वसंत०**—( एकीकडे ) हें काय आश्चर्य, आयतें ताट वाढून येते आहे, बरं! ( उघड ) काय? मजविषयीं आपण ह्मणतां? त्याचा विचार केला पाहिजे. ( हंसून ) समजा, मी तयार झालों; तर मजशीं तिचा विवाह लावण्यास आपण तयार आहांत?

**गंगा०**—मी काय ह्मटलें तें आहेना आपल्या लक्षांत?

**वसंत०**—हो हो, तें मी समजलों, मजविषयींचना आपण ह्मणतां?

**गंगा०**—ठीक आहे, माझी विनंति ऐका तर. माझी ही स्थिति पाहून आपलें मन कळवळतें आहे ना?

**वसंत०**—(एकीकडे) ही आपलाही पुनर्विवाह करायला सांगते कीं काय? (उघड) हो मग!

**गंगा०**—मग काय? माझीही व्यवस्था आपणाला लाविली पाहिजे. (चमत्कारिक भाव करीत पुढें सरते.)

**वसंत०**—(चकीत होऊन, गोंधळून मागें सरतो. शब्द निघत नाहीं.)

**गंगा०**—आतां विचार तो कसला? आह्मांला पदरीं घेतों ह्मटलेंना आपण? प्रथम मला घ्या. (हात धरूं लागते.)

**वसंत०**—(मागें सरून त्वेषानें ओरडून) हा जारिणी, काय हें धारिष्ट? पापिणी एकाएकीं पर पुरुषाचा हात धरण्यास धांवलीस ना? आग लागो त्या तुझ्या हातांना! कोण साहस हें? अरेरे! काय ही कामवासना! बेशरम! नीघ, चालती हो येथून दुष्टे! (रागानें थरथरूं लागतो.)

**गंगा०**—पुरे करा आतां हा आवेश. समजतें मी सारें. आपलें मन मी केव्हांच ओळखलें.

**वसंत०**—काय? काय ह्मटलेंस? लाज नाहीं वाटत? अशा डांकिणी जारिणीचें तोंड पाहून कोण नर्कांत पडेल! अरेरे! कसा मी येथें येऊन फसलों! हें पापकर्म करण्यास प्रवृत्त झालेल्या तुझ्या हृदयाचे शतशः तुकडे कसे झाले नाहींत! हें शरीर जळून त्याची राख कां झाली नाहीं!

**गंगा०**—मी आपल्या पाया पडतें, मला आतां अव्हेरूं नका, आपलें मन मजवर आहे असें समजून मी बोललें. (पुढें जाते.)

**वसंत०**—( मार्गे सरून दांत ओंठ चावून ) अरेरे! काय करूं रे! अशा दुष्ट स्त्रियांना जिवंतही ठेवूं नये. खबरदार पुढें येशील तर चांडाळणी.

**गंगा०**—( संतापून डोळे वटारून दांत ओंठ चावून मोठ्यानें ) काय? काय बोलतो आहेस विचार केलास? ही अशी तशी बायको समजूं नकोस. पहातें तर! ( पत्र काढून दाखवून ) हें काय आहे? हें पत्र कोणी पाठविलें? त्या रांडेला पळवून नेऊन पुनर्विवाह लावणार काय? पुरा विचार केलास?

**वसंत०**—( पत्र पाहून हात पाय गळतात–कपाळा-वर हात मारून ) हाय! घात झाला! चांडाळणीनें सर्वस्वी घात केला! माझी तर कंबर खचली.

**गंगा०**—आतां गप कां? मी आपणास हिताच्या गोष्टी सांगतें त्या ऐका. हें आपलें पत्र माझ्या हातीं आलें आहे; कारटी वेणू माझ्या हातांत आहे; तुम्हीही माझ्या हातांत सांपडलां आहांत आणि आमचें नांवाचे पति तेही माझ्या मुठींत आहेत. वेणूचें तुमचें लग्न लावून देणें माझ्या स्वाधीन आहे. किंवा तिचे हाल करून ठार मारणेंही मला जड जाणार नाहीं. व तुम्हाला कवडीमोल करणेंही आतां मला कठीण नाहीं. (किंवा तुम्हाला सर्व सुखाच्या शिखरा वरही मी बसवूं शकतें, समजलां?)

**वसंत०**—( अश्रु वाहूं लागतात ) हाय! सर्वस्वी नाश झाला! आतां त्या सुंदरीची कसली गांठ पडते! ही कपटी राक्षसीण तिचे हाल हाल करून मारील यांत संशय नाहीं! या तिच्या दुःखाला मीच कारण झालों ना? अरेरे! या जारिणीनें कसें तरी मला पेंचांत धरलें आहे! कोण या

चांडाळणीची वासना ही? धिःकार, धिःकार अशा स्त्रियांना आणि या कामवासनेला! मनुष्याला तिणें पशूपेक्षांही नीच करून सोडलें आहे! पण त्यांना तरी कां दोष? अरे थेरड्यांनों, तरुण पोरींशीं लग्नें लावून आपल्या अविचाराचीं हीं फळें भोगा. मूर्खांनों! हेंच तुमच्या पापाचें योग्य शासन होय! आणि हाच तुमचा नरकवास!

**गंगा०**—राहूं द्या तें, ओढून चंद्रबळ समजतें मी.

**वसंत०**—( दांत ओंठ चावून ) काय? तुझ्या या नीच राक्षसी कामवासनेच्या मी बळी पडूं काय? आग लागो तुझ्या तोंडाला! झडो ती तुझी जीभ! पापिणी, कितीही पेंच लढविलेस, तरी तुझ्या या नीच इच्छेस हे प्राण गेले तरी मी कबूल होणार नाहीं. मग तुला पाहिजे तें कर. ( थांबून खालीं मान घालून डोळ्यांत पाणी आणून ) पण ही राक्षसीण त्या सुकुमारीचे हाल हालकरून मारील खचित. ( कपाळावर हात मारून ) चांडाळा, तुझ्याच मूर्खपणाचा हा परिणाम! भोग आतां प्रायश्चित्त, झाला! घात झाला! ती मरणार! माझीही तीच दशा! ( दाराकडे धांवून मागें पाहून ) दुष्टे, जा काय करणार तें कर! ( निघून जातो. )

**गंगा०**—अँ! गेला! माझी निराशा करून! आणि निभर्त्सना! अरेरे, असल्याच्या व्यर्थ नादीं लागलें. ( दांत ओंठ चावून ) काय करूं रे. माझ्या अंगाची लाही लाही होत आहे. मेल्या कसा हिरमोड केलासरे! चांगलाच सूड घेईन. ( बोटें मोडून ) मेल्या तुझें तळपट कीरे करीन. ( वेणूस उद्देशून ) अगे अवदसे! तुझ्याचमुळें माझी ही दशा, त्या मेल्यानें, त्या तुझ्या यारानें केली आहे! मेला पळाला, पण तूं तर हातांतून नाहींना सुटलीस? ( दांत

चावून, डोळे गरगर फिरवून ) तुझ्या नरडीचा घोंटच घेतें आतां. ( झपाट्यानें निघून जाते, पडद्यांत आरडाओरड होते–वेणू अस्ताव्यस्त केंस मोकळे सुटलेली–मस्तकांतून रक्ताच्या धारा वहात आहेत, अशी रडत ओरडत पळत येते, व मागून गंगाबाई लांकूड घेऊन धांवते. )

**गंगा०**—( केंस धरल्यामुळें हिसका बसून वेणू खालीं पडतें ) अँ, जाशील कुठें ?

**वेणू**—बाबा! धांवा! मेलें हो, मेलें. ( मूर्च्छित पडते. )

**गंगा०**—ढोंग करून खालीं पडलीस होय. ( लात मारते ) उठतेस कीं नाहीं कीं देऊं दुसरी ( हालत चालत नाहींसें पाहून घाबरून) आँ, जीव गेला कीं काय! अग बाई ! हें काय! ( लांकूड फेंकून देते ) इनें कपाळ आपटून जीव दिला. ( तिला हालवते ) अँ! इनें जीव दिला असेंच सांगेन. ( निघून जाते. कांहीं वेळानें वेणू शुद्धीवर येते. )

**वेणू**—हाय! अझून जीवंत आहें काय मी ? ( इकडे तिकडे कावरीबावरी पाहून ) गेली. ठार तरी मारायचें होतेंस. मरण तें कपाळीं आहेच! सुटले तरी असतें जाचांतून. ( रडते, ) बाबा, कुठें हो गेलां! भेट तरी होणार कीं नाहीं ( उठूं पहाते. ) उठवत नाहीं. माझे पायही मोडले. ( इतक्यांत विष्णुशास्त्री प्रवेश करितात. )

**विष्णुशा०**—अरे! हें काय! वेणे! अशी कां पडलीस ? रक्तबंबाळ झाली आहे! हा काय अनर्थ! ( तिच्या जवळ लगबगीनें येतो. बसून जखम पहातो. )

**वेणू**—( कंबरेस मिठी मारून ) बाबा! आईनें हो ही दशा केली! ( रडूं लागते. )

**विष्णुशा०**—काय, तिनें! अरेरे, कोण कृत्या ही! देवा, कधीं मी इच्या हातांतून सुटेन! बाळे, एकाची वाट काविली. आतां तुझ्याही मार्गे लागलीना! काय तरी करूं? कोण हें रक्त वहातें आहे? (इतक्यांत गंगाबाई प्रवेश करते.)

**गंगा०**—(रागानें) कारटीनें ढोंगच केलें होतें, पाहिलें! काय प्रेमाच्या गोष्टी चालल्या आहेत? पहा, हें ह्यातारचळ! लाज नाहीं वाटत.

**विष्णुशा०**—(संतापून) फार बोलतेस आणखी? हें काय! इतकी माजलीस कां? चांडाळणी तुझें कपाळच फोडतों. (मारायला उठूं लागतो.)

**वेणू**—(गच्च धरून) नको नको, बाबा मी तुमच्या पायां पडतें.

**गंगा०**—(दांत ओंठ चावून) कारटे, सोड सोड, पहातें काय होतें तें. खबरदार, पुढें पाऊल पडूं दे तर खरें. (पुढें होते) शरम नाहीं वाटत? कारटीचें काय काय चाललें आहे तें पहा. फुटूं द्या एकदांचे डोळे! धिंगाणे करायला चालली कारटी, धिंगाणे! पहा हें काय तें. (पत्र पुढें करते.)

**वेणू**—(किंकाळी फोडून पत्र हिसकावूं पहाते. गंगाबाई लात मारते. वेणू मागें पडते.)

**विष्णुशा०**—(वेणूला सांवरून) चांडाळणी काय हें करतेस?

**गंगा०**—वाचा, वाचा, तें पत्र वाचा. डोळे उघडूं द्या! या अवदसेमुळें मला हा जाचना?

**विष्णुशा०**—(पत्र वाचूं लागतात, चर्या बदलते.)

**गंगा०**—करा, लाड करा. कशी शेफारून गेली आहे पहा. पोरानें तसे उपकार फेडले; हिचे हे चाळे; आणि हीं पत्रें! शिकवा विद्या! विद्येचीं हीं फळें बरें का!

**विष्णुशा०**—( पत्र फेंकून कपाळावर हात मारून ) हाय, कोण दुर्दैवी मी! सर्वप्रकारें मी धुळीस मिळालों. ( संतापून ) कारटे! काय हें सुचलें तुला! माझ्या तोंडाला काळोखी आणलीस! मेली कां नाहींस!

**गंगा०**—( वेणूकडे रागानें धांवून तोंडांत मारते. ) ह्या कारटेमुळें, माझी फजिती आणि मला मार! मीही आतां काळेंच करतें पहा!

**वेणू**—( रडूं लागते. शास्त्रीबुवांच्या गळयास मिठी मारूं जाते ) बाबा, क्षमा करा; आतां नाहीं तुह्मांला दुःख देणार!

**गंगा०**—आणखी तो मेला, त्याचें मढें गेलें, येथें कीं हो आला होता. या पत्राविषयीं त्याला विचारलें, तेव्हां मेल्यानें मला कसकशा शिव्या दिल्या. आणि काय माझी दुर्दशा केली. माझ्यानें तें सांगवतही नाहीं. मेला मला ह्मणाला कीं, तूं व्यभिचारी स्त्री आहेस असा गांवांत तुझा धांडोरा पिटीन. ( रडून ) या अवदसेमुळें ज्यानें त्यानें माझी अशी अब्रू ध्यावी ना?

**विष्णुशा०**—तो चांडाळ माझ्या घरीं आला होता! आणि असा छल केला! काय करूं रे! कोणतें मी असें पाप केलें होतें? ( वेणूच्या तोंडांत मारून ) चल जा, कारटे, माझ्या पुढून काळें कर.

**वेणू**—( रडून पायांवर पडून ) बाबा! अहो! तुह्मी मला मारा, ठार करा. परंतु—

**गंगा०**—( धरून खेंचून) चूप, चल ऊठ. या अवदसेला आतां मी कोंडून ठेवतें. माजली आहे. मरूं द्या तिकडे उपाशीं. मोकळी ठेवाल तर कोणाचाही हात धरून गेल्याशिवाय रहाणार नाहीं.

**विष्णुशा०**—जा जा, माझ्या समोरून काढ एकदांची.

**वेणू**—( रडून ) बाबा, नका हो नका! ( गंगाबाई फरफटत नेते. )

**विष्णुशा०**—देवा, काय माझ्या जन्माचे हाल हे! दोन पोरें होतीं तीं हीं अशीं निघावींतना? त्या पोराला इंग्रजी विद्या शिकविली त्याचें प्रायश्चित्त भोगलेंच. आणि स्त्रियांना विद्या शिकवूं नये ह्मणतात ती या कारटीला शिकविली त्याचें हें फळ! अधम मी आपल्याच पायांवर कुऱ्हाड घालून घेतली! ( गंगाबाई प्रवेश करते.)

**गंगा०**—मी तिला पलीकडच्या खोलींत कोंडली आहे. थोड्या दिवसांनीं तिला सोंवळीच केली पाहिजे. नाहीं तर असेच तिचे ढंग चालतील. इतके दिवस तिला सोंवळी करा ह्मणत होतें ना? नाहीं केलें लाडांनीं; ते भोगा आतां.

**विष्णुशा०**—दुर्दैव माझें!

( पडदा पडतो. )

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक ४.

## प्रवेश १ ला.

**स्थल**—एक रस्ता.

( गोविंदराव हातांत ठुशी घेऊन प्रवेश करितो. )

**गोविंद०**—ही इंदिरेचीच ठुशी. ही उपटायला मिळाली हें मोठेंच भाग्य म्हणायचें. आतां ही चंद्रा नायकिणीला द्यायची—म्हणजे कसें—(थांबून ) हँ हँ, तिच्याकडून माधवरावाच्या नांवाचें पत्र, आणि त्यांत या ठुशीविषयीं मजकूर—ह्मणजे मग त्याच्या अंगीं चोरी लागलीच. आणखी त्यांत त्या नायकिणीचें व याचें सूत आहे हेंही दिसून येईल. आणि इकडून मग दुसरा पेंच. वः कसे पेंचांवर पेंच पडणार पण. हारे, मूर्खा, इंदिरा पाहिजे ना तुला? या पेंचांनीं तुला जखडून रसातळासच पोंचवितो. माझा व्यूह तर कसा भक्कम बनला आहे. इंदिरा आणि वसंत या भावंडांतच कांहीं घोंटाळा आहे अशी कंडी तर गांवांत झपाट्यानें पसरूं लागली आहे. त्यांत आणखी या लोकांनीं सुधारकांच्या द्वेषामुळें तिला असा कांहीं रंग दिला आहे कीं, सर्वांना ती खरीच वाटते. ती माधवरावापर्यंत येऊन त्याच्या हृदयांत तिणें पेट घेतला ह्मणजे त्यामुळें तो दुःखानें आंतल्या आंत करपून जाईल, आणि असल्या संशयानें तर वेडाच होईल. तशांत मी आणखी अधिकाधिक भर घालीतच जाणार. इकडे माधवराव दुराचारी आणि वेश्यागमनी आहे असा वसंतरावालाही संशय येऊन चुकला आहे. दोघेही आतां आंतल्या आंत संशयानें धुमसत राहतील. ही उत्तम संधि आली खरी! आतां आपण

पुढच्या तयारीस लागलें पाहिजे. ( दूर पाहून ) हा कोण येतो आहे बरें? मोरोपंत काय? होय तोच. ठीक आहे, आतांच कळेल यार्णे काय केलें तें. ( मोरोपंत प्रवेश करतो त्यास ) कसें काय बुवा माधवरावाची भेट झाली होती काय?

**मोरोपंत**—हो रस्त्यावरच गांठ पडली, पुष्कळ दिवसांनीं भेटल्यामुळें त्याला आनंद झाला. कांहीं गप्पा झाल्यावर तो उत्तम बीनवाला बंदेअल्लीखां हिंदुस्थानांतून आला आहे अशी मी त्याला थाप मारली. त्या गोष्टीचा तो शौकीच कीं नाहीं, तेव्हां त्याला त्याचें नांव ऐकून माहित होतेंच, त्यामुळें स्वारी बीन ऐकण्यास मोठीच उत्सुक झाली, मग काय, आपला बेत सिद्धीस गेलाच ह्मणायचा. चंद्रा नायकिणीच्याच घरीं न्यायचा ना पण? आतां पाहूं, वेश्यांचें गाणें ऐकायचें नाहीं—त्यांचें तोंड पहायाचें नाहीं, या त्याच्या गप्पा कुठवर टिकतात त्या.

**गोविंद॰**—हो तिच्याकडेच ने; या शहरांत तीच मोठी वस्ताद आहे. तिला मी सर्व सांगून ठेविलें आहे. हे नीतीचा तोरा मिरविणारे सुधारक आम्हाला हंसतात कीं, लग्नाकार्यांत वेश्या आणतां, वेश्यांच्या घरीं जातां! काय मूर्ख लोक हे! अहो म्हणतात कीं, त्यांचें गाणें सुद्धां ऐकूं नये! काय म्हणावें अशांना? ही एवढी मोठी मनोहर कला त्या बिचाऱ्या नायकिणींनींच तर अझूनपर्यंत राखून ठेविली आहे. किती दीर्घ प्रयत्नानें त्या शिकतात बरें? या अजागळ सुधारकांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांना उत्तेजन दिलें नाहीं तर ती कला आज या हिंदुस्थानांतून अजिबात नाहींशी होईल. यासाठीं मी असा घाट आणला आहे. या

सुधारकांनाच ही चट लावून देऊन गम्मत करायची. तो माधव गाण्याचा शौकी आहे त्यामुळें तिचें गाणें, नटणें वगैरे पाहून उल्लू बनून बहुतकरून तो तिच्या सापळ्यांत सांपडेलच, मग तर सोळा आणे काम झालें. नाहींतरी ती चंद्रा त्याला फजीत केल्याशिवाय सोडणार नाहीं. एकदां तिच्या घरीं याचा पाय मात्र पडला पाहिजे ह्मणजे बस.

**मोरो०**—त्याला बंदेअल्लीखां आला आहे अशी थाप मारली तेवढ्यानेंच काम झालें पहा.

**गोविंद०**—पण पुढें काय करायचें तें नीट लक्षांत घे. तेथें गेल्यावर बंदेअल्लीखां नसतां चंद्राला पाहून त्याला संशय येईल तेव्हां चंद्राच त्याला सांगेल कीं, ते बाहेर गेले आहेत. व मी त्यांच्या बरोबर असतें. माधवालाही ऐकून ठाऊक आहे कीं चुन्ना ह्मणून त्याची रखेल हमेशा त्याजबरोबर असते. आणि तूंही ती चुन्ना आहे अशी त्याची खात्री कर; कारण माधवानें चुन्नालाही पाहिलें नाहीं आणि चंद्राला तो मुळींच ओळखत नाहीं. थोडा वेळ बसल्यावर ती आपण होऊनच ह्मणेल कीं बंदेअल्लीखां येईपर्यंत आपलें गाणें ऐका. तेव्हां तो कदाचित उठूं लागेल, परंतु तशा ठिकाणीं थोडीशी भीड घातली ह्मणजे बस. पुढें काय करायचें तें ती करीलच. मी सर्व तिला सांगून ठेविलें आहे. काम कसें बेमालूम झालें पाहिजे हाँ!

**मोरो०**—तेथें गेल्यावर मी त्याला कसा उल्लू करून सोडतों पहा. त्याविषयीं मला सांगायला नको. आज दहा वाजतां रात्रीं बंदेअल्लीकडे आपण चलूं असें मी त्याला सांगितलें आहे. व मीच त्याच्याकडे जाऊन त्याला घेऊन जाणार.

**गोविंद०**—ठीक आहे. तूं आतां जा. उद्यां सकाळींच मी तुजकडे येईन.

**मोरो०**—बरें आहे. ( जातो. )

**गोविंद०**—( आपणाशींच ) हें जाळें चोहोंकडून खूब मजबूत बनलें आहे. हा मोरोपंत बरा मिळाला. यालाही आपला आंतील हेतु न कळवितां दुसरेंच कारण सांगून याच्याकडून काम करून घेतां आलें हें फारच उत्तम झालें. हो बरी आठवण झाली. वसंत घरीं येणार होता पण तो परत तर गेला नसेल ना? लवकर गेलें पाहिजे. ( जाऊं लागतो इतक्यांत वसंत येतो. )

**वसंत०**—( दुःखित ) बरी भेट झाली, मी आपल्या घरीं गेलों होतों. गोविंदराव, काय हो करावें ? ही जिवाला लागलेली हुरहुर मुळींच चैन पडूं देत नाहीं. त्या गोष्टीचा आणखी कांहीं सुगावा लागला काय? ( सुस्कारा टाकून ) गोविंदराव, यामुळें माझी झोंप कींहो नाहींशी झाली.

**गोविंद०**—तें तर त्याचें आहे खरें बुवा. मलाही इतके दिवस वाटत नव्हतें कीं, माधव अशा हलकट वेश्यांच्या नादी लागेल ह्मणून. कारण त्याचा आपला बऱ्याच दिवसांचा सहवास आहे त्यावरून आम्हांला तर बुवा बाहेरून तो सज्जन दिसत होता. परंतु तुह्मीच म्हणालां कीं, चांगले लोक सुद्धां तो दुर्वर्तनी आहे व बाहेरून मात्र संभावित दिसतो असें ह्मणतात. आणि जिकडे तिकडे त्याच्या वर्तणुकीविषयीं हल्लीं गवगवा होऊं लागला आहे. तेव्हां मलाही थोडासा संशय आला. मी लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवीत नसतों, परंतु काय सांगूं, वसंतराव ? माझ्याही तें पहाण्याचें नशीबीं आलें.

**वसंत०**—काय? तुह्मी स्वतः त्याला पाहिलें?

**गोविंद०**—हो हो, या डोळ्यांनीं पाहिलें. काल रात्रीं आमचा तो शाळेंतील जुना मित्र यशवंतराव त्याच्या घरीं गेलों होतों. त्याच्या घरासमोरच ती चंद्रा नायकीण रहाते. यशवंतरावाच्या घरांतून ओव्यावर आलों तों माझी नजर समोरच गेली. तेव्हां खिडकींतून सर्व दिसत होतें. पहातों तों ही स्वारी तिच्याशीं सोंगट्या खेळत बसली आहे व मधून मधून थट्टामस्करी चालली आहे. तेव्हां मात्र माझी अगदीं खात्री झाली.

**वसंत०**—( कपाळावर हात मारून ) झालें तर मग, निकाल झाला. अरेरे, सर्वस्वीं आह्मीं फसलों ना! अरे हा वरून किती साळसूद दिसत होता; परंतु अंतरीं मांगापेक्षांही नीच ना! बाबांना ही गोष्ट समजली ह्मणजे संतापून ते काय करतील कोण जाणें. इंदिरेचें हृदय तर फाटून जाईल! हाय देवा! आतां आमची दशा तरी काय होणार? गोविंदराव, इतके दिवस कसें हो तुह्मी आह्माला कळविलें नाहीं?

**गोविंद०**—असें कसें बरें होईल? तुह्मी जसे माझे मित्र तसाच माधवही, तेव्हां त्याच्या चहाड्या मी कशा बरें सांगाव्या. तशांत मलाही हें ऐकून फार दिवस झाले असें नाहीं. नुस्ती उगीच कानावर गुणगुण आली होती. कांहीं तरी गप्प असेल असें समजून मी तिकडे लक्ष दिलें नाहीं. खरें काय तें कालच मला कळलें, व मीही पाहिलें. तरीही तुह्मी लोकांच्या सांगण्यावरून त्याच्याविषयीं भलताच ग्रह करून घेऊं नका. उगीच कांहीं तरी भयंकर व्हायचें. तुह्मी स्वतः नीट चौकशी करा, स्वतः पहा आणि मग काय करणें तें करा.

**वसंत०**—कांय? आणखी काय पाहूं, हे डोळे कशाला विटाळूं? हल्लीं त्याची मजशीं व इंदिरेशीं जी वर्तणूक दिसते त्यावरूनच माझा संशय पक्का झाला. आणि तुमच्या सांगण्यावर तर माझा पूर्ण विश्वास आहे. आणि आपण ह्मणतच असाल तर पाहूं. मग मला वाटतें आपण ज्या ठिकाणाहून पाहिलें तेथूनच ठीक पडेल. तेथें जायला कांहीं हरकत आहे काय?

**गोविंद०**—कांहीं नाहीं. तसेंच करूं. बहुतकरून तो रात्रीं ९–१० वाजतां तेथें जात असतो. आजही कदाचित् जाईल. आपण नऊ वाजतां तेथें जाऊं ह्मणजे झालें. आलाच तर त्या घरांतून दिसेल.

**वसंत०**—बरें, मी आज आपल्याच घरीं येईन; चलायचें ना?

**गोविंद०**—( वाईट तोंड करून ) आपण आग्रहच करतां तर काय करणार? तो माझा मित्र असल्याकारणानें मला फार वाईट वाटतें आहे. पण एवढी तरी कृपा करा. मला मात्र या झगड्यांत गुंतवूं नका. मी आपला कोणाच्या भानगडींत पडत नसतों. आतां तुह्मी मजवर बोजा घालतांच आहां तर मित्रत्वासाठीं वहाणें भाग आहे. तेव्हां कृपाकरून माधवाला मात्र ही गोष्ट कळवूं नका. फुकट आमच्यांत वैमनस्य पडेल.

**वसंत०**—मी काय इतका मूर्ख आहे? गोविंदराव, ते दिवस आतां गेले कीं हो. आतां त्याच्याशीं मनमोकळेपणानें कसें बोलवेल? मग ह्या गोष्टी तर दूरच राहिल्या. शिवाय तुह्मी तरी यांत काय करतां आहां?

**गोविंद०**—( एकीकडे ) अरे वेड्या, मला एवढेंच पाहिजे तुजकडून. (उघड) हें गुप्त राहीलना मग वसंतराव?

**वसंत०**—अगदीं बे फिकीर असा.

**गोविंद०**—आपल्या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. तर आज रात्रीं नऊ वाजतां या, मग आपण जाऊं. मी येतों तर. ( जातो. )

**वसंत०**—( कपाळाला हात लावून ) हाय हाय! काय आमचें दुर्दैव हें! देवा, हें दुःख आतां कसें तरी सहन करूं? असो. ( जातो. )

### प्रवेश २ रा.

**स्थल**—बाबासाहेबांच्या घरापुढील बगीच्या.

( वसंतराव विचारांत बसला आहे. )

**वसंत०**—(दीर्घ श्वास टाकून) रात्रीं त्या चंद्राच्या घरीं त्याला पाहून माझी तर बालंबाल खात्री झाली; काय तें गायन चाललें होतें आणि कशी त्याची तंद्री लागून राहिली होती; कोण ते तिचे चाळे? अरेरे, तें सर्व पाहून तर मी स्वप्नांत या गोष्टी पहात आहें कीं काय असाच मला भास होई! अरे माधवा, जो तूं नीतीवर मोठमोठीं व्याख्यानें देत होतास, सदाचरणाचा केवळ पुतळा ह्मणून मनोभावानें तुझ्या ठिकाणीं आम्ही प्रीति करीत होतों, त्या तुला मी स्वतः, हो, मी,—मीच,—या—दुष्ट नेत्रांनीं त्या जारिणी बाजारबसव्यांच्या घरीं एखाद्या नीच मानव पशूप्रमाणें बसलेला पहावाना! हारे ठका, आम्हास कसें तरी तूं फसविलें आहेस. कशीं गोड गोड भाषणें करून आमचीं मनें आकर्षण करून घेतलींस! फसलों! फसलों! सर्वस्वी नागवलों! अरे, विषारी काळसर्प हा, याला आम्ही उराशीं धरून

बसलोंना? आजारी होता तेव्हां कशा तऱ्हेनें याची शोंपासना केली, इंदिरेची याच्यासाठीं काय अवस्था झाली होती. (थांबून) हायरे माधवा, (संतापून) आँः आतां कोणता माधव! धिःक्कार असो त्या नीच कपटी नरपशूला! त्याचें नांव सुद्धां आतां नको! (दांत ओंठ चावून) अरेरे, ती दुष्ट त्याची आई, ती तर डांकणीपेक्षांही भयंकर, आणि हा दुराचारी पोर काळसर्पाप्रमाणें घातकी निघाला यांत नवल नाहीं! तें सर्व घरच्या घरच भयंकर भूताखेतांनीं भरलेल्या स्मशानासारखें दिसत आहे—आणि ती वेणू त्याचीच बहीण ना? ती सुद्धां तशीच असावी! आँ— (छातीवर हात मारून) हारे चांडाळा, त्या सुंदरीविषयीं अशीं कठोर दुर्वचनें या मुखांतून काढावींस ना; अधमा तुजसारखा पाषाणहृदयीं राक्षस या दुनयेंत कोणी नसेल! नको नको, देवा, माझ्या प्रियेविषयीं असले घातक विचार कधींही मनांत येऊं देऊं नको! प्रिया माझी मजकरितां किती तरी संकटें भोगीत आहे; हाय हाय! त्या दिवसाची ती आठवण झाली ह्मणजे तर आंगावर सर्र्र्कन् कांटा उभा रहातो. सखे, सर्व आशा आतां लयास गेली कायगे! त्या दुष्ट चांडाळणीनें तुला कोंडून ठेविलें हें ऐकून तर माझे प्राण कासावीस होताहेत. हाय हाय! प्रियेची भेट आतां कसची होते! अरेरे माझे हात पाय गळून पडले. छेः, कांहींच उपाय दिसत नाहीं. तर काय, अशाच प्रकारें दुःखाग्नींत तडफडत रहाणार काय मी? होय तर काय. ती सुंदरी सुखांत होती तिला म्यां मूर्खानें दुःखसागरांत लोटून दिलें, तिच्या जन्माचें मातेरें केलें आणि आतां एकटाच सुख भोगण्याची इच्छा करतों काय?

( छातीवर हात मारून ) या दुष्ट हृदयात या नीच वासनेनें कसा तरी प्रवेश केला! प्रिये, नाहीं ग नाहीं, मलाही आतां सुख नाहीं. सर्व प्रकारें मी सुखास आंचवलों!! आतां लग्नाची आशा उरली नाहीं. तुझ्या बंधूचें सहाय्य होतें तो तर मला शत्रूपेक्षांही भयंकर झाला आहे. हाय हाय!!! ( इतक्यांत गोविंदराव प्रवेश करितो व वसंताकडे निरखीत रहातो.)

**गोविंद०**—माझा प्रयोग याच्या काळजाला तर चांगलाच भिनला आहे. अरे, हें विष तुमची सर्वांची गठडी बांधल्याशिवाय रहाणार नाहीं. ( उघड ) वसंतराव, काय चाललें आहे?

**वसंत०**—(दचकून ) आँ, कोण तुह्मी काय गोविंदराव? आणखी काय चालायचें. रात्रीपासून वेड्यासारखी माझी अवस्था झाली आहे.

**गोविंद०**—काय करावें? मलाही फार वाईट वाटतें हो. इतक्यांत असा कसा बिघडला कोण जाणें! परंतु तुह्मी काळजी करूं नका, मनुष्यस्वभाव आहे हा कदाचित् पालटेल.

**वसंत०**—मला इंदिरेची काळजी पडली आहे. ती काय करील कोण जाणे. बाबांचीही दशा सांगवत नाहीं. मला तर हा साप केव्हां येथून निघून जाईल असें झालें आहे.

**गोविंद०**—ही गोष्ट एव्हां बाबांना कळवूंच नका. तो परस्पर बाबासाहेबांस नकळत निघून गेला तर तेवढें बरेंच. त्यांची मागाहून समजूत करतां येईल. त्यानें लवकरच येथून निघून जावें, व इंदिरेशीं त्यानें अधिक सलगी करूं नये अशी तुमची इच्छा असली, तर ही गोष्ट इंदिरेस

तुह्मी लवकर कळवा. हें सांगायला मला फार वाईट वाटतें, कारण त्यांची एकमेकांवर फार प्रीति आहे. परंतु तुमच्या अब्रूकडे पाहिलें ह्मणजे त्याचें मित्रत्व एकीकडेस ठेवावें लागतें. इंदिरेला कळवितांना मात्र मोठी खबरदारी ध्या. तिचें मन फार कोमल आहे. एकदम तिला धक्का बसेल असें करूं नका. ती रडूं लागेल तेव्हां तिच्या तोंडावरून हात फिरवून गळ्याशीं धरून तिची समजावणी करा, ह्मणजे तिला फारसें दुःख वाटणार नाहीं. मग कसें? तुह्माला वाटतें का सांगावेंसें?

**वसंत०**—तिला सांगणें भागच आहे. नाहीं तर मी दोषास पात्र होईन. लौकर सांगेन तर तीही सावध राहील. हें कळल्यावर ती त्याजशीं बोलणारही नाहीं. अशा गोष्टींत ती फार मानी आहे. अरेरे! काय हें चांडाळा तुझें साहस? गोविंदराव, मी सुद्धां त्या अधमाला आमच्या घरांतून निघून जा असें पत्र लिहितों. माझ्यानें आतां त्याचें तोंडही पहावत नाहीं.

**गोविंद०**—पण पत्र लिहाल तें संभाळून लिहा. ह्या गोष्टी त्यांत लिहिण्यांत अर्थ नाहीं. कारण चोर जो असतो तो कांहीं केल्यानें आपली चोरी कबूल करीत नाहीं. नाकबूल होणार आणि कशी तरी उडवाउडव करणारच. यासाठीं त्यांत असें दर्शवावें कीं, इंदिरेची त्याला आशाच राहूं नये आणि त्याणें येथून तोंड काळेंच करून जावें. काय मूर्खानें आपल्या हातूनच आपला नाश करून घेतला!

**वसंत०**—अहो अशांची कींव करून उपयोग नाहीं. हें लौकरच कळून आलें ह्मणून बरें. असले कपटी दुष्ट

मनुष्य केव्हां घात करतील याचा नियम नाहीं. मी तर त्याला आज रात्रींच लिहून पाठवितों. इंदिरेलाही आज रात्रीं जेवण आटोपल्यावर माझ्या खोलींतच बोलावून सांगेन. गवगवा होऊं देणार नाहीं. काय करूं देवा? कोण हा प्रसंग, इंदिरेचें दुःख कसें तरी निवारण करूं? ( इतक्यांत एक मनुष्य येतो. )

**गोविंद०**—हा कोण बरें मनुष्य असावा? कुठें तरी पाहिल्यासारखा दिसतो.

**वसंत०**—अहो तो इकडेच येत आहे. विचारा तर खरें त्याला कोठून आला तो.

**गोविंद०**—हँ, आतां झाली आठवण, याला मी त्या चंद्राच्या घरीं पाहिलें आहे खास.

**वसंत०**—मग जुळलें, त्या नीचाला कांहीं तरी तिचा निरोप असेल.

**गोविंद०**—तसें असल्यास पहा बरें गम्मत करतों कशी ती. ( मनुष्यास जरा एकीकडे घेऊन ) तूं आमच्या चंद्रीकडून आलास ना?

**मनुष्य**—होय, माधवराव कुठें असतात. त्यांना हें पत्र द्यावयाचें आहे.

**गोविंद०**—त्यांना तूं ओळखतोस कीं नाहीं?

**मनुष्य**—नाहीं, पण ते येथेंच रहातात असें तिणें सांगितलें आहे.

**गोविंद०**—वेड्या, हेंच तें घर, मलाच माधवराव ह्मणतात.

**मनुष्य**—मी नवाच नोकर आहें; ह्मणून मी विचारलें, माफ करा. हें पत्र, तिणें आपल्याला दिलें आहे. आणि

त्या आतांच आठाच्या गाडीनें आपल्या गांवीं जाणार आहेत, त्यांचा भाऊ फारच आजारी आहे अशी तार आली आहे.

**गोविंद०**—( वाईट तोंड करून ) ईश्वराची मर्जी. अरेरे! असें झालें काय? बरें तूं जा आतां.

**मनुष्य**—बरें रावसाहेब. ( जातो. )

**गोविंद०**—( पत्र वाचून हंसतो ) वसंतराव, हें पाहिलें का माधवरावाला पत्र आलें आहे तें!

**वसंत०**—पत्र कोणाचें, आणि तुह्मी कशा—

**गोविंद०**—कोणाचें का असेना, ऐकून तर घ्या. ( वाचतो. )

सकळ गुणैश्वर्यमंडित प्रिय माधवरावजी यांस—

अतिप्रेमपूर्वक प्रेमालिंगनें–माझा भाऊ नारायण हा गांवीं फारच आजारी आहे अशी तार आली म्हणून मी कांहींच तयारी न करतां तशीच उठून चालती झालें. आपली भेट झाली नाहीं ह्मणून फार दुःख वाटतें आहे, क्षमा करावी. काल जी आपण ठुशी दिली ती माझ्या गळ्याला घट्ट होते आहे—

**वसंत०**—काय? ठुशी! ह्मणजे हें पत्र कोणी पाठविलें?

**गोविंद०**—शेवटपर्यंत ऐका तर खरे. ( वाचतो ) गळ्यास घट्ट होते, आणखीं तिच्यांत तीन पेव्या पाहिजेत, त्या मी येईपर्यंत करून ठेवाव्या. आपल्याविणें माझी तिकडे काय अवस्था होईल याचा अनुभव आपल्यास आहेच. पत्र फार घाईनें लिहिलें आहे त्याची क्षमा करावी. हीच पायांपाशीं विनंति.

आपली आवडती–**चंद्रा.**

**वसंत०**—काय? त्या वेश्येचें हें पत्र, आणि ती ठुशी आँ, अरेरे चोरा. गोविंदराव, ही इंदिरेची हो ठुशी. हारे दुष्टा कृतघ्ना चोरा, इंदिरेची ठुशी चोरून नेऊन त्या बाजारबसवीस दिलीस आँ.

**गोविंद०**—( आश्चर्यानें ) ह्मणजे ह्मणतां काय? इंदिरेची ठुशी माधवानें चोरली? छे; खोटी गोष्ट! माधव इतका हलकट होईल? मला तर खरें वाटत नाहीं. पण असेलही बुवा, कारण मनुष्य असल्या छंदांत पडला ह्मणजे काय करील याचा नियम नाहीं. अरेरे! मला तर त्याची कींव येते.

**वसंत०**—ठुशी त्यानें चोरली खचीत. कालच त्याविषयीं आमच्या घरीं बोंब झाली होती. तीच ही. शिवाय ठुशी आणून देण्यास याजवळ पैसे कुठून आले? आतां हांकून लावला कीं हा भीकच मागणार! पुरे पुरे, गोविंदराव, सर्व उलगडा झाला. ( दांत ओंठ चावून ) काय करूं रे, माझ्या सर्वांगाची लाही लाही होत आहे.

**गोविंद०**—असा उगीच त्रास कां करून घेतां? त्रास नाहींसाच करण्याच्या उपायास लागा ह्मणजे झालें. इंदिरेला लवकर कळवा. आजच्या रात्रीं होईल तर चांगलेंच.

**वसंत०**—बरें आहे, गोविंराव, केवढ्या मोठ्या संकटांतून तुह्मीं आह्माला वांचविलेंत! तुमचे उपकार कसे हो फिटतील?

**गोविंद०**—अँः, त्यांत काय. मित्रत्वाच्या नात्यानें आपलें कर्तव्य आपण करावें–( जातात. )

## प्रवेश ३ रा.

### स्थल—जुनाट बाग.

( गोविंदराव बगीच्यांत फिरत आहे. )

**गोविंद०**—( आपणाशींच ) माधवानें येथें पांच वाजतां बोलावलें परंतु त्याचा अझून कुठें पत्ता नाहीं. ( घड्याळ पाहून ) पांच तर केव्हांच वाजले, तो येईपर्यंत बसलेंच पाहिजे. ( बसतो ) मनुष्याला, आणि विशेषेंकरून सरळ मनुष्याला त्याच्या दुःखामध्यें कांहीं थोडीशी मदत केलीसें दाखविलें, त्याचें दुःख पाहून आपण कळकळ दाखविली, त्यावेळीं त्याला हिताच्या दिसतील अशा गोष्टी सांगितल्या ह्मणजे तो त्याला अगदीं जिवाचा मित्र समजतो. त्याच्या शिवाय त्याला करमत नाहींसें होतें. आणि कोणत्याही गोष्टींत त्याचा सल्ला घेतल्याशिवाय तो पुढें पाऊल टाकीतच नाहीं. आपल्या ज्या कांहीं हितगुजाच्या गोष्टी असतील त्याही तो मोकळ्या मनानें सांगतो. अशीच गोष्ट या माधवाची व वसंताची मी करून सोडली आहे. अशा संधींत माझें इच्छित कार्य केल्याशिवाय मी सोडणार नाहीं. दोघेही मला जीवलग मित्र समजत आहेत. माझ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास बसला आहे, तेणेंकरून माझें कार्य तडीस नेण्याची मुळींच भीति उरली नाहीं. वसंताच्या मनांत माधवाविषयीं वैर तर उत्पन्न झालेंच, त्याच्या कडची काळजी मुळींच राहिली नाहीं; आतां माधवाला मात्र पूर्णपणें हातीं आणला पाहिजे. या वेळीं कृष्णाजीपंतांची व सुधारकांचा द्वेष करणाऱ्या मंडळीची आपणास मोठीच मदत झाली. तेणेंकरून आपले हेतु तडीस गेलेच ह्मणायाचे. हे धर्मभोळे लोक व सुधा-

रक यांच्यामध्यें द्वेष वाढवून आपलें कार्य साधण्याची चांगली युक्ति सांपडली. केवळ सुधारकांच्या द्वेषानें तसेंच त्यांनीं रुढीस न जुमानतां मुलगी मोठी वाढविली यास्तव तिच्याशीं कोणी लग्न लावूं नये व त्या घराण्याची फट्फजिती व्हावी ह्मणून या लोकांनीं इंदिरा व वसंत या भावंडांचा आपसांत अति नीच संबंध आहे अशी कंडी थोडक्याच काळांत शहरभर पसरून टाकिली. जो तो त्यांच्याकडे आतां बोट दाखवूं लागला आहे. परंतु त्या ज्ञात्याच्या व त्या बहिणभावंडांच्या कानीं ही गोष्ट अजून गेली नाहीं हें तरी ठीकच झालें. आणि एव्हां त्यांच्याकडे जाणारही नाहीं; परंतु माधवाला मात्र ही गुणगुण कळल्यापासून पिसाळलेल्या वाघाप्रमाणें त्याची अवस्था झाली आहे. इंदिरेविषयीं प्रीति तर तुटत नाहीं, इकडे संशयानें गिळून टाकलें आहे, घटकेंत द्वेष आणि तिरस्कार यांच्या अनावर घाल्यानें वेडा होऊन ओंठ चावून घेऊन रक्तबंबाळ होतो. क्षणांत प्रीति आणि प्रेम यांच्या पाशानीं बद्ध होऊन निरुपायानें छाती बडवून रडूं लागतो. थोड्याशा समाधानाच्या गोष्टी सांगितल्या ह्मणजे पोराप्रमाणें माझ्या गळ्यास मिठी मारून सर्व भार मजवर टाकतो. अशा वेळीं मी आपले हेतु तडीस नेले नाहींत तर मजसारखा मूढ दुसरा या दुनियेंत सांपडणार नाहीं. ( थांबून ) ठीक ठीक, आज तो प्रसंग आणीन, मग पाहूं काय होतें तें. ( इतक्यांत दुःखानें विव्हळ झालेला माधवराव प्रवेश करतो त्याच्याकडे पाहून ) आला तर खरा. तोंड पहा कसें दिसतें आहे? जसा कोणी बडवून काढला आहे. मूर्खा अझून काय समजला आहेस, माझ्या पुढें

वाढलेलें ताट तूं हिसकावणार काय? अरे त्या वेळचीं तुझीं भाषणें जीं या हृदयांत टोचलीं आहेत त्यांचे वण अझून बरे झाले नाहींत. असो. आतां याला हांकच मारावी. ( उघड ) माधवराव, हा मी तुमची वाट पहात बसलों आहें.

**माधव०**—( दचकून इकडे तिकडे पाहून ) आँ, गोविंदराव, तुह्मी काय? हाँ हाँ, मला उशीर झाला ना? होय; येतांना तहान लागली ह्मणून त्या झऱ्यावर पाणी पिऊन तेथें जरा बसलों, तों त्या दुष्ट विचारांनीं मला भांबावून सोडलें. मग बसलों तो बसलोंच. गोविंदराव, काय ही माझी दशा? नको, नको, त्या घराचें आतां नांवही नकोसें झालें आहे. सारा दिवस मी कुठें तरी भटकून काढतों. ह्मणूनच तुमच्याशीं कांहीं बोलावें या हेतूनें या बागेंत तुह्माला मी बोलावलें.

**गोविंद०**—ठीक आहे. मीही आपल्या इच्छेप्रमाणें आलोंच. मित्रांना अशा वेळीं मदत केली नाहीं, त्यांचें समाधान केलें नाहीं, तर तें मित्रत्व कसलें! परंतु माझें ऐकाल तर सांगतों; पहा, याविषयीं तुह्मी फार विचार करूं नका. अशा गप्पा हजार उठतात, त्यांचें काय तुह्मी मनावर घेतां?

**माधव०**—नुस्त्या गप्पांवरतीच मी भरंवसा ठेवीत नाहीं, व प्रथम बरेच दिवस ठेविलाही नाहीं. परंतु हल्लीं मला एक एक प्रचीति येत चालली आहे. व त्या उभयतांचें आचरणही मला कसेसेंच दिसूं लागलें आहे. यावरून माझा संशय अधिक अधिकच होत आहे. आतां त्यांच्याकडे माझ्यानें पहावतही नाहीं. बोलूं लागलों ह्मणजे माझी काय

अवस्था होते हें मलाच समजत नाहीं. यास्तव त्या घरीं सुद्धां मी रहात नाहीं.

**गोविंद०**—तें तुह्मी एका अर्थी चांगलेंच करतां, मला तर वाटतें कीं, तुह्मी दुसऱ्या ठिकाणीं कोठें जाऊन रहाल तर सर्वांत उत्तम. कारण जर कदाचित् तो खराच प्रकार असला आणि तुमच्या दृष्टीस पडला तर त्या वेळीं तुह्मी वेडावून जाल. अशा वेळीं त्वेषाच्या भरांत मनुष्य काय करील याचा नियम नाहीं, ह्मणून येथें राहूं नये हें उत्तम. माझ्याही पहाण्यांत दोन तीनदां वसंत व इंदिरा–(जीभ चावून गप्प होतो) अँ–अँ–नाहीं मी मी असें—

**माधव०**—कां, असें कां, अर्धेंच बोलून गोंधळलां? वसंत आणि इंदिरा, पुढें काय?

**गोविंद०**—छे छे, तें कांहीं नाहीं. उगीच बोलतांना जीभ चळली झालें.

**माधव०**—नाहीं. येथेंच काय तें आहे. खरें तें बाहेर येत होतें परंतु तुह्मी त्यावर झांकण घालतां आहां. अरेरे, गोविंदराव, तुह्मी सुद्धां आतां असें करूं लागलां ना? माझी तुह्माला कांहींच दया येऊं नये! तुह्मी तरी यांतून मला पार पाडा हो. सांगा सांगा, तुह्माला हें सर्व ठाऊक आहे. मला मोकळा करा एकदाचा.

**गोविंद०**—काय सांगूं? मला कसें बरें ठाऊक आहे ह्मणतां? त्यांचें आचरण पाहून तुमच्या सारखा मलाही संशय येतो एवढेंच.

**माधव०**—तुह्मी काय आचरण पाहिलें तेंच मला पाहिजे. तेवढेंच सांगा. मी तुमचा मोठा आभारी होईन. या संकटांतून आणि या असह्य व भयंकर दुःखांतून तुह्मीं मला

सोडविलें ह्मणून मी तुमचे कधीं उपकार विसरणार नाहीं. सांगा सांगा गोविंदराव, मला मोकळा करा, ह्मणजे हें सर्व सोडून कुठेंतरी एकदाचा तोंड घेऊन जाईन.

**गोविंद०**—( एकीकडे ) सांगण्याची हीच वेळ आहे. या वेळीं याच्या कानांत जितकें विष ओतावें तितकें याच्या हृदयांत भिनून जाऊन आपलें काम तें बजाविल्या-शिवाय सोडणार नाहीं. ( उघड ) कशाला आतां लपवूं? लपवून उपयोग तर नाहींच. शहरांत ही गोष्ट पसरण्या-पूर्वी किंवा निदान तुमच्या कानापर्यंत येण्यापूर्वी जर तुह्मां उभयतांचें लग्न झालें असतें आणि सुखानें तुह्मीं नादूं लागला असतां तर सर्व सुरळीत झालें असतें. परंतु मध्येंच हें विघ्न आलें; तुह्मालाही कळलें, तेव्हां मला जें ठाऊक आहे तेवढें सांगण्यांत मजवर दोष येईल असें तर नाहींच. पूर्वींच याचा गवगवा झाला आहे.

**माधव०**—काय, गोविंदराव तुह्मीही माझ्या दुःखा-वर आणखी डाग देतां काय? अशा पशुवत् आचरण करणाऱ्या स्त्रियेशीं माझा विवाह झाला असता तर बरें झालें असतें असें तुमच्यानें ह्मणवलें तरी कसें? हेंच काय तुमचें मित्रत्व! ठीक आहे तर मग.

**गोविंद०**—तसें नव्हे माधवराव. तुह्मा उभयतांचें चांगलें व्हावें हीच माझी इच्छा, ह्यामुळें कदाचित् ही माझी चूक झाली असेंच समजा.

**माधव०**—( श्वास टाकून ), असो, नशीब माझें. आतां सांगा कायतें; एकदाचा निकाल होऊं द्या.

**गोविंद०**—तुह्मी ऐकत नाहींच एकूण. बरें तर सांगतों; हल्लीं तुह्मीं आजारी होतां त्या दिवसापासून मी

त्यांच्या घरीं वारंवार जात येत असें आणि केव्हां केव्हां चार चार तासपर्यंत रात्रीचा सुद्धां रहात असें हें तुह्माला ठाऊक असेलच. तेव्हां दोन तीनदां माझ्या पाहण्यांत या गोष्टी आल्या. एकदा वसंताच्याच खोलींत इंदिरेनें वसंतास घट्ट मिठी मारलेली आहे व तो तिचीं चुंबनें घेऊन आणखी कांहीं चाळे करीत आहे असें मी पाहिलें. एकदा तर तुह्मांविषयीं पुष्कळशा वाईट गोष्टी तिच्या मनांत भरवीत होता. तेणेंकरून तुह्मांवरील तिचें प्रेम नाहींसें व्हावें, असाच त्याचा हेतु मला दिसला.

**माधव०**—( भयंकर मुद्रा होऊन ) अरेरे, चांडाळा, असलें घोर कर्म! असल्या पशूंना जीवंतही ठेवूं नये, हारे चांडाळा! ( दांत ओंठ चावून जाऊं लागतो परंतु गोविंदराव घट्ट धरतो. )

**गोविंद०**—हें काय माधवराव! ह्मणूनच सांगत नव्हतों. हा उतावळेपणा कामाचा नाहीं; विचार केला पाहिजे.

**माधव०**—( हातपाय गळतात, गोविंदरावाच्या अंगावर टेंकतो. ) आँ, विचार, हाय देवा, काय हें ऐकण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे. पुरे, पुरे, ह्या सर्व जगांतील सुख मला पुरे झालें. हाय, हाय! जिच्यावर मी इतका विश्वास ठेविला, इतकी प्रीतिं केली (संतापून) ती अशी कुटिल आणि व्यभिचारी ना! ( कपाळावर हात मारून ) कोण दुर्दैवी प्राणी मी! झालें येथेंच सर्व खुंटलें. या आशेचा लय झाला. हें जग मला शून्यवत् झालें. मला याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. अरेरे, सर्व जग असेंच दुराचार, कपट, व्यभिचार व पाजीपणा यांनीं भरून गेलें आहे काय? कोठेंच विश्वास ठेवण्यास जागा नाहीं?

( छातीवर हात मारून ) मूर्खा, चांगलेंच शासन मिळालें तुला. ( थांबून ) आतां हाच विचार; नाहीं पुनः संशय येतो. अँ, संशय! हाय हाय! प्रीतिपाशांनीं मला जखडून टाकल्यामुळें हा संशय आणि ही दशा माझी होत आहे. या प्रीतीच्या दुष्ट बीजालाच या हृदयांतून समूळ नाहींसें केलें पाहिजे; काय करूं रे—हाय—

**गोविंद०**—( एकीकडे ) अझून याच्या मनांत संशय आहे काय? ( उघड ) माधवराव, असे घाबरूं नका. दोन तीन दिवस आपण पाळतीवर राहूं आणि स्वतः पाहून एकदा तुह्मी संशयनिवृत्ति करून घ्या.

**माधव०**—संशय! आतां हो कसला संशय, आणि हा उपद्व्याप पाहिजे तरी कशाला? आतां कांहीं असलें तरी मला सर्वांचाच कंटाळा आला. आपला कुठें तरी रस्ता पाहिला पाहिजे. ( थांबून ) हाय हाय! प्रिये हें हृदय फाटून त्याचे शतशः तुकडे झाले असते तर या दुःखांतून सुटलों तरी असतों. आँ, काय ह्मटलेंत गोविंदराव, संशय निवृत्ति, ठीक आहे. आपण ह्मणतां तसेंही एकदा होऊन जाऊं द्या. परंतु हें होणार कसें?

**गोविंद०**—मी जें पाहिलें तें रात्रीं जेवणानंतर. तेव्हां आपण रात्रीचे वसंताच्या खिडकी समोरच जो वाण्याचा बाग आहे त्यांत बसूं. तेथून सर्व दिसतें. वसंताच्या खिडकीला जाळीचे पडदे आहेत तरी आंत उजेड असल्यामुळें त्यांतून सर्व दिसतें. आज कदाचित् तसा योग नच आला, तरी ती चोरी दोन चार दिवसांत दृष्टीस पडेलच. मात्र एवढें करा कीं, तुह्मी एकटे तिकडे जाऊं नका. रागाच्या सपाट्यांत कांहीं तरी भलतेंच करून बसाल.

**माधव०**—मला आतां त्या भयंकर ठिकाणीं जायचें नाहीं. तें घर केवळ स्मशानासारखें मला दिसत आहे. कुठें तरी मला नेऊन टाका. तुह्मी तरी आतां एवढी दया करा!

**गोविंद०**—ठीक आहे तर मग आमच्या घरींच चला.

**माधव०**—गोविंदराव, तुह्मीं आहांत ह्मणूनच मी अझूनपर्यंत जीवंत आहें, नाहींपेक्षां माझें काय झालें असतें कोण जाणे. तुमचे हे उपकार कसे फेडूं हो!

**गोविंद**—अँः यांत कसले उपकार? असें ह्मणूं नका. चला, बुवा. ( जातात. )

## प्रवेश ४ था.

**स्थल**—वसंतरावाच्या खोलींतील देखावा खिडकीं-
तून दिसतो. बाहेर बगीचा आहे.

( इंदिरा व वसंतराव. )

**इंदिरा**—मला बाई याविषयीं संशय येतो! देवा, त्यांच्याविषयीं माझ्या मनांत असल्या दुष्ट कल्पना मुळीं येऊं देऊं नको. या लोकांनींच बाई हें कांहीं तरी उठविलें असावें.

**वसंत०**—छेः असें कसें होईल? लोकांस या गोष्टीची काय उठाठेव पडली आहे? हल्लींचें त्याचें आचरण नाहीं का सांगत? शिवाय त्या वेश्येच्या संगतीनें त्याची दशाही कशी झाली आहे? मृत्युकला आलेलें तें तोंड आणि ती भयंकर कावरीबावरी झालेली चर्या तूं पहात नाहींस काय? हल्लीं घरीं तरी कुठें असतो! या सर्व गोष्टींवरून तुला नाहीं का समजत?

**इंदिरा**—होय, तें मला समजतें. परंतु असली दुष्ट कल्पना माझ्या स्वप्नींही नव्हती. ( कपाळास हात लावून ) अरे देवा, काय माझ्या नशिबीं आहे तर मग?

12

**वसंत०**—आणखी दुसरें तिसरें कशाला पाहिजे, मी स्वतः आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. इंदिरे, काय सांगूं, त्या दुष्टानें साळसूदपणा आणि खोटी प्रीति दाखवून तुझा गळा कापला आणि आह्मां सर्वांस फसविलें. इंदिरे, तो पाजी नीच पशु येथें चंद्रा ह्मणून एक वेश्या आहे तिच्या घरीं जाऊन नेहमीं लोळत पडलेला असतो हें प्रत्यक्ष मी पाहिलें. आणि सर्वांत नीच कर्म तें हें कीं, तुझी ठुशी नाहींशी झालीना, ती या अधमानेंच चोरून नेऊन तिला दिली.

**इंदिरा**—( कावरीबावरी होऊन ) नको ग बाई! हे शब्द माझ्या कानावर नकोत. ( कपाळावर हात मारून ) फुटक्या नशिबा! ( मागें पडत असतां वसंत सावरून धरतो. )

**वसंत०**—( तोंडावर हात फिरवून ) इंदिरे, असें काय करतेस, धीर धर. त्या नीचाविषयीं आतां मुळींच विचार करूं नको. ऊठ, ऊठ, इंदिरे.

**इंदिरा**—आतां माझी काय दशा होणार, मी काय करूं? ( वसंताच्या कमरेस मिठी मारते. इतक्यांत गोविंदराव एकीकडे प्रवेश करितो. )

**गोविंद०**—आहा! आतां हाच प्रसंग आहे त्याला दाखवयाचा. ( धांवत परत जातो. )

**वसंत०**—( तोंडावर हात फिरवून ) काय करावें, हें दुःख अनावर तर खरें. इंदिरे, तें पाहून माझी सुद्धां तेव्हां जी स्थिति झाली ती आतां सांगतां येणार नाहीं. परंतु त्वेषानें त्या वेळापासून माझ्या हृदयांतून त्याला धुडकावून लावलें. तसेंच तूंही कर. ( इतक्यांत माधवराव व गोविंदराव प्रवेश करितात. )

**गोविंद०**—पहा पहा, तें पहा, कशी एकमेकांस मिठी मारली आहे! झालेना आतां? मी आलों होतों तेव्हां तर कमालच केली होती! आपल्याला जरा वेळ लागला.

**माधव०**—( भयंकर मुद्रा करून धांवूं लागतो, परंतु गोविंराव घट्ट धरतो. ) अरेरे! आतांच याचा निकाल लावतों.

**गोविंद०**—( हळूच दरडावून) खबरदार पुढें जायचें नाहीं. मला काय वचन दिलें आहेस त्याचें स्मरण आहेना? ( माधवराव दांत ओंठ चावत थरथरत रहातो.)

**इंदिरा**—नाहीं, आतां मी त्यांचें नांवही घेणार नाहीं. मी आपली अशीच राहीन!

**वसंत०**—तुझ्या प्रीतीला आणि तुझ्या गुणांला तो मुळींच योग्य नाहीं. त्याला येथून काळें तोंडच करायला लावूं.

**गोविंद०**—(माधवरावास हलवून) ऐकलेंस ना बाबा हें!

**माधव०**—( अंगास आळे पिळे देऊन भयंकर मुद्रा करून गोविंदरावास झटका देतो.)

**गोविंद०**—( त्याचें तोंड दाबून ) चूप, आपल्या बरोबर आणखी माझी फाजिती? अशानें परिणाम चांगला होणार नाहीं.

**माधव०**—( कपाळावर हात मारून, भ्रमिष्टासारखा होऊन व हातपाय गळाल्यासारखे होऊन ) हा–य. ( असें ह्मणून गोविंदरावाच्या अंगावर निश्चेष्ट पडतो.)

**गोविंद०**—हा अति क्रोधानें बेशुद्ध झाला आहे, आतां याला याच्याच खोलींत नेऊन ठेवून पुढें काय करतो तें लपून पाहूं. ( पडदा पडतो. )

## प्रवेश ५ वा.

**स्थल**—माधवरावाची खोली. टेबल, खुर्ची, कोच वगैरे पडलीं आहेत.

( गोविंदराव एका बाजूस दरवाजाच्या बाहेर लपून पहात आहे. )

**माधव०**—(कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें चोहोंकडे पाहून) गोविंदराव—अँ—गेले? मी येथें कसा? ( थांबून ) अरेरे! काय मी आतां पाहिलें तें! मी स्वप्नांत तर नाहीं? (शरीराकडे पाहून ) मी हा येथें उभा आहें! छे, स्वप्न नव्हे. त्याणें तिला मिठी मारली! माझी निर्भर्त्सना केली ( दांत ओंठ चावून ) अरेरे! अधमा, आतांच दोघांनाही ठार मारून टाकतों! ( एकसारखा डोळे ताठलेला असा पहात रहातो.) आँ, या हातांनीं ठार करूं? त्या इंदिरेला? हरहर! आग लागो या हातांना! त्या सुंदरीचा नाश करण्यास हे कठोर हात उद्युक्त झाले काय? हाय! प्रिये चुकलों, क्षमा कर! ( पुनः क्रोधानें भयंकर मुद्रा होऊन ) काय, सख्या भावाशीं जारकर्म करणारी जारिणी ती माझी प्रिया! धिःकार, धिःकार असो या माझ्या आंधळ्या प्रीतीला! अरेरे, अशा पापाचा तिटकारा ज्या हृदयांत येत नाहीं तें ( छातीवर हात मारून ) फाटून तरी कां गेलें नाहीं? अशा जारिणीविषयीं ज्या पापी हृदयामध्यें या प्रीतीनें वास केला त्याचें विदारण करून तुकडे तुकडे करून टाकतों! आँ, ती सुरी! (इकडे तिकडे पाहातो. पुनः तटस्थ उभा रहातो.)

**गोविंद०**—हा उरांत सुरी खुपसून घेतो खचित! हें ठीक नव्हे आतां!

**माधव०**—आत्महत्त्या! कशासाठीं? त्यांणीं जारकर्म केलें ह्मणून आत्महत्त्या करून मी त्याचें प्रायश्चित्त भोगूं?

हाय, मी भ्रमिष्ट झालों! अरेरे! धिक्कार असो या प्रीतीला, या संसाराला, आणि या कामवासनेला! ही दुष्ट राक्षसी कामवासना कशीं घोर कर्मे या जगांत पसरीत आहे. तिच्यामुळें किती खून पडत आहेत, किती लोक आत्महत्त्या, भ्रातृहत्त्या आणि स्त्रीहत्त्या करून नरकवासांत पडत आहेत! आणि मजवरही तोच प्रसंग ती आणूं पहात आहे काय? ( मागें सरून ) सुटलों, सुटलों, पहा निसटलों तुझ्या भयंकर पाशांतून. ( टेबलाकडे जातो, टेबलावर पत्र पाहून ) आँ, हें काय? माझ्या नांवाचें पत्र! हाय, हाय! त्या दुष्टानें लिहिलें आहे. (वाचतो) "इंदिरेशीं तुझें लग्न होणार नाहीं, आशा सोड, निघून जा." (त्वेषानें पत्राचे तुकडे तुकडे करून फेंकून देतो. ) अरे अधमा, नीचा हें कशाला पाहिजे होतें? त्या तुझ्या राक्षसी कृत्यास ही आणखी भर काय? हा संकल्प तर मी पूर्वींच केला आहे!

**गोविंद०**—( एकीकडे ) हेंच पाहिजे.

**माधव०**—अरेरे, मला असें काय होतें हें? माझे हातपाय गळाले, तुटले, माझी शक्ति गेली. ( थांबून ) हाय! प्रिये इंदिरे! या विरह दुःखानें मी आतां मरतों खचित! ( कोचावर पडतो. )

**गोविंद०**—अरे! तरी मूर्खाला पुनः इंदिरा पाहिजे आँ! याउपर आशा केलीस कीं मेलासच ह्मणून समज.

**माधव०**—( उठून ) तिला त्या अधमानें फसविलें असेल. ती खचित कपटी नाहीं. तिची मजवर तेव्हां शुद्ध प्रीति होती. ( विचार करून ) छे, प्रत्यक्ष पाहिलें. ( छातीवर हात मारून ) कोण अधम मी! या पापाचरणाबद्दल मला किळसच येत नाहीं! आग लागो या प्रीतीला.

इला दडपूनच टाकतों आतां. ( थांबून ) कांहीं असो, कसेंही असो, आतां निश्चय, हाच निश्चय, या सर्व पाशां-तून मोकळा होतों! फकीर होईन, आंगाला राख फासीन, आणि हरिनामाचा जयघोष करीत, भटकत फिरेन. झाला, हाच निश्चय. (निघून जातो पडदा पडतो.)

## प्रवेश ६ वा.

### स्थल—बगीचा.

( वसंतराव अति दुःखांत बसला आहे. )

**वसंत०**—कोण दुःख हें, याचा कधींच का शेवट होणार नाहीं? कसे एकामागून एक दुःखाचे डोंगर कोसळत आहेत. देवा, ती माझी वेणू किती दिवस तरी बंदिखान्यांत राहणार? ती दुष्ट राक्षसीण, तिला धड अन्नही देत नाहीं. मारून मारून तिचे हाल करीत आहे. अरेरे, माझ्या निदिध्यासानें ती अति क्षीण होऊन मरणो-न्मुख झाली हें ऐकून तर माझें हृदय द्विधा होत आहे. तिला सोडविण्याचे इतके उपाय केले परंतु एकही सफल झाला नाहीं. हाय! मी कपाळकरंटा तिच्या नाशास कारण झालों ना? ( थांबून ) या दुःखानें माझें हृदय पोळतें आहे तों इकडे इंदिरेची ही अवस्था! माधवाला नाहींसा होऊन आज सहा महिने होत आले असतील. त्या दिवसापासून तिची दशा दिवसेंदिवस भयंकर होत चालली आहे. जरी बाहेरून ती दुःख दाखवीत नाहीं तरी अंतर्या-मीं विरहाग्नीनें करपून जात आहे, यांत संशय नाहीं. यावरून माधवावरील तिची प्रीति नाहींशी होत नाहीं असें दिसतें. आणि यामुळेंच ती झुरणीस लागली आहे. देवा, काय हा आह्मांवर दुर्दैवाचा घाला पडला आहे?

अरेरे, काय दुष्ट लोक आहेत तरी! आह्मी सुधारक ह्मणून नीचपणानें आमचा असा सूड उगवावा काय? आह्मां भावंडांविषयीं अशी भयंकर खोटीनाटी गप्प उठवून आमचा असा नाश करावा काय! निर्दयांनों, उगवा सूड, पाहिजे तसा उगवा! हरहर! बाबांना ही भयंकर गोष्ट कळल्यापासून त्यांणीं तर आंथरूणच धरलें आहे. दुर्दैवा! वृद्धापकाळीं त्वां त्यांची अशी दशा करावीस ना? (गोविंदराव प्रवेश करतो.)

**गोविंद०**—वसंतराव, तुह्मीं फारच दुःखी दिसतां! बाबासाहेब फार आजारी आहेत कीं काय?

**वसंत०**—बाबा आहेत तसेच आहेत. परंतु हें दुःख असह्य झालें आहे हो!

**गोविंद०**—असे घाबरूं नका. मला एक विचार सुचला आहे तो कराल तर मला वाटतें तुह्मीं दुःखमुक्त व्हाल.

**वसंत०**—आपले मोठेच उपकार होतील. सांगा विचार काय तो?

**गोविंद०**—हें पहा तुह्मांविषयीं जी कोणी गप्प उठविली आहे ती बंद करण्यासाठीं लोकांच्या तोंडास तर आपण हात लावूं शकत नाहीं. परंतु त्या गोष्टीस हाच उपाय कीं, इंदिरेचें एकदां लवकर लग्न करून टाका ह्मणजे ती येथून नवऱ्याच्या घरीं गेली कीं तुह्मी सर्व दुःखांतून मोकळे व्हाल. आणि सर्वांना या गोष्टीचा विसरही पडेल.

**वसंत०**—हा विचार आमच्याही मनांत येऊन चुकला आहे. परंतु इंदिरा लग्नच करीत नाहीं असें ह्मणते आहे. बरें ह्या सर्व अडचणी दाखवून कदाचित् तिचें मन लग्न

करण्यासाठीं वळविलेंच तर योग्य पति तरी मिळाणार कोठें? ती घातक गप्प ज्याच्या त्याच्या मनांत संशय उत्पन्न करणारी आहे.

**गोविंद०**—छे, छे, मूर्ख लोक असतील तेच या गोष्टीवर विश्वास ठेवतील. माझेंच पहा ना? तुह्माविषयीं माझें किती शुद्ध अंतःकरण आहे. तशांत त्या सुशील निष्कलंक इंदिरेला कोणी नांव ठेवणारा मला भेटेल तर त्याचें टाळकेंच फोडीन. तिच्याविषयीं व सर्व तुमच्या घराण्याविषयीं माझी किती पूज्य बुद्धि आहे हें मी सांगून काय उपयोग? दुष्ट लोक आपल्या सारखेंच जग आहे असें मानितात.

**वसंत०**—(एकीकडे) बाबांना आणि मला जी अनिवार्य अडचण वाटत होती ती तर दूर झालीच. कारण गोविंद-रावाला इंदिरा देण्याचें प्रथम ठरलेंच होतें; आणि याणें आह्मांवर महत उपकारही केले आहेत, शिवाय याच्या मनांत तिजविषयीं जर इतकी पूज्य बुद्धि वागत आहे तर इंदिरा यालाच देण्यांत आनंद व सुख आहे. इंदिराही कबूल होईल यांत संशय नाहीं. (उघड) मग आपल्यापाशीं माझी एक विनंति आहे.

**गोविंद०**—ती कोणती? अशा वेळीं मी आपणास ह्मणाल ती मदत करण्यास तयार आहें.

**वसंत०**—आपण अमान्य कराल ही भीति मला मुळींच नाहीं, त्या गोष्टीपासून बाबांनाही मोठाच आनंद होईल. आपण आह्मांवर जे इतके उपकार केले आहेत त्यांची इंदिरेच्या द्वारें कांहीं अंशानें तरी फेड करावी अशी आमची इच्छा आहे.

**गोविंद०**—आँ, काय ह्मणतां? मी समजलों नाहीं तुमचें ह्मणणें.

**वसंत०**—दुसरें काय? इंदिरेचें व आपलें लग्न व्हावें अशी आमची इच्छा आहे.

**गोविंद०**—(विचारांत पडल्यासारखें करून) चिंता नाहीं, मूर्ख लोक पाहिजे तें ह्मणोत. अशा कृत्यास मागें फिरणें ह्मणजे केवळ भित्रेपणा होय. ठीक आहे वसंतराव. मी आपल्या इच्छेबाहेर आहे असें नाहीं.

**वसंत०**—मग बाबांना व इंदिरेला कळवूं ना हें?

**गोविंद०**—बेलाशक. मला असें वाटतें कीं 'शुभश्च शीघ्रम्' लौकर होईल तेवढें बरें, उगीच होय नाहीं करण्यांत अर्थ नाहीं. बाबासाहेबांचें दुःख तितकें लवकर नाहींसें होईल.

**वसंत०**—हो आमचीही तीच इच्छा आहे.

**गोविंद०**—ठीक आहे मग. या आठवड्यांत लग्नें आहेतच. बाबासाहेबांचा विचार घ्या. मग कधीं तें ठरवून टाकूं. मी आपणास पुनः दुपारीं भेटेन.

**वसंत०**—ठीक आहे. मी तसें विचारतों. (जातो.)

**गोविंद०**—इतके दिवस युक्त्या लढवितां लढवितां आज थोडेसे बेतावर आले परंतु त्या आग्रही इंदिरेचें मन लौकर वळतें कीं नाहीं कोण जाणें. चिंता नाहीं, त्याचीही तोड काढून ठेविली आहे. साध्य करीन, तरच माझें नांव गोविंदराव. (जातो पडदा पडतो.)

**अंक चवथा समाप्त.**

## अंक ८.

स्थल—नदीतीर.

( माधवराव बैरागी झालेला, गात गात प्रवेश करतो. )

राग भूप. ( राधाधरमधुमिलिंद–या चालीवर. )

**विश्वनाथ भगवन् । जय हरि कृपाघन जनार्दन ॥ दीन पतित पावन । जय हरि कृपाघन जनार्दन ॥धृ०॥ सुर नर नितनुत अलख निरंजन मुनिजन मनरंजन ॥ जय हरि० ॥ १ ॥ प्रपंच नौका सुकर्ण धारिन् । षड्रिपु बल भंजन ॥ जय हरि० ॥ २ ॥ अच्युत अमृत अंतर्यामिन् । जगन्नाथ जगज्जीवन ॥ जय हरि० ॥ ३ ॥ चिद्रुप चिन्मय ब्रह्म सनातन । जगपति जग वंदन ॥ जय हरि० ॥ ४ ॥**

( जरा थांबून ) शेवटीं या ठिकाणीं येऊन पोंचलों तर खरा. हा वेळपर्यंत मन कसें अगदीं स्वस्थ होतें परंतु या ठिकाणीं येतांच माझी चमत्कारिकच स्थिति होऊन गेली. ( सुस्कारा टाकून ) हीच ती नदी. हेंच तें माझें लहानपणचें स्नान करण्याचें स्थळ. हें रमणीय स्थळ सोडून मला सहा महिने झाले. हो येथून जाऊन सहाच महिने झाले असतील. कसा जन्मभूमीचा ओढा आहे, पहा ! या शहरांत पुनः पाय ठेवूं नये असें जरी मनानें प्रथम घेतलें होतें तरी या जन्मभूमीनें मला पुनः एथें खेंचून आणलेंच. येथें पाय ठेवतों न ठेवतों तों पूर्वीची सर्व आठवण होऊन हें मन कसें अस्वस्थ झालें आहे! अरे माधवा, काय तुझ्या जन्माचे खेळ हे. ह्या मस्तकावरील जटा, ही वाढलेली दाढी, राखेनें माखलेलें हें शरीर, थंडी, वारा, पाऊस आणि उन्ह यांची पर्वा न बाळगतां दिवस-

रात्र देशोदेशीं भटकत फिरल्यामुळें शरीराची ही झालेली दशा पाहून मी माधव आहें असें मला कोण येथें ओळखणार? (शरीराकडे पाहून) हें शरीर कसें काळें पडलें आहे. मानसिक दुःख, शारीरिक क्लेश, धड अन्न नाहीं, कैक दिवस कंदफळांवरच जीवन, कधीं चार चार दिवस उपोषण, अशा स्थितीमुळें या शरीराची कोण ही दशा झाली आहे! आवाजही बदलून गेला. (थांबून) अरे, पण हें काय? येथें पाय ठेवल्यापासून तर माझें मन फारच अस्वस्थ झालें आहे. क्षणोक्षणीं मनावर नानातऱ्हेचे तरंग उठत आहेत. नाहीं नाहीं त्या कल्पना उपस्थित होऊन प्रत्यक्ष पाहिलेली गोष्ट खोटी भासत आहे! या कल्पनांनीं जें या हृदयांत द्वंद्व माजविलें आहे त्यामुळें देवा, माझी ही स्थिति सुद्धां मला दुःसह झाली आहे. (थांबून) आतां कांहीं दिवस येथेंच काढूं. या नदीतीरीं तें मारुतीचें देऊळ आहे तेथेंच चार दिवस राहावें. दिवसा मात्र कुठें फिरतां कामा नये. कोणी कदाचित् ओळखलें तर विनाकारण त्रास पाहिजे कशाला? (विचार करून) माझ्या लाडक्या वेणूला मात्र एकदा केव्हां पाहीनसें झालें आहे. मग असेंच करावें. रात्र होऊं लागली कीं शहरांत जाऊन अकरा बारा वाजे-पर्यंत ईश्वरभजन करीत फिरावें. कोणी कांहीं भिक्षा घातली तर बरेंच, नाहींतर उपवास हे आपल्या कपाळीं आहेतच. (थांबून इकडे तिकडे पाहून) अहा, हें स्थळ किती तरी रमणीय आहे? या अस्तमान समयीं कसें ईश्वराचें मनोरम सौंदर्य चोहोंकडे पसरलें आहे. ही वेळ ईश्वराचे गुणानुवाद गाण्यास उत्तम खरी. येथेंच बसून कांहीं वेळ भजन करूं या. (बसून पदें ह्मणतो).

पद. (राग-कालंगडा.)

धन्य धन्य तुझी कृति । दीनानाथा । धन्य धन्य तुझी कृति ॥ धृ० ॥ प्रखरित दिनकर शीत हा शशधर। आनंद देति किति तरि॥ अहाहा ॥१॥ अगणित तारक। सूर्य हे प्रत्येक। करिती तुझी आरती ॥ सदोदित ॥२॥ अखिल वनस्पति। तव पद पूजिती। मलय धूप देती ॥ निरंतर ॥ ३ ॥ पक्षीगण सुंदर । काढुनी सुस्वर। स्तवन तुझें करिती॥ मधुरची ॥४॥ तव पदीं हें मन। ठेवीं बा अनुदिन। हेचि असे विनति ॥ तुजला ॥५॥

पद. (बारा मास-चाल.)

पाहिन जगीं जगन्नाथ कधीं मी। उत्कंठा मनिं अतितर जहाली ॥ धृ० ॥ अलख निरंजन भवभयभंजन। निज भक्तांचें जो मनरंजन, पूर्ण दयाघन ब्रह्म सनातन। जीवजंतुची सुखद माउली ॥ १ ॥ वेद ज्या गाती, पुराणें ही स्तविती॥ इंजिल कुराण महिमा वानिती, साधुजन निशिदिनीं प्रेमें भजती ॥ विविध ब्रह्मांडें जो चालवी ॥ २ ॥

(थांबून) जगदीश, जगदीश, जगदीश. (ध्यानस्थ बसतो. थोड्या वेळानें दादासाहेब व त्यांचा नोकर एकीकडे प्रवेश करतात.)

**दादासा०**—(आपणाशींच) हें स्थळ विश्रांतीस फार उत्तम आहे. (नोकरास) अरे, आतां अंधार पडत चालला आहे तर तूं त्या गाडीजवळच रहा जा; मी थोडा वेळ बसून येतों.

**नोकर**—जी हुकूम. (जातो.)

**दादासा०**—(कांहीं वेळ स्तब्ध बसून) काय करूं, मनाला मुळीं स्वस्थता नाहींशी झाली आहे; तें प्रायश्चित्त

घेतलें, तेव्हांपासून काय माझी अवस्था होत आहे ही? करूं गेलों एक आणि झालें भलतेंच. ह्मटलें, हें प्रायश्चित्त घेऊन जुन्या लोकांची मर्जी संपादन करूं; आणि सुधारक तर आपले बनलेलेच आहेत, त्यांची कशी तरी समजूत करतां येईल. परंतु शेवटीं अगदींच फसलों ना? हे लोक आतां मला तोंड सुद्धां बाहेर काढूं देत नाहींत. या सुधारकांनीं तर आह्मांस विश्वासघातकी, भ्याड, ढोंगी दुटप्पी, भागुबाई वगैरे विशेषणें देऊन टाकिलीं. आमच्या बोलण्यावर आतां कोणीच विश्वास ठेवीत नाहीं. दुसऱ्या पक्षानें तर आमच्या डोक्यावरच बसण्याचा घाट आणला आहे. कोणी ह्मणतात असल्या प्रायश्चित्तानें काय होतें; तुह्मीं मुळींच जातींतून उठलां. कोणी सांगतात, तुह्मी सक्षौर प्रायश्चित्त घेतल्याशिवाय तुह्मांला जातींत घेणार नाहीं. अरे, इतकें करूनही शेवटीं निष्फळ झालें ना! काय तरी लोक हे! आमच्या सारख्यांची फजिती केली ती केलीच, परंतु मोठमोठ्या रावबहादुरांना सुद्धां जुमानीत नाहींत. त्यांचीही चांगलीच खात्री केली. एवढ्या मोठ्या विद्वान् घेंडांचें त्यांना भय सुद्धां कसें वाटलें नाहीं!! झाली आह्मां सर्वांचीच फजिती झाली! या कृष्णाजीपंताच्या व नानासाहेबांच्या थापांवर भरंवसा ठेवून फसलों रे फसलों. ह्या आमच्या धरसोडीमुळेंच बिच्याऱ्या बाबासाहेबांची दुर्दशा झाली. आह्मी असें केलेंसें पाहून या लोकांनीं त्या सत्शील पुरुषाची पाठ पुरविली; त्यामुळें माधव तर कोठें नाहींसाच झाला, व बाबासाहेबांनीं आंथरूणच धरलें. कोण मी दुष्ट, आश्वासन देऊन मी त्यांचा विश्वासघात केला! काय मला सुचलें

हें! बरें आतां प्रायश्चित्ताची पर्वा न करतां पूर्ववत्-प्रमाणें वागूं लागलों तर आह्मास अस्थिर बुद्धीचे, दूरदृष्टिशून्य असें ह्मटल्याशिवाय हे लोक रहाणार नाहींत. आतां करावें तरी काय? अरेरे, ही स्थिति फारच भयंकर आहे. देवा, यांतून कसा मी मुक्त होणार! ( इतक्यांत मानस पूजा आटोपून माधव पद ह्मणूं लागतो.)

पद. ( राग–परज.)*

**तोंवरी तळमळरे तळमळरे । नाहीं भक्ति बळरे ॥ धृ० ॥ विवेक जागा करीना । जोंवरी शांति जिवीं दृढ धरिना ॥ तोंवरी० ॥ १ ॥ उदंड करितां कर्म चुकला पर ब्रह्मीचें वर्म ॥ तोंवरी० ॥ २ ॥ दास ह्मणे प्रभु पायीं । जोंवरी मन हें मुरलें नाहीं ॥ तोंवरी० ॥ ३ ॥**

जगदीश, जगदीश, जगदीश.

( दादासाहेब लक्षपूर्वक गाणें ऐकून चकित होतात. )

**दादासा०**—आँ, हा काय चमत्कार! मी एथें आलों तेव्हां कोणी नव्हतें ना? मग हा गातो कोण? अरे तो तिकडे कोणी साधु दिसतो? या समयीं ह्याचे शब्द या माझ्या द्विधा झालेल्या हृदयावर कसे कठोर घाव घालीत आहेत. हा कोण सत्पुरुष असावा बरें? याजवळ बसून कांहीं वेळ घालवावा ह्मणजे तितका मनाचा संताप तरी कमी होईल. (पुढें जाऊन) नमस्कार करतों महाराज.

**माधव**०—( ओळखून ) बसा, आपण कशाकरितां आलां?

---

* प्रार्थनासंगीत.

**दादासा०**—सहज फिरतां फिरतां इकडे आलों तों आपलें गायन ऐकून मन तल्लिन झालें. भजनांत व्यत्यय आला त्याची क्षमा असावी. आपण येथेंच असतां काय महाराज?

**माधव०**—पुष्कळ लांबचा प्रवास करून मी आजच येथें आलों आहें.

**दादासा०**—आपला पंथ कोण?

**माधव०**—आमचा पंथ वगैरे कांहीं नाहीं. एका सच्चिदानंद परमेश्वराचें भजन करावें, सदाचरणानें वागावें, होईल तोंपर्यंत आपल्या देशबांधवांच्या उपयोगीं पडावें, बोलणें एक आणि आचरण भलतेंच असें नसावें हाच काय तो आमचा धर्म.

**दादासा०**—आपण ह्मणतां अशा प्रकारचें ज्यांत आचरण होत आहे असा धर्म कुठें प्रचलित आहे काय? असल्यास आपल्याकडून ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

**माधव०**—मी हल्लीं बरेच देश व धर्म पाहिले. आणि पुष्कळ पंथानुयायांचा सहवासही मला घडला; परंतु, बंगाल प्रांतांतील कांहीं सद्धर्मी लोकांप्रमाणें विचारानुसार आचरण करणारे असे महात्मे कुठेंच माझ्या पहाण्यांत आले नाहींत. त्यांत कित्येक तर महान् साधु आहेत. ते मोठे विद्वान् असून एकाद्या राजाप्रमाणें त्यांचें पूर्वीं वैभव होतें; परंतु आईबाप, इष्टमित्र, ज्ञातबांधव, हे आपल्या धर्ममतांस आड येतात, व विवेकानुसार अनुसरूं देत नाहींत ह्मणून धन दौलत, मान मरातब आणि वैभव यांवर लात मारून कितीही दुःख भोगावें लागलें तरी चिंता नाहीं, सत्यासाठीं प्राण गेला तरी बेहत्तर, असा निश्चय करून असत्पंथांत व कुमार्गांत लोळत पडलेल्या आपल्या बांधवांस मुक्त करण्या-

करितां चंदनाचे परी आपला देह झिजवीत आहेत. धर्माचा पोकळ अभिमान बाळगणारे लोक जे प्रथम त्यांचा छळ करीत होते, तेच आतां त्यांचा दृढनिश्चय व ईश्वराच्या ठायीं त्यांची निःसीम भक्ति पाहून त्यांचे शिष्य होऊन राहिले आहेत. हा प्रताप त्या दृढनिश्चयाचा व सदाचरणाचा होय. ज्या मनुष्याच्या हृदयांत सर्वव्यापी ईश्वराचें अस्तित्व सदोदित् जागृत असतें, त्याच्याकडून असेंच आचरण व्हावयाचें. आणि त्याचेंच मानसिक धैर्य बलवत्तर असावयाचें. परंतु अति दुःखाची गोष्ट ती ही कीं, या प्रांति अशा लोकांचें महत्त्व कमी होऊन दांभिक लोकांचीच महति दृष्टीस पडत आहे. कित्येक असे लोक आहेत कीं, ते विद्वान् तर खरे, राजकार्यधुरंधरही ह्मणवितात, सर्वांस प्रिय व्हावें व सर्वांनीं आपणांस अनुसरावें अशी हांव बाळगितात आणि त्याच्या सिध्यर्थ पाहिजे तसें आचरण करतात. बोलण्यास व करण्यास मुळींच मेळ नाहीं. एकास एक गोष्ट सांगतील, दुसऱ्यास ती निराळ्याच प्रकारानें भासवतील आणि तिसऱ्या समक्ष आचरण तिसऱ्याच तऱ्हेचें करतील हाच त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग. थोर व नीतिमान् ह्मणविणाऱ्यांचीच अशी अवस्था असल्यामुळें आमचीं तोंडें काळीं झालीं आहेत. गोष्ट सर्वानुमतें उत्तम व विवेकास अनुसरून असतां, कांहीं लोकांस त्यांच्या अज्ञानामुळें ती वाईटशी वाटते ह्मणून ती गुप्तपणें करतात आणि ती उघडकीस येऊन अज्ञान लोकांनीं तिचा गवगवा केला ह्मणजे हे लोक विवेकास दूर झुगारून देऊन, मी चुकलों, मी मोठें पाप केलें असें ह्मणून त्यांच्याही डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न

करितात. आणि पुनः तेंच आचरण पूर्ववत् गुप्तपणें करितात. तेव्हां हें ढोंग नव्हे काय?

**दादासा०**—हे विद्वान्, विचारी आणि मोठे लोक कांहीं चांगल्या हेतूनेंच असें करीत असतील तें न समजतां सर्व लोकांस आपण ढोंगी कसें ह्मणावें?

**माधव०**—काय सद्हेतु सिद्धीस नेण्यास लपवाछपवीच्या मार्गाचें अवलंबन! मग तो सद्हेतु तरी कसला? आजपर्यंत झालेल्या महाजनांनीं सत्य आणि धर्म यांचा प्रसार अशाच तऱ्हेनें केला काय? त्यांनीं या लोकांप्रमाणें जर दुतर्फी वर्तणूक चालू ठेविली असती आणि हूंला हूं भिडवीत गेले असते तर आज हें जग कोणत्या अधोगतीस गेलें असतें कोण जाणें. लोककल्याण अशा गोष्टींनीं होणार नाहीं. जेथें सत्य नाहीं तेथें लोककल्याण कसचें आणि धर्म कसचा! पहा, त्या महात्म्यांनीं सत्याकरितां कात्यांनीं झोडपून घेतलें, त्यांना स्तंभावर टांगून भाल्यांनीं बोंचून बोंचून मारलें तरी त्यांनीं तें दुःसह आणि भयंकर मरण सत्याकरितां सोसलें. त्यांना जीवंत जाळलें तरी सत्यापासून ते ढळले नाहींत. जें सत्य त्यांच्या एकदां हृदयांत बाणलें होतें तेंच शेवटपर्यंत ते सांगत गेले. हें कां? ते अविचारी आणि आपस्वार्थी होते ह्मणून काय? नाहीं. ईश्वरा, हें दांभिकांचें बंड निर्मूळ करून टाकणारा कोणीच पुरुष आतां उत्पन्न होत नाहीं काय? आह्मांला अशाच नीच स्थितींत तळमळत रहावें लागणार काय? नाहीं नाहीं! परमेश्वरा, दंभ, कपट, आणि दुष्ट महत्वाकांक्षा या दुर्गुणांस आपल्या पायांखालीं दडपून टाकून, सत्य आणि तुझी भक्ति यांचा झेंडा रोवून त्याच्या शीतल छायेखालीं सर्व बांधवांस घेऊन, आनंदानें तुझ्या नामाचा

जयघोष करीत नाचूं बागडूं लागेल, असा वीर आतां उत्पन्न कर; आणि जे दुर्गुण आमच्या हाडांमासांत खिळून राहिले आहेत त्यांपासून तूं आह्मांस मुक्त कर. (थांबून-एकीकडे) अरे, हें काय! माझ्या मनोवृत्ति पुनः उचंबळल्या काय? पुनः मी त्या गोष्टींचा विचार करूं लागलों ह्मणून माझी ही स्थिति झाली ना? नको नको, जेथें असले दांभिक मानभावी कपटी राक्षस असतील तेथला, त्या शहराचा, किंवा त्या देशाचा संपर्कही नको. पुरे, पुरे हे विचार आतां. येथून जावें हेंच ठीक. (एकाएकीं उठून जातो, दादासाहेबांची चमत्कारिक स्थिति होऊन ते खडबडून इकडे तिकडे पाहूं लागतात.)

**दादासा०**—अँ, गेले, एकाएकीं! अहो महाराज, जरा थांबा, थांबा. (पुढें जाऊन पाहातात परंतु बुवा, दृष्टिआड झालेसे पाहून परत येतात.) देवा, मी स्वप्नांत तर नव्हतों ना? अरेरे! त्याच्या त्या तीव्र शब्दांनीं माझ्या हृदयाचे तुकडे तुकडे करून टाकले. हें शरीर थरथर कांपूं लागलें आहे. कोण माझी ही स्थिति? पापी अधमाधम मी लोकांस फसविण्यास उद्युक्त झालों ना? त्या बाबासाहेबांस आश्वासन देऊन मागाहून त्यांचा विश्वासघात केला ना! मला आतां दुर्घट यातनाच भोगल्या पाहिजेत. (त्वेषानें दांत ओंठ चाऊन) मूर्खा, सर्वांस प्रिय होण्याची हांव बाळगून विवेकास सोडून वागलास त्याचें फळ भोग आतां. दुसऱ्यांस पुढें घालून नांवा निराळा राहणारा तुजसारखा नीच या दुनियेंत कोणी सांपडणार नाहीं. अरेरे, बुडालों या भयंकर पापडोहांत! खास बुडालों! परमेश्वरा, यांतून आतां मला मुक्त कर. तुला अनन्यभावें शरण आलों. (बराच वेळ थांबून, एकदम खडबडून) बस,

पुरे आतां, या आपमतलबी लोकांचा नाद पुरे, या मित्रे-पणाला आतांच पायाखालीं दडपून टाकतो. विवेका, तुझे तीक्ष्ण बाण आटोप. या मूर्ख लोकांवर अतःपर मी विश्वास ठेवणार नाहीं. तुझा झेंडा आतां या हृदयांत सतत फडकूं दे. 'सत्यमेव जयते' हेंच माझें आतां ब्रीद!! (जातो व पडदा पडतो.)

## प्रवेश २ रा.

**स्थल**—नदीतीर, दुसरी बाजू. ( विष्णुशास्त्री व भट. )

**विष्णुशा०**—कांहीं दिवस तर वेणूला कोंडूनच ठेविलें होतें आणि रत्नागिरीस गेलों तेव्हां बरोबर नेली होती, ह्मणून इतके दिवस हें काम राहिलें, परंतु आतां तिला अशीच ठेवणें ह्मणजे केवळ मूर्खपणा आहे. ह्मणून स्नानाच्या निमित्तानें तिला येथें आणलें आहे. केशवपन करणार हें अझून तिला कळविलें नाहीं. कळविलें असतें तर तिला येथें आणणेंच मोठें कठीण झालें असतें, आणि दुसरीं किती विघ्नें आलीं असतीं कोण जाणें.

**भट**—तें आपण ठीकच केलें; पण न्हाव्याची काय तजवीज?

**विष्णुशा०**—तो तयार आहे. पण सध्यां तो तिच्या नजरेस पडूं नये ह्मणून त्याला एकिकडे बसविलें आहे. सर्व तयारी झाल्यावर येईल.

**भट**—मग माझी सर्व तयारी आहे.

**विष्णुशा०**—ठीक आहे. मी त्यांना तिकडे विठ्ठल-मंदिरांत बसविलें आहे तेथें जाऊन त्या मंडळीस अगोदर घेऊन या; मी इकडे बसलों आहें असें त्यांना सांगा.

**भट**—बरें आहे ( जातो. )

**विष्णुशा०**—हें एकदाचें लचांड आटोपलें ह्मणजे मी एका घोरांतून मोकळा झालों. दुष्ट पोर कशी निपजली पहा! मेली असती तरी सुटलों असतों. एकदाची सोंवळी केली ह्मणजे तरी पुनर्विवाहाच्या नादीं लागणार नाहीं. बरें, त्या येईपर्यंत पुढील तजविजीस लागावें. (जातो. थोड्या वेळानें केंस सुटलेली व मरणोन्मुख झालेली अशी वेणू, एक विधवा, आणि भट प्रवेश करतात.)

**वेणू**—भटजी, आज कोण सुदिन उगवला! सहा महिन्यांत आज कायते बाबा मजबरोबर गोड बोलले. तेवढ्यानेंच मी आपल्याला धन्य समजतें, आणखी किती दूर आहे? बाबा कोठें बसले आहेत?

**भट**—ते पहा नदीच्या कांठीं, आह्मांला पाहून ते इकडेच येत आहेत. (विष्णुशास्त्री व खंडू हजाम प्रवेश करतात.)

**विष्णुशा०**—भटजी, आतां हें गुप्त ठेवण्याची गरज नाहीं. सांगा तिला काय करायाचें आहे तें?

**वेणू**—बाबा, तुह्मी काय असें ह्मणतां? अरे देवा, यांची मुद्रा कशिशीच दिसते!

**भट**—पोरी, अंमळ थांब मी तुला सांगतों. हें पहा तुझा जन्म उत्तमोत्तम जें ब्राह्मणकुळ त्यांत झाला आहे, तर त्याला अनुसरून उचित अशा तऱ्हेनें तुला राहिलें पाहिजे ना?

**वेणू**—(संशयानें) तुमचें ह्मणणें तरी काय बाबांनों?

**साळू विधवा**—तुला माझ्यासारखी सोंवळी करायाची, समजलीस? कुठें तो खंड्या, तुझी तयारी आहे ना रे?

**वेणू**—( कपाळावर हात मारून ) अग बाई, कोण घाला हा! ( रडूं लागते ) बाबा, हीच दशा करायला या कपाळकरंटीला येथें आणलें काय हो? बाबा दया करा! माझी अशी दुर्दशा होतांना तुमच्यानें कसें हो पहावेल! ज्या केंसांला लहानपणापासून वाढविलें, माखिलें, ज्यांकडे पाहून आपले नेत्र धन्य होत होते, त्या नेत्रांनीं हा सोहळा तुमच्यानें कसा हो पाहावेल! ( विष्णुशास्त्री मान खालीं घालून उभे राहतात.)

**भट**—साळू पहातेस काय, धर तिला आणि खंडूकडे घेऊन चल. (साळू पुढें जाते.)

**वेणू**—( संतापून ) खबरदार मला हात लावशील तर. (बापाकडे धांवून, कंबरेस मिठी मारून, रडूं लागते. ) बाबा, तुमच्या पायां पडतें, कठीण मन करूं नका हो नका. मला सोडवा इच्या हातून, मला घरीं न्या.

**भट**—थट्टा मांडली आहे वाटतें शास्त्रीबुवा आपण! प्रथम कशाला भरीस घातलें आह्मांला? चल ग यांना पाहिजे तें करून घेऊं द्या.

**विष्णुशा०**—बाबांनो थांबा, हें कांहीं कामाचें नाहीं. धरा हिला. ( वेणूस, ) चल नीघ येथून. ( ढकलून देतो.)

**वेणू**—(पायांवर पडून पाय घट्ट धरते ) बाबा, तुमच्या पायां पडतें. मला नका हो लोटूं या भयंकर दुःखसमुद्रांत! यापेक्षां तुह्मींच आपल्या हातांनीं हा गळा चरचरां कापून मला मारून टाका, आणि या दुःखांतून सोडवा. अग बाई! कोणीच का मला या वेळीं नाहीं! इतके दिवस माझी कोण आशा होती, ती सर्व लयास गेली, आणि हा सोहळा या फुटक्या कपाळीं यावा ना? हाय दुर्दैवा, पाठी-

राखा माझा माधव गेला ग बाई! वसंतराव, ही अनाथ गाय हाल होऊन मरते हो मरते, तिला सोडवा!

**विष्णुशा०**—( संतापून दांत ओंठ चावून लात मारतो. ) दुष्टे, चांडाळणी, अझून त्या कारट्यांचा नाद? ( तोंडांत मारतो ) चल काळें कर, अरे पहातां काय, धरा आणि काम उरका. भट व साळू ओढूं लागतात. येत नाहींसें पाहून तोंडावर, कुशींत बुक्के मारतात. ती ओरडते. लोळण घेते. ( तरी तशीच ओढीत न्हाव्यापुढें नेतात.)

**वेणू**—( ओरडून ) मारा, मला ठार मारा, पण माझ्या केंशांस हात लावूं नका! हे प्राण तरी कशाला घुटमळतात ग बाई! नको हो नको, मी तुमच्या पायां पडतें; एवढ्या केंसांचें मला दान द्या. ( न्हाव्यापुढें बसवूं लागतात. इतक्यांत न्हाव्याचे वस्तरे पडले होते त्यांतून नजर चुकवून एक घेते.) प्राणनाथ, हाच आपणाला शेवटला प्रणाम! (संतापून) मांगानों, तुमच्या हातांतून सुटलें आतां (असें ह्मणून वस्तऱ्यानें गळा कापूं लागते. रक्ताच्या धारा चालतात. इतक्यांत न्हाव्याची व भटाची नजर तिच्याकडे जाऊन, तिच्या हातांतील, वस्तरा झोंबून घेतात.)

**वेणू**—देवा, मला आतां आपल्या पदरीं घे ( खालीं पडते. )

**भट**—धांवा खून! घात झाला! धांवा! हिनें आपला खून करून घेतला!

**साळू**—अग बाई, हें काय? ( वेणूला धरते. )

**विष्णुशा०**—( घाबरून धांवतो ) काय केलें हें! धांवा धांवा! अरे देवा! ( छाती पिटतो. इतक्यांत पड्या-

पलीकडे गलबला होतो.—'चला चला, लौकर पाय उचला. हेंच तें बैराग्यानें सांगितलेलें स्थळ—'वसंतराव व शिपायी प्रवेश करतात.)

**वसंत०**—तिला येथेंच आणणार आहेत असें त्या बैराग्यानें सांगितलें. ते कोणी तेथें मनुष्य दिसतात. तेच, तेच! धांवा, पहातां काय? (वसंत वेणूजवळ येऊन ती रक्तानें भरलेली पाहून छाती बडवून) खून, धांवा! इची मान कापली! झालें, आटोपलें! हाय प्रिये—असें ह्मणून मूर्च्छित पडतो, शिपायी सर्वांस पकडतात.)

**विष्णुशा०**—दुष्टांनों, आमच्यावर काय ह्मणून हा जुलूम?

**एक शिपायी**—अरेरे, या निर्दयांनीं काय अनर्थ केला आहे हा? (वेणूकडे जाऊन पाहून.) पण हिला थोडी जखम लागली आहेशी दिसते. ही जीवंत असून, हालचाल करीत आहे. (एकजण पाणी घेऊन येतो व कपडा फाडून भिजवून जखमेवर ठेवतो. वेणू थोडी सावध होऊन, गडबडून उठून कावरीबावरी पहाते व वसंतारावास ढकलून देते.)

**वेणू**—सोड मला चांडाळा, अझून माझा छल करतो आहेस. अग बाई, मी जीवंत कशी! धांवा हो धांवा, मला सोडवा!

**वसंत०**—(उठून) काय, माझी प्रिया जीवंत! प्रिये,

**वेणू**—अग बाई! हे कोण! माझा प्राण! (किंकाळी फोडून मिठी मारते.)

**विष्णुशा०**—अरे, या जारिणी कारटीला ठार तरी करा रे? (शिपायांस हिसका देऊं पहातो पण ते घट्ट धरतात.)

**वेणू**—मला सोडवा हो सोडवा.

**वसंत०**—भिऊं नकोस आतां. या अधम राक्षसांच्या तावडींतून सुटलीस. अरेरे, पशूंनों, तुह्मांला नाहींसेंच करून टाकतों आतां. (शास्त्र्याच्या आंगावर धांवूं लागतो, परंतु वेणू घट्ट धरते.)

**वेणू**—नको, तुमच्या पायां पडतें, त्यांना इजा करूं नका, बोलूं नका!

**विष्णुशा०**—अरेरे, काय करूं, दोघांचेही या वेळीं खून पाडले असते, सोडा रे!

**वसंत०**—मांगांनों, पोटच्या पोरीची अशी दशा करून व विद्रूप करून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडीत होता काय? मानवरूपी राक्षस, अधम, चांडाळ आहांत तुह्मी.

**विष्णुशा०**—(चवताळून) दाखवितों तुला! सोडा रे सोडा मला.

**वेणू**—दया करा, बाबांना बोलूं नका!

**विष्णुशा०**—बाबा कोण कारटे! मेली कां नाहींस!

**वसंत०**—जाऊं दे तर, (शिपायांस) बाबांनों, तुमचा व त्या बैराग्याचा मी मोठा आभारी आहें. त्यानें मला कळविलें नसतें तर आज केवढा अनर्थ झाला असता! अहा, कोण सत्पुरुष बरें तो! 'या ठिकाणीं इचें पहाटेस केशवपन करणार, तूं जाऊन रक्षण कर,' एवढें सांगून अंधारांत कुठें नाहींसाच झाला. तो मला कसा भेटेल याची उत्सुकता लागली आहे. प्रिये, तुझ्या जखमेची व्यवस्था मला प्रथम करूं दे, चल. (पडदा पडतो.)

## प्रवेश ३ रा.

**स्थल**—केशवरावाचें घर. (बनी विचारांत बसली आहे.)

**बनी**—( आपणाशींच ) देवा, काय तरी आमचा जन्म हा! वैधव्यदुःखांत होरपळत असतों, आणि त्यांतच हे मेले पुरुष आमचे असे धिंडवडे करतात ना! कसे तरी हात धुऊन आमच्या पाठीस लागले आहेत. त्या बिच्याऱ्या वेणूची कशी कशी विटंबना केली, बिच्याऱ्या अबला ह्मणूनच सोसून घेतात, झालें. बायकांस ह्मणजे हे पुरुष गुरांढोरांप्रमाणें वागवताहेत. इकडे तर अबला ह्मणायाचें आणि तिकडे कठोरपणानें वक्रूरतेनें वागवायचें. स्त्रियांना मूर्ख, अज्ञान तर ह्मणायचें परंतु शिक्षण द्यायचें नाहीं! असें एकका दोन, सर्व परीनें आमचा छळ करीत आहेत. दुर्दैवानें आमचें कपाळ फुटलेंच तर त्यावर आणखी कुऱ्हाड घालतील, नाना परीनें छळतील, विद्रुप करतील. मेले आपण होऊनच बिचाऱ्या भावड्या विधवांना नाहीं नाहीं त्या थापा देऊन भुलवून बिघडवितात आणि आपण निराळे होऊन त्यांचाच धांडोरा पिटून भ्रष्ट झाल्या ह्मणून हांकून लावतात आणखी आपणांस तांब्याच्या भांड्याप्रमाणें शुद्ध समजतात. कसे तरी हे आपमतलबी! घरीं स्वस्त्री असतांना देखील गांवांत झक मारायला जातात तरी मेले शुद्धच. हाच काय न्याय देवा तुझ्या घरचा! हा न्याय नसावा खचित. कोणी आपमतलबी दुष्ट लोक होते त्यानींच हीं ढोंगें करून ठेविलीं असावींत. देवा, तुझ्या घरीं हा धडधडीत अधर्म होत आहे. मेले कोणी कसाई आहेत, ते ह्या पुनर्विवाहाला सुद्धां आड येतात. कधीं देवा आह्मां स्त्रियांचा भाग्योदय येईल कोण जाणें, या

पुरुषांची जात बाई बेमान आणि मोठी आपमतलबी! त्या गोविंदरावानें काय माझी दशा केली, मेल्यानें मला फसविलें. माझ्या पोराचा गळा दाबून मेल्या कसायानें प्राण घेतला. खराच ग बाई! कसाई (इतक्यांत केशवराव प्रवेश करतो.)

**केशव०**—बने, वेणूची खबर ऐकिलीस काय? तिला सोवळी करायला नेली होती, तिकडे मोठाच दंगा झाला ह्मणतात.

**बनी**—झालें तें बरेंच झालें. कळलें तें सारें मला. आतां ती ह्मणें बाबासाहेबांच्याच घरीं रहाते. पुनर्विवाह लौकरच होईल झालें. सुटली बिचारी! नाहींतर ती कैकया कोण तिचे हाल करीत होती. सटवीनें दोघांना तर काढून लावलेंच. शास्त्रीबुवा बिचारा भाबडा, त्याला पाहिजे तशी नाचविते. पोरें होतीं, त्यांना वाटेस लावलीं, आणखी दुसरीं देवाकडे मागते आहे. रोज मेलीचें कांहींना कांहीं उपाय चाललेच असतात.

**केशव०**—कसले उपाय ते?

**बनी**—तुह्मां पुरुषांना त्यांत काय सांगायचें मेलें?

**केशव०**—तरी पण! त्यांत तुझें काय खर्चतें?

**बनी**—सांगायचें काय त्यांत, कोणी ह्मणें नामांकित साधु आज वर्षापासून येथें आहे. तो कांहीं खात नाहीं पीत नाहीं. आणि पुष्कळ लोकांचीं कामें करून देतो. पुष्कळांचे रोग त्यानें बरे केले. सात आठ बायकांना त्याच्या सांगण्यावरून मुलें सुद्धां झालीं. ती आपली बाळंभटाची गोदूताई ती, तिला आपण वांझ ह्मणत होतों, पण तिलाही याच्या प्रसादानें हा पांचवा महिना लागला आहे.

तसेंच या गंगाबाईला त्यानें सांगितलें. मात्र तिणें त्या नदीवरील पंचमुखी मारुतीला तीन दिवस रात्रीची प्रदक्षणा घातली पाहिजे.

**केशव०**—हँ हँ, असें काय? कधीं, कधीं घालायची ही प्रदक्षणा; सर्व नीट सांग तर खरें.

**बनी**—कधीं काय? तें मोठें कठीण आहे बाई. त्याणें तिला असें सांगितलें आहे कीं, उद्यांपासून रात्रीं बरोबर बारा वाजतां तीन दिवस एकसारखें, एकटें जाऊन त्या पंचमुखी मारुतीला प्रदक्षणा घालावी, त्याची पूजा करावी, व त्याला केळ्यांचा नैवेद्य दाखवावा ह्मणजे तो प्रसन्न होऊन त्याच्या प्रसादानें तिला पुत्र होईलच होईल.

**केशव०**—मग ती जाणार काय तसें करायला?

**बनी**—हो तर, उद्यांपासूनच. मोठ्या छातीची बाई ती तरी!

**केशव०**—कां न होईल, साधु आहे त्याचें काय? अशा पुष्कळ गोष्टी घडतात. तें असो. पण मला कांहीं खायला तर आण जा. जा लौकर.

**बनी**—बरें बैस घेऊन येतें.

**केशव०**—वाहवा, तिच्या लाभासाठीं आजपर्यंत किती खटपटी मी करीत आलों, पण एकही सफळ झाली नाहीं. आतां मात्र एक नामी युक्ति सुचली आहे. ( थांबून ) एकटी रात्रीची जाणारना, मग असाच कांहींतरी अक्राळ विक्राळ वेष घेऊन त्या देवळाकडेच गांठीन. आणि मी समुंध आहें असें सांगून भेडसावलें कीं त्या जंगलांत ती तेव्हांच हातीं येईल. ठीक, ठीक युक्ति. शेवटीं योग आला खचित! मलाही आज मारुती पावणार ह्मणायचा. ( पडदा पडतो.)

## प्रवेश ४ था.

**स्थल**—नदीतीर, झाडांमध्यें मारुतीचें देऊळ.

(अंगास व तोंडास काळें फांसून, दाढी लावून, लांब लांब केंस तोंडावरून लोंबत सोडून व कंबरेस फटकूर गुंडाळून केशवराव येतो.)

**केशव०**—हा समंधाचा वेष तर निःसंशय मला खूब साधला आहे, हा केशवराव आज धन्य होणार ना! तिच्या येण्याचा वेळ तर झाला आसावा, बारा वाजायला झाले असतील. रात्र कशी शांत आहे. आज थोडें चांदणें आहे, परंतु चिंता नाहीं, आपण या झाडाच्या आड बसावें ह्मणजे झालें. अरे! कोणाचीं बरें पावलें ऐकूं येतात हीं? तीच असावी. लवकर लपावें. (झाडा आड बसतो; गंगाबाई पूजेचें सामान वगैरे घेऊन प्रवेश करते.)

**गंगा०**—हेंच तें मंदिर, अग बाई, भयानें माझी काय अवस्था झाली आहे ही. पायही उचलत नाहींत. छाती कशी धडधड करीत आहे. येथें चिटपाखरूंही नाहीं. पान सुद्धां हालत नाहीं, जिकडे तिकडे कसें सामसूम झालें आहे. (भीत भीत मंदिराजवळ जाते. पूजेस बसते. व काडी पेटवून फुलवात लावते.) लवकर एकदाची पूजा आटोपून घेतें.

**केशव०**—अहाहा, किती तरी मनोहर दिसत आहे ही, आणि मी तर अक्राळ विक्राळ भयंकर पिशाच बनलों आहें. हें शोभावें तरी कसें? निरुपायास्तव असें करणें भाग पडलें. गंगे, या समंधानें आतां तुला झडपलेंच असें समज.

**गंगा०**—(पूजा करून केळीं मारुतीच्या पुढें ठेवते व हात जोडून ह्मणते) हे देवाधि देवा, मारुतीराया, त्या साधूनें

सांगितल्याप्रमाणें मी तुझ्या सेवेस आलें आहे. ही या दासीची सेवा मान्य करून घे, आणि माझ्या पोटीं पुत्ररत्न होईल असा प्रसाद दे. देवा, तुला मी अनन्यभावानें शरण आहें. (नमस्कार घालते, इतक्यांत मूर्तीच्या मागून हनुमानासारखा धिप्पाड दिसणारा प्राणी उडी मारतो. त्याला पाहून गंगाबाई भयभित होऊन किंकाळी फोडते.)

**केशव०**—(घाबरून) ऑं, अरे बाप रे, हें काय लचांड? आतां काय करूं! हा मारुती एकाकीं कोठून आला?

**हनुमान**—स्त्रिये भिऊं नको, तुझी निःसीम भक्ति पाहून व विनवणी ऐकून हा मी साक्षात् हनुमान तुला प्रसन्न झालों आहें. काय मागणें असेल तें माग.

**गंगा०**—(लटलटां कांपूं लागते, शब्द निघत नाहीं.)

**केशव०**—हें आहे तरी काय गौडबंगाल! साक्षात् हनुमान! या काळांत आला कोठून? प्रसाद देतों ह्मणतो, हें आहे तरी काय? चिंता नाहीं. पुढें पहावें आणखी काय काय होतें तें.

**हनुमान**—बोल बोल, , स्त्रिये तुझी काय इच्छा आहे, भिऊं नको.

**गंगा०**—(कांपत) द्‌द्‌द्-दे–वा, म्‌म्‌म्–ला पुत्र द्‌द्‌दे.

**हनुमान**—फार चांगलें आहे. प्रथम अंगावरील सर्व दागिने देवासमोर उतरून ठेव. मग तुला मंत्र देतों. (गंगा गर्भगलित होऊन खालीं बसते.)

**केशव०**—समजलों. हा कोणीतरी अट्टल ठक आहे. ही स्वारी महा वस्ताद दिसते. याचा उद्देश दुसरा काय असणार? पण हें झालें कसें? ठीक आहे तर मग. मीही शेरास सव्वाशेर आहे; याची बोबडी वळून हा पळून

जाईल असें करतों. (भयंकर किंकाळी फोडून मोठ-मोठ्या राक्षसासारख्या उड्या मारीत चवताळून एकदम हनुमानाच्या अंगावर धांवतो. गंगाबाई किंकाळी फोडून मूर्च्छित होते. हनुमानही घाबरून भयानें ओ, ओ, असा ओरडत मागें सरतो.) खबरदार दुष्टा! निघ येथून, मी इच्या घरचा समंध आहे. इचें संकट अंतरज्ञानानें जाणून इचें रक्षण करण्यास येथें प्राप्त झालों आहें. समजलास? येथून चालता हो कसा.

**हनुमान**—(प्रथम घाबरतो; परंतु मागाहून हा कोणी तरी लुच्चा आहे अशी खात्री होऊन एकीकडे) समजलों, हा लुच्चा फटींगभाई मला फसविणार काय? मूर्खा, तुझा बाप होऊन बसलों आहें येथें. (असें ह्मणून एकदम चवताळून हुप हुप असें ओरडून मोठमोठ्या उड्या मारून ऐटीनें दंड ठोकून हनुमानासारखा उभा राहातो.) मूर्खा, हनुमानापुढें असल्या तुटपुंज्या समंधाचें काय चालणार आहे? तूं माझा अंकित आहेस. (दांडा सरसावून) ही गदा पाहिलीस, नाहींसा करीन, समजलास? ही स्त्री या वेळीं माझी भक्तीण आहे.

**केशव०**—(भिऊन एकीकडे) एकंदरींत फसलें! याणें माझें सोंग ओळखलें खचित. हा दांडगेश्वरही तसाच दिसत आहे. आतां यांत अर्थ नाहीं. सामोपचारानेंच होईल तर पहावें, ही गंगाही मूर्च्छित पडली आहे; तेव्हां ही संधि चांगली आहे. (हनुमानाच्या जवळ जाऊन त्याच्यापाठीवर थाप मारून (उघड) अहो, हनुमान साहेब ओळखलें तुह्मांला; व्यर्थ शरीर कशाला शिणवतां? तुह्मीं आह्मीं सारखेच आहोंत. एकाच देवीचे भक्त; उद्देशही एकच!

**हनुमान**—अस्सें अस्सें; आतां ठीक झालें, समंध साहेब. तरी ह्मटलें हा उपटसूळ कोण! आपली एकमेकांची जरी ओळख नाहीं तरी दोघांचेंही काम होईल असें करूं ह्मणजे झालें. इचे दागिने आहेत ते आपण उभयतां वांटून घेऊं.

**केशव०**—बरें मी त्यालाही कबूल आहे. (गंगाबाई सावध होऊन भयानें कावरीबावरी पहाते.)

**हनुमान**—हे स्त्रिये, तुला भिण्याचें कारण नाहीं. मी हनुमान तुला प्रसन्न असतां येथें भय कशाचें? (तिला उभी करतात इतक्यांत माधवराव प्रवेश करतो.)

**माधव०**—आपल्या मंदिराकडे तर आलों. (त्यांच्याकडे पाहून चकित होऊन) अॅं हें काय? हे दोघे काळ पुरुष येथें कोण? आणि ही स्त्री एवढ्या अपरात्रीं! अशा भयंकर जागीं–पिशाच ह्मणतात तें खरें कीं काय!

**हनुमान**—हे स्त्रिये, त्या साधूनें सांगितल्याप्रमाणें तुला फल देतों, चल ये.

**गंगा०**—देवा काय हें! मी आहें कोठें?

**माधव०**—(ऐकून) छेः कसलें पिशाच आलें. हे कोणी दुष्ट लोक वेष घेऊन या बाईस पळवून आणून तिला पीडित आहेत. एक स्वारी तर हनुमान बनली आहे अॅं! पुढें काय प्रकार होतो तो लपूनच पाहिला पाहिजे. (लपत छपत जवळ जाऊन झाडा आड बसतो.)

**हनुमान**—तूं याला अगदीं भिऊं नको, हा माझा सेवक आहे. आणि मी तुला यावेळीं प्रसन्न झालों आहें. (हात धरतो पण गंगाबाई घाबरून मागें सरते.)

गंगा०—(एकदम ओरडून) देवा धांव आतां. मी मरतें. (पुनः जमिनीवर पडते.)

माधव०—समजलों. हे दुष्ट इला भ्रष्ट करणार. आतां हाच उपाय; पण मी एकटा आहें. छे छेः! काय होईल तें होईल, या अबलेस या समयीं संकटांतून वांचविणें हेंच माझें कर्तव्य आहे. ईश्वर यावेळीं मला सहाय्य करो! (हळूच अंगावरील धोतर फाडून त्याच्या दोन चिंध्या करतो व हातांतला एकतारा तेथेंच ठेवून बडगा सरसावीत धांवून, एकदम केशवाच्या टांचेवर मारून, त्यास खालीं पाडतो; व एका क्षणांत हनुमानाच्या कानशीलांत, मुष्टिप्रहार करतो; दोघेही खालीं पडतात.)

केशव०—अरेरे, मेलों मेलों! माझ्या पायांचे तुकडे झाले!

माधव०—अधमा, चांडाळा, भोग आपल्या पापाचें प्रायश्चित्त. (हनुमान गडबडा लोळूं लागतो, इतक्यांत माधवराव त्याच्या छातीवर जाऊन बसतो व धोतराच्या तुकड्यानें त्याचे हातपाय बांधून टाकतो.)

केशव०—(उठूं पहातो परंतु उठवत नाहीं) कोण हा दुष्ट? माझे पाय मोडले, काय करूं रे, तुझें डोकेंच कीं रे फोडून टाकलें असतें!

माधव०—खबरदार! (छातीवर जाऊन बसतो. दोघांची झटापट होते माधवराय कानशीलांत बुक्की मारतो. आणि हातपाय बांधून टाकतो.) अधमांनों, ही शिक्षा अझून तुमच्या अपराधास पुरेशी नाहीं. याचें प्रायश्चित्त आणखीही दिलें पाहिजे (गंगाबाईकडे जातो. निरखून पाहून तिला ओळखतो, कपाळावर हात मारून कांहीं वेळ

स्तब्ध होऊन) आई! हाय देवा! हें पाहाण्याचें माझ्या कपाळीं आलें ना! हें झालें तरी कसें!! (गंगाबाई सावध होते.)

**गंगा०**—(भयभीत मुद्रेनें) अग बाई! मी आहें तरी कोठें! काय पाहातें हें!

**माधव०**—बाई तूं भिऊं नको. मजकडे पहा, मी यांच्यासारखा दुष्ट नाहीं. हे चांडाळ देव नव्हत किंवा हनुमान नव्हत, या देवांची पहा कशी मी मनुष्यानें अवस्था केली आहे ती. दुष्टांनीं तुला फसविलें आहे. आतां घाबरूं नको. तूं कशी येथें आलीस तें मला सांग. अशी कशी फसलीस. हे कोणी लुच्चे चोर आहेत. त्यांणीं तुला भ्रष्ट केलें असतें! तुझे हाल करून तुला लुटलें असतें!

**गंगा०**—अशावेळीं बाबा तूं कोण मला सोडवायला आलास? मी स्वप्नांत तर नाहींना? अग बाई, ते पहा राक्षस! (कांपूं लागते.)

**माधव०**—बाई, पहा मी त्यांना बांधून टाकलें आहे. मजविषयीं तूं मनांत कांहीं शंका आणूं नको. मला तूं आपल्या मुलाप्रमाणें समज. सांग, तूं या रानांत कशी आलीस अशा भयंकर वेळीं?

**गंगा०**—बाबा, मला एका गोसाव्यानें सांगितलें होतें कीं तूं या हनुमानाची पूजा करायला तीन दिवस रात्रीची एकटी जात जा, ह्मणजे तुला पुत्र होईल. त्याप्रमाणें मी आज आलें. तों हा प्रसंग! बाबा हे राक्षस कोण? अग बाई, माझे हातपाय गळाले! मला थंडी भरून आली. कसेंही करून मला घरीं पोंचीव.

**माधव०**—अरे अधमा मूर्खा हनुमाना तूं आहेस कोण? खरें सांग, नाहींतर तुझी खोडच मोडतों पहा. तूं कोण

असावास हें तर माझ्या लक्षांत येऊन चुकलें आहे, परंतु सांग, सांग लौकर, बोल.

**हनुमान**—महाराज, पाया पडतों, क्षमा करा; ज्यानें इला येथें यायला सांगितलें तोच गोसावी मी; महाराज सोडा मला, क्षमा करा.

**गंगा०**—( कपाळावर हात मारून ) हायरे देवा! कोण माझी फजिती ही! कशी त्या व्यर्थ आशेनें मी फसलें! अरे मेल्यांनों तुमचा सत्यानाश झाला तो. असेंच आजपर्यंत कित्येक भोळ्या बायकांना फसवीत आलां ना? ( माधवास ) अरे बाबा नको सोडूं मेल्यांना. मरूं दे कुजून येथेंच.

**माधव०**—( केशवास ) कायरे, तूं रे कोण काळतोंड्या? एव्हांच कां काळें तोंड करून घेतलेंस हें ( काठीनें त्याचे केंस मागें सारतो ) अरे हा मूर्ख बेटा कुठें पाहिलेला दिसतो. बोल बोल, नाहींतर डोक्यांत घालतों पहा!

**गंगा०**—अग बाई, हा मेला केशव तर नव्हेना? तसाच दिसतो.

**केशव०**—( हात जोडून ) तुमच्या पाया पडतों, या बाईनें सांगितला तोच मी केशवराव. सोडा सोडा, या उपर मी कधीं असें करणार नाहीं.

**गंगा०**—( धांवून लात मारून ) मेल्या, तुझा सत्यानाश झाला तो! हा कावा काय रे! मर मेल्या आतां असाच. ( थांबून ) देवा, कोण माझी दुर्दशा ही. ( दांत ओंठ चावून ) मेल्या देवांनों असेच कायरे भोळ्या लोकांस पावत होतां? अरेरे, काय हें थोतांड, आग लागो असल्या देवांच्या व भोंदूंच्या तोंडांना, कसले मेले देव हे.

**माधव०**—( संतापून ) अधम पशूंनों, तुह्मांला चांगलेंच प्रायश्चित्त दिलें पाहिजे. असेच रंगीबेरंगी तोंडें घेऊन हनुमान आणि वेताळ बनून येथें लोळत पडा. उद्यां सर्व शहरांत ही गोष्ट पसरून येथें जत्रा भरेल आणि सर्व लोक येऊन तुमच्या तोंडांवर थुंकतील असें करतों. महान् महान् साधूंचे वेष घेऊन त्यांच्या नांवें दुष्ट व अघोर कर्मे जीं दुनयेंत होत आहेत तीं या वेड्या व धर्मभोळ्या लोकांना समजून त्यांचे डोळे तरी उघडूं देत. बाई चल आतां मी तुझ्या घरीं पोंचवितों. तूं कांहीं मला भिऊं नको. माझ्या आईप्रमाणें आहेस तूं. आतां इतकेंच तुला सांगणें आहे कीं या उपर तरी अशांच्या नादीं लागूं नको. हीं सर्व थोतांडें आहेत. देवाच्या व धर्माच्या नांवानें हे लफंगे, दरोडखोर, घातकी लोक असेच लोकांना फसवित आहेत. या दुष्टांनीं देव, धर्म, दुराचार आणि पाप हें सर्व एकमय करून सोडलें आहे. भोळ्या लोकांस यांत कांहींच समजेनासें झालें आहे. यासाठीं आतां तरी तूं सावध हो. ईश्वरानें जी आपल्याला स्थिति दिली आहे तींत आपण संतुष्ट राहिलों नाहीं, तर हे असले भयंकर प्रसंग गुदरतात हें आतां तरी लक्षांत ठेव.

**गंगा०**—बाबा आजपासून अशांच्या नादीं मी कधीं लागणार नाहीं. मला आज खरा पश्चात्ताप झाला आहे. कोण प्रसंग मजवर गुदरला होता! बाबा त्यांतून तूं मला सोडविलेंस. तुझे जन्मोजन्मी कीरे उपकार फिटणार नाहींत. तूं माझा गुरु आहेस. माझा रक्षणकर्त्ता तूं मला देवच कीरे भेटलास! मला तुझ्या पाया पडूं दे. तूं साक्षात् शंकर आहेस. (पायां पडत असतां माधवराव धरून उचलतो.)

**माधव०**—असें करण्याचें कारण नाहीं, तूं माझ्या मातेप्रमाणें आहेस. चल आतां (एकीकडे डोळयांत आंसवें आणून) देवा! मागची आठवण होऊन या वेळीं काय माझी अवस्था होत आहे ही! असो. (जातात.)

### प्रवेश ५ वा.

**स्थल**—शहरांतील रस्ता (गोविंदराव प्रवेश करतो.)

**गोविंद०**—आँ, माधवराव येथें कसा! हा काय प्रकार असावा? या वेऱ्यानें पुनः या शहरांत तोंड दाखवूं नये अशी मी व्यवस्था केली असतां हा पुनः आला! ह्मटलें, हा गेला कीं इंदिरेशीं आपल्या लग्नाचा थाट उडवून मोठ्या आनंदांत मी राहीन. परंतु, आतां तर सर्वच प्रकार उलटतो कीं काय, अशी मला मोठी भीति पडली आहे. सहा महिने झाले, नाना तऱ्हेच्या युक्त्या लढवितां लढवितां शेवटीं बापाच्या मरणाची भीति घातली तेव्हां कुठें ती इंदिरा लग्न करण्यास कबूल झाली. परंतु ऐन वेळीं तो चांडाळ येथें येऊन बैराग्याच्या वेषानें शहरांत भटकतो आहे. हें ऐकून तर माझें काळीज उडून गेलें! याचा दुसरा हेतु काय असावयाचा? उद्या आमचें लग्न आहे. परंतु तितक्या अवकाशांत पुढें आणखी काय होईल हें कांहींच समजत नाहीं. अरे एवढी जी मी ही इमारत मोठ्या प्रयासानें बांधिली आहे, तिला मधून मधून हा चांडाळ पोखरीत तर नसेल ना? असें झालें तर ही इमारत खचित ढासळेल आणि मी तिच्या खालीं दडपून जाऊन धुळीस मिळेन! अरेरे, काय हा माझ्या जिवाला घोर लागला आहे! तो उपाय योजिला आहे खरा, परंतु तो साधतो कीं फसतो कोण जाणें. केशवाच्या मनांतून त्याचा सूड

उगवायाचा आहे, ह्मणून त्याला मी आपल्या कटांत सामील केला, परंतु तें तरी काय, आजच्या आज होईल तरच सर्व ठीक आहे. बाकी त्या मारेकऱ्याविषयीं तर माझी खात्री आहे. परंतु प्रसंग मोठ्या आणिबाणीचा आहे. आजच्या आज त्या दुष्टाला लोळविला पाहिजे. आजची रात्र कायती राहिली आहे. पण केशव कसा बरें अझून आला नाहीं. तो काय खबर आणतो याकडे माझें सर्व लक्ष्य लागलें आहे. ( केशवराव प्रवेश करतो. )

**केशव०**—गोविंदराव, नाहीं बुवा, माधवाचा कोठें पत्ता लागत नाहीं.

**गोविंद०**—काय, पत्ता नाहीं? तरमग कसें होणार? अरेरे, हें लक्षण कांहीं ठीक नाहीं.

**केशव०**—मारुतीच्या देवळांत तर तो आलाच नाहीं. तेथें भेटला असता ह्मणजे बेमालूम काम झालें असतें. तेथेंच ठार करून जंगलांत पुरून टाकला असता ह्मणजे मागमूस ही लागला नसता. एरवीं तरी असले गोसांवडे कैक नाहींसे केले ह्मणून त्यांची कोण वास्तपुस्त करतो ह्मणा. परंतु काय करावें, त्याचें नशीब अझून जोरावर दिसतें. मला वाटतें, एकाच मारेकऱ्यावर अवलंबून रहातां कामां नये. आणखी एक तरी पाहिजे. ह्मणजे तो भटकत असतांना कोणाच्या तरी हातीं लागेल.

**गोविंद०**—छे! छे! ही गोष्ट घट्कणीं होतां कामा नये. एकटा काळू आहे तेवढा बस्स. तो माझ्या खात्रीचा आहे. त्याच्या हातूनच होईल तें कार्य. जा तर तुह्मी पुनः जा, काळू बरोबरच असा. असेल तेथून हुडकून काढा.

आणि करा एकदाचा फडशा. तरच आमची धड गति आहे, नाहींतर सर्व बेंड उघडकीस येऊन आपण सर्वजण ठार बुडालों ह्मणून समजा. जा जा, वेळ गमावूं नका जा.

**केशव०**—बरें आहे. हा चाललों ( जातो. )

### प्रवेश ६ वा.

**स्थल**—गोविंदरावाचें घर. (बनी विचारांत बसली आहे.)

**बनी**—काय तरी करूं आतां; लग्नाची आस लावून ह्या मेल्या गोविंदानें मला आपल्या घरींही आणून ठेविलें. आतां मेल्याचे डाव समजलें मी! मला उघड राख करून बाळगण्याचा या कपट्याचा घाट दिसतो ग बाई! मजशीं लग्न लावतों असें आजपर्यंत सांगत आला आणि उद्यां त्या इंदिरेबरोबर मेल्याचें लग्न लागणार ना! ही गोष्ट आजपर्यंत कशी ती मला कळली सुद्धां नाहीं. हा ठक आजच येऊन ह्मणत होता ना, कीं दोन तीन दिवसांनीं तुजबरोबर पुनर्विवाह लावीन ह्मणून? हाय देवा? काय विश्वासघात हा! आतां मी काय करूं? हें जर उघडकीस आलें तर माझे फजीतीस पारावारच नाहीं ( रडूं लागते. गोविंदराव एकीकडे प्रवेश करतो.)

**गोविंद०**—( आपणाशींच ) इला लग्नाची गोष्ट तर कळली नसेलच. कारण आपण खबरदारी तशीच ठेविली आहे. काय करावें, तेव्हांच माझ्या पहा कसें लक्षांत आलें नाहीं. इचा हा माझ्या रस्त्यावरील कांटा समूळ नाहींसा केला पाहिजे होता. आतां इला नाहींशी करण्यास अवधी राहिली नाहीं. माझें एकूण एक गुह्य हिला ठाऊक असल्यामुळें मला इचें मोठेंच भय वाटत आहे. चिंता नाहीं; उद्यां लग्न तेवढें आटोपलें ह्मणजे मग इणें कांहीं जरी सांगि-

तलें तरी इचें कोण मनावर घेणार? तोंपर्यंतच इची मनधरणी करूं. पुढें केव्हांही खबर घेतां येईल. ( उघड ) बने तूं अशी खीन्न कां दिसतेस?

**बनी**—देवा ! पुरुषांना कांहीं तरी हृदय आहे काय? अहो तुमच्या मनाला कांहीं तरी वाटूं द्या. येथें येऊन मला सांगतां कीं दोन तीन दिवसांत मजबरोबर लग्न लावीन ह्मणून, आणि उद्यां इंदिरेशीं तुमचें लग्न ठरलें आहे ना? ( रडून ) हाय देवा. फसलेंरे फसलें!

**गोविंद०**—( आपणाशींच ) अँ, इला कसें कळलें हें ! अँ: कळलें तर कळलें. (उघड) अग फसलीस कशी? इतके दिवस मौज मारलीस ती.

**बनी**—( कपाळावर हात मारून ) हाय दैवा! हे आणखी दुःखावर डाग मी आतां कसे तरी सहन करूं, अहो, तुह्मी लग्न लावणार होतां ना हो मजशीं ?

**गोविंद०**—लग्न! हँ:, कोण मूर्ख आहे ही ! तुझ्यासारख्या जारिणी स्त्रीशीं मी लग्न लावून गांवभर फजिती करून घेऊं ना? बने मला तूं बोळ्यानें दूध पीत आहें असें समजतेस काय ? व: रे अक्कल, आतां आपली बाजारांत जाऊन उघड दुकान घालून बेस जा कशी.

**बनी**—( संतापून उठून दांत ओंठ चावून हातावर हात मारून) मेल्या मांगा, तुझें तळपट कीं रे होवो. कसाया, इतके दिवस गोडी गुलाबीनें मला फसवून व माझ्या पातिव्रत्याचा भंग करून आतां मला जारिणी ह्मणून दुकान घाल ह्मणतोस आणि आपलें अब्रूचा टेंभा मिरवितोस ! मेल्या तुझी पुरी फजिती करतें पहा.

**गोविंद०**—जारिणी खबरदार. (तोंडावर बुक्की मारतो,

भळभळां रक्त वहातें) फार बोलतेस? ठाऊक नाहीं? माझ्या-सारखे आणखी तुझे यार किती असतील!

**वनी**—हाय हाय देवा! या कपट्यावर विश्वास ठेवून याला वश झालें ह्मणून मी आतां जारिणी बनलें आणि हे हाल भोगतें आहें ना? ( संतापानें छाती बडवून ) अरेरे कपट्या, मेल्या तुझ्या पायांजवळ डोकें आपटून जीव देतें. (त्याच्या पायांजवळ मस्तक आपटते.)

**गोविंद०**—( कुशींत जोरानें लात मारतो. बनी 'अग आई, मेलें,' असें ह्मणून खालीं पडते, गोविंदराव निघून जातो. पडदा पडतो. )

## प्रवेश ७ वा.

**स्थल**—रस्ता. (माधवराव आणि मोरोपंत प्रवेश करतात.)

**माधव०**—हर हर! काय अधमपणा हा! गोविंदराव, अरे जिवाचा मित्र ह्मणवून आणि इतकें प्रेम दाखवून असा केसानें गळा कापावास ना? ईश्वराचें ठिकाणीं ह्या जगांतून सगळा न्याय नाहींसा झाला असें तुला वाटलें काय रे? निर्दयांनीं अशाप्रकारें सूड उगविणें हें नीचांचें काम होय! मोरोपंत तुह्मींसुद्धां कसें हो तेव्हां मला मुळींच सांगितलें नाहीं.

**मोरो०**—खरोखरच या दुष्टाचे असे घातक उद्देश असतील हें माझ्या स्वप्नींही नव्हतें. तुमची केवळ थट्टाच करण्याकरितां बंदेअल्लीखांचें नांव सांगून त्या वेश्येच्या घरीं न्यायचें असें त्यानें मला सांगितलें; ह्मणून मी त्या गोष्टीला कबूल झालों. हे त्याचे दुष्ट हेतु मला काय ठाऊक? आतां मला हें तुह्मांकडून खरें कायतें कळतें आहे माधवराव, तुमचा मी सर्वस्वी अपराधी आहें. मीही तुमच्या दुःखास

कारण झालों हें माझ्या हृदयाला खात आहे. काय करूं? मला याची क्षमा असावी.

**माधव०**—मित्रा, हे सर्व माझ्या दुर्दैवाचे खेळ आहेत. त्यांत तुला काय ह्मणून दोष देऊं? तूं आपल्या मनाला त्रास करून घेऊं नको. अरेरे, मला त्यानें जमीनदोस्त करून टाकलें. हाय हाय! लोक मला दुष्ट व्यभिचारी ह्मणत असतील ना? त्या माझ्या इंदिरेच्या मनांत मी केवळ व्यभिचारी पशु आहें असें त्यानें भरवून दिलें, तेव्हां तिची काय दशा झाली असेल? माझी लाडकी माझ्याशीं अत्यंत प्रेमानें कीं हो वागत होती! कोण मजवर प्रेम तें. हाय हाय, तें सर्व लयास गेलें असेल ना? हाय! प्रिये इंदिरे, मी अति नीच, असें समजून आपल्या हृदयांतून मला धुडकावून लाविलें असशील ना! ह्मणूनच, परमेश्वरा, मला फकीर होऊन रानोमाळ अन्नपाण्याशिवाय भटकून वनवास काढावा लागत आहे. प्रिये, तें मन इतकें निष्ठुर झालें असेल काय गे?

**मोरो०**—माधवराव, हा तुमचा तर्क अगदीं खोटा आहे, तुमच्यावर तिची पूर्ण प्रीति आहे, ह्मणूनच तिनें इतके दिवस लग्नाचें नांवही काढूं दिलें नव्हतें.

**माधव०**—होय असेल. तें हृदय मी ओळखतों. मग काय मीच दुष्ट? त्या सतीस नसतीं दूषणें मी लाविलीं! ह्या दुष्ट हृदयांत तिच्याविषयीं कुकल्पना उद्भवल्या! हे क्रूर हात त्या सुकुमारीस ठार करण्यास उद्युक्त झाले! हाय हाय! हे भयंकर विचार माझ्या काळजाला आतां झोंबूं लागले!! लाडके, मी आतां तुझ्या क्षमेस मुळींच पात्र नाहीं. तुला हें तोंड तरी कसें दाखवूं?

**मोरो०**—हें काय चालविलें आहे तुह्मीं? असले विचार मुळींच मनांत आणूं नका. ती आपखुषीनें लग्नास तयार झाली नसेल हें मी आपणास खास सांगतों. हें सर्व गोविंदाचें कपट आहे. तुह्मीं लवकर चला. लग्नास कायतो एकच तास राहिला आहे. तें सुद्धां शहरांत नाहीं. गांवाबाहेरील त्यांच्या बागेंत गेलें पाहिजे.

**माधव०**—चला, चला. देवानें कशी इतके दिवस तुमची माझी भेट होऊं दिली नाहीं! प्रिया माझी भेटेल काय हो मला? माझे हातपाय गळाले! चालवतही नाहीं.

**मोरो०**—असा धीर सोडूं नका. मजबरोबर चला कसे. ( जातात.)

## प्रवेश ८ वा.

### स्थल—इंदिरेची खोली.

( मैनेचा पिंजरा टांगला आहे. इंदिरा सफेत पातळ नेसलेली, केंस मोकळे सोडलेली, दागिनेरहित अशी दुःखानें वेणूच्या खांद्यांवर मान टाकून बसली आहे.)

**वेणू**—याला काय बरें उपाय बाई? देवा कसा हा घाला पडला!

**इंदिरा**—ईश्वर मला मरण तरी कां देत नाहीं, कशी पेंचांत सांपडलें आहें पहा!

**वेणू**—असें होतें, तर मी लग्नच करीत नाहीं ह्मणायचें होतेंस?

**इंदिरा**—तें सर्व कांहीं खरें ग! इतके दिवस तशांतच घालविले पण बाई, कोणी वैऱ्यांनीं आमचा व्यर्थ बोभाटा गांवभर केला ना! ह्मणून ग वेणू माझें नशीब फुटलें हें! तेव्हांपासून बाबा बिछाना धरून पडले. दादाला तोंड

काढण्यास जागा नाहीं अशी दशा कींग वैऱ्यांनीं केली. मी अभागीण यांच्या दुःखास कारण झालें. आतां अशीच जर लग्नाशिवाय घरांत राहिलें तर हे लोक आणखी काय काय उठवतील कोण जाणें! मग बाबा प्राणसुद्धां ठेवणार नाहींत. नको ग बाई! माझ्या सुखासाठीं त्यांच्या जिवाचा नाश कसा करूं? यासाठींच ग वेणू मी मोठ्या संकटानें या भयंकर सोहळ्यास हो म्हटलें. आणि हें अंतरदुःख कोणाला कळूं दिलें नाहीं. वेणू, आंतल्या आंत झुरून मी मरतें आहें ग! देवा, ज्याचा मला इतके दिवस तिटकारा येत होता त्याच्याच गळ्यांत शेवटीं माळ घालण्याचें माझ्या कपाळीं आलें ना! (कपाळावर हात मारून) हा निष्ठुर देवा! ज्यांना मनोभावें करून हें तन मन अर्पण केलें होतें ते प्राणपति मी जारिणी आहे असें समजून निघून गेले असतील ना! (रडूं लागते.)

**वेणू**—(रडूं लागते) दादा, कां रे आह्माला टाकून गेलास. या सुशील इंदिरेच्या हातून हें नीच कर्म होईल असें तुला वाटलें तरी कसें? बाई इंदिरे, उगी रहा. (वेणूला आंतून हाक मारतात.)

**इंदिरा**—अग बाई! कोणी हाक मारतें आहे; तूं जा बाई, मी जरा येथें पडतें.

**वेणू**—बरें, तशानें तरी थोडा विसर पडेल. (जाते.)

**इंदिरा**—(वेणू गेलीसें पाहून छातीवर हात मारून) घे बाई आतां रडून हवें तितकें! कठोर हृदया आतां गुदमरूं नको! नेत्रांनों चालूं द्या तुमचे पूर. (रडूं लागते) आँ विसर! हो, आतां या देहाचाच विसर पडणार! काय मी अशीच रडत रहाणार एकूण? (घाबरून) अग

बाई ! ती लग्नाची वेळ जवळ आलीना? तासभराचीही अवधी नसेल ! त्या राक्षसिणी या फुटक्या कपाळाला मुंडावळी बांधायला येतील ना आतां ! अग बाई, नको नको ! सर्वस्व अर्पण करून मनानें ज्याला वरलें त्याला सोडून चांडाळणी भलत्याच्याच गळ्यांत माळ घालण्यास तयार झालीस ना ! हाय हाय ! अगे पापिणी असें कठीण हृदय करून अझून कशी जीवंत राहिली आहेस ? माझा प्राणविसावा ग बाई मला टाकून गेला ! आतां कशी हो मी जीवंत राहूं? अहो, ही आपली एकनिष्ठ पति अढळ पातिव्रत्यानें तुमच्या चरणीं निष्ठा ठेवून राहिली असता चांडाळानें कोणी हो हें विष आपल्या प्रीतींत कालवलें? ज्यावेळीं ती भयंकर गोष्ट आपल्या कानीं आली असेल तेव्हां तुमची कोण दशा झाली असेल? प्राणनाथ, त्या रागाच्या तडाक्यांत मला ठार तरी करून जायचें होतें ! अशी तळमळत टाकून कां गेलां? देवा, कुठें सुखी तरी असतील काय ? सुख, त्यांना आतां कोठलें सुख आलें ! संतापाच्या तडाक्यांत त्यांणीं आत्महत्या सुद्धां करून घेतली असेल. ( कावरी बावरी होऊन ) नको ग बाई, हें दुष्ट विचार! (छातीवर हात मारून) कठोर हृदया काय हें चिंतीत आहेस ? चांडाळणी तुझ्यामुळें त्यांची काय दशा झाली असेल ! तरी तूं अझून जीवंत राहून दुसऱ्याच्या गळ्यांत माळ घालण्यास सिद्ध झालीस ना ? पापिणी धिक्कार असो तुझ्या जीविताला. (थांबून डोळे गरगर फिरवून) हँ आतां तोच विचार. या क्लेशांतून मोकळें होण्यास दुसरा उपायच नाहीं. तें पिऊन टाकावें एकदाचें. हें दुःसह जीवन पुरे ! हा देह निःसीम भक्तीनें प्राणपतीच्या चरणीं अर्पण

करणें हेंच माझें आतां कर्तव्य. हें जग किती भयंकर! कोण हा माझा नसता दुर्लौकिक! नको नको, असल्या जगाचा संबंध नको! (पिंजऱ्यांतील मैना फडफडते) काय बाई मैने तूंही जाऊं पहातेस? जा बाई. या दुष्ट मनुष्याशीं संबंध नको ठेवूं! बाई तुजशीं उभयतांनीं कशी करमणूक केली होती. पुरे पुरे, नको ती आठवण आतां. लाडके, याउपर तुला कोण पाळील पोशील? जा बाई, तुला मी सोडून देतें. तुझी व तुझ्या पतीची ताडातोड करून तुला कोंडून ठेवलें, त्याचेंच आह्मांला फळ मिळालें काय ग हें? जा बाई, खुशाल आपल्या पतीशीं विहार कर. माझें दैव फुटकें (कपाळावर हात मारते) बाई तुला सोडून देतें आणि मीही (छातीवर हात मारून) या पिंजऱ्यांतून एकदाची मोकळी होतें. (माधवरावाच्या तसबीरीकडेपाहून) अग बाई! हे पहातातना मजकडे! (तोंडावर हात ठेऊन जवळ जाते) प्राणनाथ, आपल्या दासीची काय हो दशाही! (तसबीर हृदयाशीं धरते. दचकून) हाय हाय, मी तर भ्रमिष्ट झालें. (छातीवर हात मारून) हायरे दैवा, किती निष्ठुर तूं! (घाबरते) अग बाई! हें मी काय करते आहे! आतां माझें लग्न आहेना! मला न्यायला येतीलना! आँ, लग्न! कोणाशीं? गोविंदरावाशीं? आणि माधवराव कोण? (कपाळावर हात मारून) अरे नशिबा! काय मी व्यभिचारीण! (दोन्ही हात छातीशीं धरून भयंकर मुद्रा करून मागें सरते) पुरे पुरे, हें दुःसह जीवन? (निऱ्यांमध्यें खोंचून ठेवलेली विषाची कुपी काढते) प्राणनाथ, लग्नाच्या या शेवटच्या घटकेपर्यंत आपली भेट होईल अशी आशा धरून हे प्राण घुट-

मळत राहिले होते; पण आतां दुसऱ्याच्याच गळ्यांत माळ घालण्याचा दुर्धर प्रसंग आला आहे तो टाळतें. व्यभिचाराचा डाग मला लागूं नये ह्मणून हें जलाल विष पिऊन या घोर यातनेंतून सुटतें. (कुपी उघडूं लागते. इतक्यांत इंदिरेस हांक मारीत रमाबाई येतेशी पाहून कुपी पुन: लपविते) अरे देवा, वैरिणी आल्या! म्यां चांडाळणीनें ही संधि घालविली. मग तसेंच करीन. (मुंडावळी वगैरे घेऊन रमा प्रवेश करते.)

**रमा**—बाई इंदिरे, येथें काय करते आहेस? नवरदेव येतील ना आतां, चल मुंडावळी बांधूं दे.

**इंदिरा०**—बांधा बाई! (एकीकडे) देवा! या मुंडावळी आणि हा सोहळा आतां माझ्या मरणाचाच होणारना! (पडदा पडतो.)

## प्रवेश ९ वा.

### स्थल—गांवाबाहेरील रस्ता.

(केशवराव व काळू मारेकरी तरवार लपवून घेऊन प्रवेश करतात.)

**केशव०**—काळू, माधवाचा सुगावा तर लागला, पण आतां कसें करणार?

**काळू**—कसँ ह्मंजे. पाटलाग करूं आन काय? जातो कुट त्योकाचा. त्या मानसान सांगतलँ न्हव का, ह्येच वाटनं गेला म्हुन. बिगी चला. गवसला कीं त्योकाला हानलाच. तुकड तुकड उडवतों बगा.

**केशव०**—मला वाटतें तो तिकडे लग्नालाच चालला आहे. मग लौकरच रस्त्यावर गांठून लंबा केला पाहिजे. एवढें बरें झालें कीं हा रस्ता गांवाबाहेर आहे. या जंगलांत त्याला लोळवायला संधि बरी आहे.

**काळू**—मंग असे सुस्तीवानी काय चालतां, बिगी बिगी उचला की पाय. राचा ईळ हाय ह्येबी मोठ नसीब म्हना.

**केशव०**—चल चल. ( घाईनें जातात.)

## प्रवेश १० वा.

**स्थल**—रस्ता. ( माधवराव व मोरोपंत.)

**माधव०**—किती तरी अजून दूर आहे? लग्नघटका जवळ आली का हो? जसजशी उत्सुकता वाढते आहे व हें मन भराऱ्या मारीत आहे तसतसे हे पाय लुलेच पडत चालले आहेत! केव्हां जाऊन प्रियेला कडकडून भेटेन. माझी प्रिया मला भेटेल किंवा झिडकारून देईल? आणि लग्नच लागलें असलें तर सर्वच निराशा! ( काळू व केशवराव प्रवेश करतात.)

**मोरो०**—आतां हें अगदीं मनांत आणूं नका. लौकर चला.

**केशव०**—(माधवराव व मोरोपंत यांस दाखवून) अरे, तो पहा चालला आहे पुढें, पहातोस काय? परंतु बरोबर कोण एक मनुष्य आहे.

**काळू**—मंग कस?

**केशव०**—कसं काय? आड रस्त्यानें जाऊं, मी दबा धरून बसतों, तूं असाच मागून जाऊन उडिव, आणि तसाच मागें पळ काढ; बरोबरचा मनुष्य भिऊनच पोबारा करील, समजलास?

**काळू**—ही युगत बेस हाय, चला मग. ( लपत छपत चालतात. केशवराव झाडींत लपतो व काळू लपत लपत पुढें येतो.)

**माधव०**—काय असेल तें असो, लग्नघर जवळ येतें तसतसी माझ्या हृदयांत धडकीच भरत चालली आहे. माझी लाडकी मला लाभो हीच जगन्नियंत्या पा—(इतक्यांत काळू येऊन तरवारीनें वार करतो. मेलों मेलों असें ओरडून विव्हळत माधव खालीं पडतो.)

**मोरो०**—खून! खून! धांवा! (असें ओरडत काळ्याच्या मागें धांवतो. दोघे मनुष्य येत होते ते काळ्यास दंडा मारून खालीं पाडतात. रक्तानें माखलेला माधवराव भयंकर घावांच्या वेदनांनीं तडफडतो. ओरडाओरड ऐकून शिपाईही धांवतात.)

**मोरो०**—अरे धांवा! घात झाला! अरे हा तळमळतो आहे रे! हाय, केवढे मोठे घाव हे!

**माधव०**—अररर! हाय! माझ्या सर्वांगास तिडका लागल्या रे. असह्य वेदना होताहेत. हाय!

**एकजण**—यांना दवाखान्यांत नेलें तर कांहीं आशा दिसते.

**माधव०**—बाबांनों, ती आशा आतां नको! माझ्या सर्व आशा खुंटल्या. मी कोणाचाही अपराध केला नव्हता; माझें शेवटचें एवढें मागणें मला द्या कीं त्या लग्नमंडपांत मला लौकर घेऊन चला. माझ्या इंदिरेला मला भेटवा. मी निरपराधी आहें, मजकडून दुराचरण झालें नाहीं, तिच्या व्यतिरिक्त या हृदयांत ईश्वराशिवाय दुसरी मूर्ति मी वागविली नाहीं, हें तिला कळवूं द्या. लोकांनीं लावलेल्या नसत्या कलंकांतून मला मुक्त होऊं द्या. मित्रांनों, ही शेवटची आस पूर्ण करा. आतां वांचण्याची इच्छा राहिली नाहीं. या भयंकर जगांतील संसारयात्रा मला पुरे झाली.

बाबासाहेब, सखा माझा वसंत आणि साध्वी इंदिरा, यांणीं मला निष्कलंक ह्मटलें ह्मणजे माझ्या सर्व आशा पूर्ण झाल्या! हा डाग माझा जीव असेपर्यंत काढून टाका; ह्मणजे मी सुखानें मरेन. सत्य आहे तें बाहेर येवो! सत्याचा जय होवो हीच माझी शेवटची आशा आहे. मित्रांनों, तेवढी पुरी करा. हाय—अर्र्र्र, माझे प्राण कासावीस होऊं लागले! मला उचला, लौकर घेऊन चला! अँ! बाबांनों, तुमच्या पायां पडतों! अरेरेरे मोरोपंत कोठें? बाबा, वेळ होऊन जाईल कींरे? पुढें धांवत जा; हा प्रसंग माझ्या वसंताला कळीव. हाय! कासाविस झालेंरे! अँ.—

**मोरो०**—(दुःखानें) बरें आहे, मी जातों (लोकांस व शिपायांस) बाबांनों तुह्मी कृपा करून याला संभाळून घेऊन या. या खुन्यालाही जखडून बांधून आणा. हें कृत्य करण्यास याला कोणीं सांगितलें तेंही कबूल करून घ्या. मी पुढें जातों.

**माधव०**—अँ—बाबा! मला जातांना आलिंगन तरी देऊन जा. कदाचित्—अँ—अरेरेरे—(पडदा पडतो).

## प्रवेश ११ वा.

### स्थल—लग्नघर.

(इंदिरेच्या कपाळीं रमा मुंडावळी बांधीत आहे.)

**इंदिरा**—(भ्रमांत) अग बाई! या मुंडावळी कशाकरितां? ते आहेत कुठे? त्यांना जाऊन सहा महिने झाले! मग माझें लग्न कोणाशीं लावतां? (रडून) नको बाई, नको हा त्रास! माझें लग्न एकदां झालें नाहीं का!

**रमा**—ही तर बाई भ्रमिष्टासारखी करूं लागली; आतां काय करावें? (उघड) इंदिरे, अशी काय बडबडतेस ही?

**इंदिरा**—( चपापून शुद्धीवर येऊन ) काय; मी बडबडतें? भलतेंच! रात्रीच्या जागरणानें असें होत असेल. बाई मला पाणी तरी घेऊन ये, पहा मला तहान लागली आहे.

**रमा**—आणतें बरें, ( जाते ).

**इंदिरा**—गेलीस बाई एकदाची, सुटलें. ( डोळे फिरवून इकडे तिकडे पहाते व हळूच कुपी काढून संतापानें ) आतां पहातें कोण आड येतें तें. कसाबांनों, सुटलें तुमच्या हातांतून. विषा, तूं आतां आपलें काम लवकर करून घे. ( विष पिऊन कुपी फेंकून देते ) झालें, एकदाची या भयाण जगांतून सुटलें. ( भ्रमांत ) आतां बाई मी कीं नाहीं, तुह्माला सांगतें हो, कोण पण मेला त्रास हा! प्राणनाथ, नका हो कठोर होऊं! आलें आलें! ही पहा निघालें! ( उठून पुढें जाऊन छातीवर हात लपेटून ) मला नका बरें अंतर देऊं आतां. ( वसंतराव प्रवेश करतो त्यास न ओळखतां एकदम दचकून मागें सरते) काय? अझून तुह्मी माझा पिच्छा सोडीत नाहीं, गोविंदराव थांबा, मी त्यांना जाऊन सांगतें. धांवा हो धांवा! माधवराव! हे गोविंदराव मला भ्रष्ट करूं पहातात ( पळूं लागते. वसंतराव धरतो. ) मला धरली हो, धांवा!

**वसंत०**—( अति दुःखानें ) अरेरे कोण प्रसंग हा! ही खरीच भ्रमिष्ट झाली काय देवा? आह्मांला गोविंदरावाशीं लग्न करतें असें सांगून आतां अशी काय बडबडते ही! अरेरे घात झाला! बाळे, इंदिरे, तूं काय मांडलें आहेस? ( इंदिरा वसंतरावाकडे टकमक पहात रहाते ) मी तुझा भाऊ ना?

**इंदिरा**—जाहो तुह्मी सगळे सारखेच आहांत. कोण कोणाचे भाऊ? मला भाऊ असते तर मला माझ्या प्राण-विसाव्याच्या हृदयापासून निराळे करून माझी अशी दैना केली असती काय? तुह्मी जा आपल्या मार्गानें. मला भाऊ नाहीं नी कोणी नाहीं.

**वसंत०**—अरे दैवा! ही खरीच भ्रमिष्ट झाली! इनें मला ओळखलें सुद्धां नाहीं! इंदिरे मजकडे तर पहा.

**इंदिरा**—( पहात शुद्धीवर येते ) अरे देवा, मला काय होतें हें! दादा मी बडबडलें असेन तर क्षमा करा.

**वसंत०**—(एकीकडे) देवा, हें काय अरिष्ट आहे कोण जाणें? बाबांना कळविलेंच पाहिजे. (पडदा पडतो.)

## प्रवेश १२ वा.

**स्थल**—लग्नमंडप.

( लग्नाचा थाट दृष्टीस पडतो, मुंडावळी बांधलेला गोविंदराव उभा आहे, धामधूम चालली आहे, पुष्कळ मंडळी उभी आहे.)

**एक भट**—नवरीला लवकर घेऊन या. घटका भरत आली. अक्षता वांटा लवकर, अंतरपाट आणा. कुठें आहे तो? (इतक्यांत वसंतराव येतो.)

**वसंत०**—बाबा, इंदिरा काय असें करते आहे पहा! भलतें सलतें बडबडते आहे.

**बाबा०**—काय, ह्मणतोस काय हें? (घाईनें जातात.)

**गोविंद०**—वसंतराव, लग्न समारंभाच्या अत्यानंदामुळें मनोवृत्तींत चलबिचल होऊन असें झालें असेल, त्याचें काय? कार्य उरकल्यावर सर्व कांहीं नीट होईल. तुह्मीं भिऊं नका.

**वसंत०**—हें चिन्ह मला नीट दिसत नाहीं. इंदिरा भ्रमिष्ट झाली हो!

**गोविंद०**—घाबरूं नका, तयारीला लागा, तुह्मी तिला आणा अगोदर, हे भट पहा कशी घाई करीत आहेत.

**भट**—अहो घटका झाली, आणा आणा, कोणीच का ऐकत नाहीं! अहो, नवरीला आणा. (इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो—"थांबा थांबा, लग्नाची घाई करूं नका. जरा थांबा"—सर्व लोक चकित होतात. मोरोपंत त्वरेनें प्रवेश करतो.)

**मोरो०**—वसंतराव थांबा थांबा. मला कांहीं भयंकर हकिगत सांगायची आहे.

**सर्व लोक**—हा कोण? मध्येंच काय गडबड ही?

**मोरो०**—महाराज गडबड नाहीं. खून पडले आहेत तिकडे. (सर्व लोक घाबरतात.)

**गोविंद०**—(एकीकडे) हें काय झालें? त्याला मारलें असेल, पण याला कसें समजलें! (उघड) बस बस, फार वटवट करूं नको, या वेळीं याचें काय काम? काढा याला येथून!

**मोरो०**—(संतापून) हा रे चांडाळा! हेंही तुझेंच कृत्य असेल. समजलों.

**वसंत०**—अहो काय, ह्मणतां काय तुह्मीं?

**गोविंद०**—अहो याला मारून काढा बाहेर! पहातां काय? हा लुच्चा, पाजी मनुष्य आहे. मारा ठोका याला.

**मोरो०**—मी लुच्चा काय? आतांच कळेल कोण तो. वसंता, हा राक्षस तुमचा वैरी. याणें तुह्माला धुळीस मिळ-

विलें आहे; यार्णे जीं एकेक अनन्वित कृत्यें केलीं आहेत तीं जर तुह्मीं ऐकाल तर तुमच्या आंगावर शहारे उभे रहातील.

**गोविंद॰**—( जरा नरम येऊन ) मोरोपंत त्या तीन हजार रुपयांसाठीं असा सूड उगवायाचा कायरे? आता मोजून देतों तुझे रुपये, ह्मणजे तर झालें ना? पुरे बाबा. आतां तरी गप्प बैस. येथें रुपये आणवतों, समजलास? ( सर्व लोक गोंधळून जातात.)

**मोरो॰**—नीचा, आग लागो तुझ्या रुपयांना! अरे मांगा, काय अनर्थ केला आहेस? आणि गप्प राहावें ह्मणून मला रुपयांची लालूच दाखवितोस! पक्का मांग आहेस. ( गोविंदरावाचें तोंड उतरतें.)

**लोक**—हा अनर्थ आहे तरी काय?

**वसंत॰**—मला तर आतां जबर संशयानें ग्रासलें आहे. हा तर मोठाच भयंकर प्रसंग दिसतो आहे.

**मोरो॰**—वसंतराव, या नवरदेव बनून आलेल्या राक्षसाचीं कृत्यें ऐका हो, ऐका.

**गोविंद॰**—बस बस, खबरदार.

**वसंत॰**—आपण आतां स्वस्थ रहावें.

**गोविंद॰**—स्वस्थ काय ह्मणून? हें मजवर विनाकारण तुफान आहे.

**मोरो॰**—तुफान! तुह्माला कसें समजलें हें? एकूण तुह्मांला माहिती आहे तर याची. हें ऐका हो सर्व लोक यार्णे आतां काय ह्मटलें आहे तें.

**वसंत॰**—मला यांत संशय येतोच आहे. तुह्मीं सांगा सांगा, एकदाचा उलगडा होऊं द्या.

**मोरो०**—या दुष्टानें तुमचा सर्वस्वी नाश केला आहे. इंदिरा कशी तरी हातीं लागावी ह्मणून तुह्मांमध्यें व माधवरावामध्यें यानें वैर वाढविलें. तुमची फाटाफूट केली. कांहीं भोळ्या हिंदुधर्माभिमानी लोकांचें सहाय्य घेऊन तुह्माविषयीं व माधवरावाविषयीं जी गावांत दुष्ट कंडी पिकवली ती याणेंच. या लोकांसही सुधारकांचा सूड उगविण्यास ही चांगलीच संधि मिळाली. इंदिरेचा दागिना चोरून यानेंच बनावट चिठ्ठी माधवरावाच्या नांवानें पाठविली. माधवरावाची सहज थट्टा करायची अशी माझी समजूत घालून माधवरावास बंदेअल्लीखां आला आहे अशी थाप देऊन त्या चंद्रानायकिणीचे घरीं नेण्यास याणेंच मला सांगितलें.

**वसंत०**—( कपाळावर हात मारून ) हाय हाय, काय अनर्थ हा!

**मोरो०**—याणेंच इंदिरा व वसंत यांचा वाईट संबंध आहे असें माधवरावाच्या मनांत पक्कें भरवून खात्री करण्यास्तव इंदिरेकडे वसंत, माधवाची निर्भर्त्सना करतो आहे असें दाखविलें आणि त्याच वेळीं माधवानें निघून जावें अशा अर्थाचें पत्रही वसंताच्या सहीचें माधवास मिळेल अशा ठिकाणीं ठेवविलें. हें कसें झालें असेल तें असो! त्यामुळें माधव संतापानें फकीर होऊन निघून गेला.

**वसंत०**—( भयंकर मुद्रा करून दांत ओठ चावून ) समजलों! पुरे आतां. (गोविंदरावाच्या अंगावर धांवून) अरे चांडाळा, काय हा भयंकर वणवा लावलास! मित्र ह्मणवून सर्वांस फसविलेंस! बुडविलेंस! ( त्याला धरतो, मुष्टी उगारतो, लोक सोडवितात. ) सोडा मला, या नीचाला नाहींसाच करून टाकूं दे.

**गोविंद०**—तुह्मी, सर्वजण मजवर विनाकारण तुफान घेतां !

**मोरो०**—(डोळ्यांत आंसवें आणून) याहीपेक्षां अत्यंत भयंकर हकिगत ती अझून सांगायाचीच आहे. थोड्या वेळापूर्वी माधवाची माझी भेट झाली. व एकमेकांकडची हकिगत कळली तेव्हां लग्न लागण्याच्या पूर्वी येथें येऊन पोंचावें ह्मणून घाईनें आह्मीं येत होतों तों मार्गांत मारेकऱ्यानें येऊन माधवरावास तरवारीनें वार करून घायाळ केलें आहे.

**वसंत०**—माझा माधव! ( असें ह्मणून मूर्च्छित होऊन मोरोपंत सांवरतांना खालीं पडतो.)

**लोक**—(गोविंदरावास) अरे हा दुष्ट राक्षस, धरा याला. मुस्क्या बांधा पहातां काय ?

**गोविंद०**—खबरदार हात लावाल तर, एकेकाची खबर घेईन. (इतक्यांत बनी गर्दीतून येते.)

**बनी**—चांडाळा, तुझा सूड घेण्याकरितां ही बनी तुझ्या छातीवर उभी आहे पहा !

**गोविंद०**—अरे! ही येथें! जारिणी, (दांत ओंठ चावून मारायला धांवतो. लोक धरतात.)

**लोक**—आहे तरी काय हा अनर्थ!

**बनी**—मेल्या मांगा आतां काय करणार तूं? अहो या चांडाळानें मला भ्रष्ट केलें. माझें पोर गळा दाबून मारलें! आणि आपल्या घरांतच पुरलें आहे. चला मी दाखवून देतें. मेल्यानें असे किती खून केले असतील.

**मोरो०**—इला धरून ठेवा, जाऊं देऊं नका. (लोक धरतात. वसंतराव सावध होतो.)

**बनी**—खुशाल धरा, मी या जिवास कंटाळलेंच आहें.

**वसंत०**—(कपाळावर हात मारून) मीच चांडाळ! हाय, अरे माझा माधव! मला भेटवारे! मला तेथें घेऊन चला! (इतक्यांत रक्तानें भरलेल्या माधवरावास दोन मनुष्य घेऊन येतात, व मागून शिपायांनीं मुस्क्या बांधलेला असा मारेकरी येतो.)

**मोरो०**—हा पहा माधव! कोण भयंकर दशाही!

**वसंत०**—(धांवून) माधवा! (मिठी मारतो. दोघे स्फुंदूं लागतात.)

**शिपाई**—(मारेकऱ्यास) हाच का गोविंदराव! याणेंच तुला मारायला सांगितलें?

**काळू**—व्हय, ह्योच त्यो. अन केशवराव पळून शनी गेला.

**गोविंद०**—मूर्खा, कोणाचें नांव घेतोस?

**काळू**—हे बगा दोन इसा रुपये यानं सस्कार दिला आन पांच इसा काम केल्यावर देईन ह्मंगाला.

**मोरो०**—(गोविंदरावास धरून) बघतां काय, धरा याला! हा खुनी राक्षस आहे. याची चौकशी होऊं द्या, हा फाशीं जाणार!

**लोक**—धरा धरा, बांधा. (शिपाई धरतात. गोविंदराव झटपट करीत असतां त्यास बांधून बनीस व मारेकऱ्यासही घेऊन जातात. लोकही हळू हळू जाऊं लागतात.)

**माधव०**—अँ—माझ्या अंगास तिडका लागल्या! मला निजवा. हाय! (वसंत आपली मांडी उशाला देऊन निजवितो.)

**वसंत०**—वैद्याला तरी कोणी आणारे, जा लौकर, जा बाबांनों.

**मोरो०**—मीच जातों वसंता. ( जातो. )

**माधव०**—बा वसंता, वैद्य नको ! आतां जगण्याची माझी आशा राहिली नाहीं ! या भयंकर जगाशीं संबंध पुरे झाला. हाय, अरेरे ! जीव घाबरतो रे ! हाय ! सर्वांगास वेदना लागल्या. अँ स्नायु शिथिल पडत चालले ! अरेरेरे ! हे प्राण केव्हांच गेले असते ! परंतु बाबासाहेब, व इंदिरा यांस भेटण्याच्या आशेनें अझून घुटमळत आहेत. हाय ! प्रिये, मला एकदा निर्दोषी ह्मण ! माझे अपराध असतील त्यांची क्षमा कर. अँ, वसंता माझी लाडकी कोठें आहे ? मला भेटीव. मग मी सुखानें मरेन. हाय ! ( इतक्यांत इंदिरा मुंडावळीसह भ्रमिष्ट अशी कावरीबावरी पहात येते. )

**इंदिरा**—आलें हो, ही पहा लग्नाला चाललें ! कशा मुंडावळ्या शोभतात ग बाई ? त्यांना गोविंदरावांनीं मारलें ह्मणतां ? ( ओरडून ) अग बाई ! मग कसलें लग्न ! कसायांनों माझी मान कापा बरें ! कापतां कीं नाहीं ? बोला ? आँ सगळेच हंसतात ) हंसा बाबांनों ! देवा, तूं तरी दाद घे.

**वसंत०**—दुर्दैवा केवढा भयंकर घाला तुझा हा ! इच्याकडे तर पहावत सुद्धां नाहीं.

**माधव०**—(इंदिरेला पाहून उठूं पहातो. पुनः पडतो.) ही माझी इंदिरा काय ? लाडके–अरेरेरे–उठवत नाहीं–हाय दुर्दैवा !

**इंदिरा**—( शुद्धीवर येत येत ) रक्तानें माखलेले हे कोण ? नांव घेतात; लाडके ह्मणतात ! ( टकमक पहात राहते. )

**माधव**०—इंदिरे! हा तुझा माधव; मृत्यूनें घट्ट फांस घातला! लाडके, शेवटचें आलिंगन सुद्धां नाहीं काय? ( हात पसरतो. )

**इंदिरा**—( शुद्धीवर येऊन ओळखून ) होय, तेच ग तेच! माझा प्राणग बाई! ( किंकाळी फोडून धांवून माधवरावाच्या अंगावर पडते. दोघेंही बेशुद्ध होतात.)

**वसंत**०—धांवा कोणी. यांना मूर्च्छा आली. ( बाबासाहेब येतात. )

**बाबा**०—अरे हें काय? हें पाहण्यासाठींच मी वांचलों कायरे! ( इंदिरा व माधव यांजकडे पाहून भयंकर मुद्रा करून ) घातरे घात! हाय देवा!

**वसंत**०—बाबा! त्यांना मूर्च्छा आली आहे! माधवा, माधवा-इंदिरे-अरेरेरे! काय हें! वैद्याकडे धांवा! अरे पहा काय दशा ही! धांवा! (माधवराव सावध होऊं लागतो. इकडे तिकडे पहातो.)

**बाबा**०—अरे हा कसा वणवा लागला! इंदिरेला सावध करारे! बा माधवा असा काय बघतोस, ( कपाळावर हात मारून ) या पाप्याला ओळखतही नाहींस काय?

**माधव**०—अँ, बाबा मला नस्ता कलंक अँ, लोकांनीं लावला! हाय, तुह्मांला दुःख दिलें तें मला जाचत आहे, अँ-क्षमा करा!-

**बाबा**०—हें दुःख कसें साहूं? बाळा आमचेंच दुर्दैव हें! ( इंदिरा तळमळूं लागते तिला पाहून ) ती तडफडते कां! पहारे तिला!

**माधव**०—इंदिरे, असें काय, लाडके ऊठ! क्लेश नको होऊं देऊं. अँ-अरेरेरे-माझे हात पाय ओढूं लागले!

**इंदिरा**—( माधवरावास मिठी मारून ) नका हो, मला या पायांपासून दूर करूं नका. मला येथें मरूं द्या !

**माधव०**—असें काय ह्मणतेस प्रिये—अँ.

**इंदिरा**—( भ्रमांत ) अहो, मी मघां प्यालें तें विष. तुह्मांला नाहींका ठाऊक तें?

**बाबा०**—( छातीवर हात मारून ) विष! घात झाला! ( मागें पडतात. )

**वसंत०**—धांवा! बाबा—अहो धांवा हो—माझे पाय गळाले. ( बसतो. )

**माधव०**—प्रिये! तूंही साधलेंस! झालें! आटोपलें—अँ, हाय, हाय! मला फारच तिडका लागल्या. अँ—अति वेदना होतात, हाय—मृत्यूनें घट्ट फांस लाविला! वसंता—शेवटचें मागणें—! वेणूला—पदरीं—घे! अँ—अँ—! लाडके!—इंदिरे! कोठें आहेस प्रिये! मला—शेवटचें— ( उचकी लागते. )

**इंदिरा**—(कांहींशी शुद्धीवर येऊन घट्ट मिठी मारते) ही मी जवळच आहे ना! असें काय करतां हें?

**वसंत०**—धांवा, अहो कोणीच नाहींका येथें? ( माधवरावाच्या मस्तकाखालीं मांडी देतो. )

**माधव०**—अँ—अँ—परमे—श्व—रा—तुझा—अँ—दास—घे, जगदी—श-( उचकीसरसा प्राण जातो. )

**वसंत०**—( छाती पिटून ) गेला गेला! माझा सखा गेला! जगांतील एक अमूल्य रत्न हरपलें! माधवा! कसारे मला सोडून गेलास! हाय ( तोंड झांकून रडतो.)

**इंदिरा**—(माधवाच्या प्रेताकडे पाहून छाती पिटून) दैवा! हें काय केलेंस! माझा प्राण काढून नेलास–माझा जीव ग बाई! (प्रेतास मिठी मारते.)

**वसंत०**—अहो, इला कोणी धरा हो! आंत न्या. (रमा येऊन धरूं लागते.)

**इंदिरा**—(खोल शब्दानें) अँ, नका हो नका! आलें आलें. येतें–बरें का–अँ देवा–घे–आह्माला–तुझ्या– (प्राण जातो.)

**वसंत०**—बाळे, गेलीस! हाय, मी पाषाणहृदयी कसा जीवंत राहिलों हा! ( मागें पडतो. इतक्यांत वेणू धांवत येते.)

**वेणू**—(छाती पिटून) कसा मृत्यूचा घाला पडला हा! कपाळ करंटी मी! भेट सुद्धां झाली नाहीं. माझा पाठिंबा गेला ग बाई! (प्रेतावर पडते पडदा पडतो.)

समाप्त.

13/5

